सोलापूर तरुण भारत
आसमंत



आयातकर वाढीवरुन अमेरिकेने छेडलेले हे व्यापारयुद्ध आणखीन भडकण्याची शक्यता असून, त्याचे पडसादही जागतिक स्तरावर उमटू लागले आहेत. ट्रम्प यांच्या दाव्यानुसार, ही करवाढ अमेरिकेसाठी सर्वांगीण फायद्याची असेल, तर अमेरिकन बाजारपेठेने या निर्णयाचे मुक्तकंठाने स्वागत का केले नाही? त्यामुळे अमेरिकेच्या व्यापारयुद्धामागची नेमकी रणनीती तरी काय? त्याचे आणखीन काय भीषण परिणाम होतील? यांसारख्या प्रश्नांचा ऊहापोह करणारा हा लेख...

# अमेरिकेच्या व्यापारयुद्धामागची रणनीती

लक्ष्यवेध
अनय जोगळेकर

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी पूर्वीच घोषणा केल्याप्रमाणे, अमेरिकेत आयात करण्यात येणाऱ्या जवळपास प्रत्येक गोष्टीवर आयातकर लावला. अमेरिकेच्या त्या त्या देशाशी असलेली व्यापारी तूट आणि त्या देशांनी अमेरिकेतून आयात होणाऱ्या उत्पादनांवर लावलेला आयातकर यांच्या त्रैराषिकातून चीनविरुद्ध ३४ टक्के, जपानविरुद्ध २४ टक्के, युरोपीय महासंघाविरुद्ध २० टक्के, भारताविरुद्ध २६ टक्के, इस्रायलविरुद्ध १७ टक्के आणि बांगलादेशविरुद्ध ३७ टक्के आणि व्हिएतनामविरुद्ध ४६ टक्के या प्रमाणात आयातकरांची घोषणा केली आहे. नवीन आयात धोरणात कोणालाही सोडले नसून, सर्व देशांवर किमान दहा टक्के आणि कमाल ४९ टक्के आयातकर लावण्यात आला.

चीनविरुद्ध पूर्वी लावलेला २० टक्के आयातकर लक्षात घेता, चिनी मालावर ५४ टक्के आयातकर लावण्यात आला आहे. अमेरिका ही जगातील सगळ्यात मोठी बाजारपेठ असून, येथे माल विकायचा, तर त्याची किंमत मोजणे आवश्यक आहे; तसेच कंपन्यांनी अन्य देशांतून बाहेर पडून अमेरिकेत उत्पादन करावे, यासाठी ही योजना आखण्यात आली आहे. दि. ९ एप्रिल रोजीपासून ही करआकारणी अस्तित्वात येत आहे. चीनने अमेरिकेच्या 'अरे ला कारे' करत अमेरिकन आयातीवर ३४ टक्के कर लावण्याची घोषणा केली. तेव्हा डोनाल्ड ट्रम्प यांनी हा कर मागे न घेतल्यास, चिनी मालावर आणखी ५० टक्के करवाढीची घोषणा केली. याउलट अमेरिकेच्या मित्रराष्ट्रांच्या नेत्यांनी डोनाल्ड ट्रम्प यांच्याशी चर्चा करून मार्ग काढण्याची भूमिका घेतली आहे. या पार्श्वभूमीवर भारताचे परराष्ट्रमंत्री डॉ. एस. जयशंकर यांनी अमेरिकेचे परराष्ट्र सचिव मार्को रुबियो यांची भेट घेतली.

डोनाल्ड ट्रम्प जरी रिपब्लिकन पक्षाचे नेते असले, तरी ते पक्षाच्या व्यवस्थेबाहेरचे आहेत. २०१२ साली बराक ओबामा दुसर्यांदा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष झाल्यानंतर निराशेने ग्रासलेल्या रिपब्लिकन पक्षामध्ये बंड झाले. त्याचे नेतृत्व कालांतराने डोनाल्ड ट्रम्प या उद्योगपतींकडे आले. अमेरिकेतील व्यवस्था सडली असून, दोन्ही पक्ष आपल्या ध्येय-धोरणांपासून भरकटले आहेत, अशी त्यांची प्रमुख तक्रार होती. रिपब्लिकन पक्ष राष्ट्रवादाच्या म्हणजेच, 'अमेरिका प्रथम' या धोरणापासून भरकटला असल्याचा त्यांचा आरोप होता. ट्रम्प यांनी उभारलेल्या चळवळीला 'मेक अमेरिका ग्रेट अगेन' म्हणजेच 'मागा' असे म्हटले जाते. दशकानुदशके रिपब्लिकन पक्ष भांडवलशाही, मुक्त व्यापार आणि लोकशाहीच्या रक्षणासाठी युद्ध लढण्याचा समर्थक होता. पण, आज या तिन्ही गोष्टींमुळे अमेरिकेचे हित साधले जात नाही, असे डोनाल्ड ट्रम्प आणि त्यांच्या समर्थकांना वाटते.

अमेरिकेतील भांडवलशाही आता केवळ अतिश्रीमंतांच्या हिताचे रक्षण करत आहे. जागतिक व्यापारामुळे येणारी स्वस्ताई आणि समृद्धीच्या स्वप्नाची भुरळ पाडून अमेरिकेतील अनेक उद्योगधंदे देशाबाहेर गेले. त्यामुळे अमेरिका परावलंबी झाली असून, जागतिक व्यवस्थेचे केंद्र अमेरिकेऐवजी चीनकडे गेले आहे. अमेरिकेला गतवैभव प्राप्त करून द्यायचे असेल, तर तिला स्वावलंबी बनवावे लागेल. त्यासाठी जागतिक कंपन्यांना अमेरिकेत आणावे लागेल आणि त्यासाठी अमेरिकेत आयात केल्या जाणार्या उत्पादनांवर मोठ्या प्रमाणात करवाढ करावी लागेल, अशी त्यामागची भूमिका.

२०१६ आणि २०२० साली अमेरिकेतील श्रमजीवी वर्गाने डोनाल्ड ट्रम्प यांना मोठ्या प्रमाणावर मतदान केले. हा वर्ग दशकानुदशके डेमोक्रॅटिक पक्षाला मतदान करायचा. पण, चीन तसेच अन्य देशांतून आयात वाढल्याने अमेरिकेतील अनेक उद्योग बंद पडण्याच्या मार्गावर पोहोचले. त्यातून या वर्गावर मोठ्या प्रमाणात बेकारीची कुऱ्हाड कोसळली. डेमोक्रॅटिक पक्षाची सत्ता असतानाही त्यांनी या वर्गाकडे लक्ष न देता मुस्लीम, हिस्पॅनिक तसेच कृष्णवर्णीय मतदारांना जवळ केल्यामुळे या वर्गातील अनेक लोक रिपब्लिकन पक्षाकडे वळले. त्यांच्याच मतांमुळे डोनाल्ड ट्रम्प विजयी झाले.

यानिमित्ताने लोकशाही व्यवस्था आणि जागतिकीकरण एकमेकांना पूरक आहेत का? याबाबतही प्रश्न विचारले जात आहेत. चीनसारख्या देशांना जिथे लोकशाही, निवडणुका आणि मानवाधिकारांचा अभाव आहे, तेथे जागतिकीकरणाचा अपेक्षेपेक्षा जास्त फायदा झाला. चीनला जागतिक व्यापार संघटनेत प्रवेश देताना अनेक प्रकारच्या सवलती देण्यात आल्या. तेव्हा असा विचार केला गेला होता की, चीन श्रीमंत झाला, तर आपोआप तेथील लोक लोकशाही व्यवस्था आणतील. पण, गेल्या काही वर्षांमध्ये शी जिनपिंग यांची चीनवरील पकड अधिक भक्कम झाली आहे. लोकशाही प्रक्रियेमध्ये निवडणुका, सरकार बदलणे, नवीन सरकारने धोरण बदलणे, नवीन प्रकल्पांवर माध्यमातून भ्रष्टाचाराचे आरोप झाले की, वेळखाऊ न्यायालयीन प्रक्रिया सुरू होते. यामुळे उत्पादन खर्च वाढतो. हे देश हुकूमशाही देशांशी स्पर्धा करू शकत नसल्यामुळे तेथील उद्योग बंद होऊन ते चीनसारख्या देशांकडे जातात.

दुसरीकडे विज्ञान आणि तंत्रज्ञानातील आघाडीमुळे विकसित देशांच्या राष्ट्रीय उत्पन्नातही भर पडते. त्यामुळे दरडोई उत्पन्नही वाढल्याचा आभास निर्माण होतो. पण, अनेकदा या विकासाचा फायदा त्या देशाच्या नागरिकांना होण्याऐवजी उच्च शिक्षित स्थलांतरितांना किंवा घुसखोरांनाच होतो. लोकशाहीमध्ये निवडून आलेल्या सरकारचे उत्तरदायित्व सामान्य लोकांप्रति असते. व्यवहारात हे उत्तरदायित्व त्यांना मते देणाऱ्या वर्गांकडे अधिक असते. त्यामुळे ट्रम्प यांना निवडून देणाऱ्या वर्गासाठी ट्रम्प संपूर्ण जगभरात व्यापारी युद्ध छेडत आहेत. त्यांच्या प्रशासनाचे असे गणित आहे की, मंदीच्या सावटामुळे खनिज तेलाचे भाव पडतील, तसेच व्याजाचे दर पडतील आणि अमेरिकेतील सामान्य लोकांवर आलेले महागाईचे संकट काही प्रमाणात दूर होईल. या व्यापारी युद्धामध्ये अमेरिकेचे नुकसान होणार असले, तरी सर्वाधिक नुकसान चीनचे होणार आहे. गेल्या ४० वर्षांमध्ये चीनने संपूर्ण जगाला पुरवठा करण्याएवढी उत्पादन क्षमता निर्माण केली आहे.

(पान ६ वर)

# 'बिमस्टेक'ची फलश्रुति

नोंद
प्रतिनिधी

पंतप्रधान नरेंद्र मोदींनी नुकतीच सहाव्या 'बिमस्टेक' शिखर परिषदेला उपस्थिती दर्शविली. देशांच्या एकत्रित सहयोगासाठी २१ सुत्री कार्यक्रमही अधोरेखित केला. तसेच शिपिंगसंदर्भात 'बँकॉक व्हिजन २०20' या करारावरही हस्ताक्षर केले. त्यानिमित्ताने मोदींच्या थायलंड दौऱ्याच्या फलश्रुतीचे आकलन...

एकीकडे राज्यसभेत 'वक्फ सुधारणा विधेयक' मांडले जाणार होते. मात्र, पंतप्रधान नरेंद्र मोदी त्याच दिवशी बँकॉक येथे 'बिमस्टेक' शिखर परिषदेला उपस्थित होते. कारण, ही परिषदही तितकीच महत्त्वाची. 'बिमस्टेक'मध्ये भारतासह बांगलादेश, भूतान, म्यानमार, नेपाळ, श्रीलंका आणि थायलंड या देशांचा समावेश होतो. सहभागी देशांचा आर्थिक, सामाजिक, तंत्रज्ञान असा सर्वांगीण विकास व्हावा, याच उद्देशाने १९९७ मध्ये संघटनेची स्थापना झाली होती. 'बे ऑफ बंगाल इनिशिएटिव्ह फॉर मल्टीसेक्टरल अ‍ॅण्ड इकोनॉमिक कॉर्पोरेशन' अर्थात 'बिमस्टेक.' 'बिमस्टेक'मध्ये पूर्वी केवळ भारत, बांगलादेश, श्रीलंका आणि थायलंड हे चारच देश होते. मात्र, २००४ साली भूतान, म्यानमार आणि नेपाळचाही या समूहात समावेश झाला.

आता मुळात 'सार्क' देशांचा समावेश असलेली परिषद असताना 'बिमस्टेक' वेगळी का, असाही प्रश्न पडणे साहजिकच. मात्र, 'सार्क'मध्ये पाकिस्तान आणि अफगाणिस्तानचाही समावेश आहे. पाकिस्तानशी असलेल्या विरोधी संबंधांचा आलेख पाहता, 'बिमस्टेक' ही संघटना उजवी ठरते.

'बिमस्टेक' परिषदेची गेल्या २७ वर्षांतील ही केवळ सहावी परिषद. 'सार्क' परिषदेची कामगिरी पाहता, स्थिती फारशी चांगली नाही. 'बिमस्टेक' शिखर परिषदेची परिस्थितीही तशीच होती. परंतु, पंतप्रधान नरेंद्र मोदी सत्तेत आल्यानंतर 'शेजारी प्रथम' या धोरणाचा अवलंब केल्याने आपल्या शेजारील देशांचा विचार हा परराष्ट्र धोरणात अग्रक्रमावर येऊ लागला. पूर्वी बांगलादेशाच्या ढाक्यात या 'बिमस्टेक'चे कायमस्वरुपी कार्यालय असावे, असे धोरण होते. मात्र, या देशात सुरू असलेल्या अराजकानंतरच्या परिस्थितीमुळे हे आता शक्य नाही.

बांगलादेशात शेख हसीना यांचे सरकार गेल्यानंतर मोहम्मद युनूस यांच्याकडे देशाची सूत्रे आली. या अराजक माजवणार्या सत्तांतरानंतर बांगलादेशात ओढवलेली हिंदूंवरील परिस्थितीची पंतप्रधान नरेंद्र मोदींनी युनूस यांना आठवण करून दिली. 'बिमस्टेक'च्या शिखर परिषदेत भारताचे नेतृत्व असल्याने इथल्या सर्वांगीण विकासाची जबाबदारीही भारताचीच. 'बिमस्टेक'मध्ये पाकिस्तान आणि चीन या देशांना प्रवेश नसल्याने याचा फायदा परराष्ट्र धोरणादरम्यान होणार आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी 'बिमस्टेक' परिषदेत राष्ट्रातील प्रमुखांना भेटलेच, शिवाय श्रीलंकेचा दौराही त्यांनी केला. नरेंद्र मोदींनी याच शिखर परिषदेत नेपाळचे पंतप्रधान के. पी. शर्मा ओली यांचीही भेट घेतली. नेपाळमध्ये पुन्हा राजसत्ता यावी, यासाठी सध्या आंदोलने सुरू आहेत. अराजकता माजविण्याचा हा पॅटर्न श्रीलंका आणि बांगलादेशच्या देशांशी मिळता जुळता तर नाही ना, याचीही खबरदारी घेणे गरजेचे आहे. तूर्त इथे संकट चीनचेही येऊ शकते, अशी भीती आहेच. मोदींनी नेपाळ आणि श्रीलंकेला चीनच्या विस्तारवादाचा धोका अधोरेखित करून सांगितला. शिवाय, या सर्वांशी एकत्रित लढण्याची गरज आहे, असे अधोरेखित केले. परिषदेच्या आठवडाभरापूर्वी म्यानमारमध्ये प्रचंड मोठा भूकंप आला. सुमारे ३ हजार, ४७१ इतके लोक मृत्युमुखी पडले. भारताने या देशाला पुरेशी मदत पुरवली. एक फिरते रुग्णालयही उभे केले, ज्यात आपत्ती निवारणाची शक्य तितकी मदत पाठविण्यात सहकार्य केले. त्यामुळे या देशांच्या पाठीशी आपण उभे आहोत, हा विश्वास या देशांना दिला. म्यानमारच्या वरिष्ठ जनरल आंग ह्याइंगशी भेट घेत मोदींनी भूकंपात झालेल्या जीवितहानीबद्दल संवेदना व्यक्त केली.

'कोविड' काळातही अशाच प्रकारे भारत शेजारील देशांच्या पाठीशी उभा ठाकला होता. हीच सहकार्याची भावना रुजविण्यासाठीचा प्रयत्न भारताने केला. अमेरिका आणि चीनसह पाश्चात्य देशांना इथे घुसण्यापासून रोखण्याचा प्रयत्न भारताचा यानिमित्ताने असेल. पाश्चिमात्य देशांशिवाय भारताच्या नेतृत्वात इथे सहकार्य मिळू शकते, याचे उदाहरण भारताला देणे क्रमप्राप्त असल्याने पंतप्रधान नरेंद्र मोदींनी 'बिमस्टेक'ला इतके महत्त्व दिले. याची प्रचिती कार्यक्रमादरम्यानच आली. थायलंडने पंतप्रधान नरेंद्र मोदींना दिलेल्या आदरातिथ्याचेही कौतुक संपूर्ण देशभर झाले.

पंतप्रधान नरेंद्र मोदींनी 'बिमस्टेक'च्या संपूर्ण देशांना 'युपीआय'शी जोडण्याचे आवाहन केले. याशिवाय, भारतात 'बिमस्टेक चेंबर ऑफ कॉमर्स'ची स्थापना करण्याची घोषणाही त्यांनी केली. एक २१ सुत्री कार्यक्रम आयोजित करावा आणि प्रत्येक देशातील गृहमंत्र्यांची एक बैठक, असे अनेक प्रस्ताव यावेळी ठेवण्यात आले. याशिवाय, अंतराळात भारताची सुरू असलेली घोडदौड याचा फायदा 'बिमस्टेक' देशांना करून देण्याचाही आग्रह मोदींनी धरला. 'बिमस्टेक' देशांना ग्राऊंड स्टेशन उपलब्ध करून देणे, लघुउपग्रहांच्या मदतीने स्थानिक विकास आणि 'रिमोट सेन्सिंग'साठी वापर करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. बंगळुरुत 'बिमस्टेक' ऊर्जाकेंद्राचाही उल्लेख मोदींनी यावेळी केला, ज्यात युवकांना प्रशिक्षणासाठी प्रोत्साहन दिले जाईल. शिवाय, 'युपीआय'शी मंचावर 'बिमस्टेक' देशांना आणून भारतातील पर्यटन, व्यापार आणि उद्योगांना जोडण्यावर भर असणार आहे. 'बिमस्टेक' देशांच्या स्थापनेनंतर फारशी प्रगती यात झाली नव्हती.

(पान ६ वर)



# 'वक्फ नंतर'ची राजकीय परिस्थिती

लोकसभेत आणि राज्यसभेत मोठ्या फरकाने वक्फ विधेयक मंजूर करून घेऊन आता त्यावर राष्ट्रपतींचं शिक्का मोर्तब झालं. ज्यावेळी हे विधेयक संसदेत सादर करण्यात आलं, त्यावेळी हे विधेयक मंजूर होणार नाही, अशीच एकूण परिस्थिती होती. मात्र, भाजपने करिश्मा करून दाखवलाच. आता वक्फ नंतरच्या परिस्थितीवर जरा आपण आज विचार करूया...

वेध
प्रसन्न आठवले
भ्र.९०४९३५३८०९

भाजपामध्ये पुढच्या पिढीतील सत्तांतरासाठी आस्ते आस्ते हस्तांतरणाची प्रक्रिया आतून घडत असल्याचं चित्र दिसत आहे. जे इतर कोणत्याही पक्षात दिसतच नाही. मुळात इथे एक गोष्ट जी प्रकर्षाने जाणवली, ती म्हणजे, मोदी या संपूर्ण प्रकरणात आणि विशेष करून संसद प्रक्रियेत पडद्यासमोर कुठेही दिसले नाहीत. अगदी संसदेत सुद्धा त्यांना फक्त मतदानासाठी आलेले पहायला मिळाले. पुढच्या पिढीतील अमितभाई शहा, किरेन रिजिजू यांसह दुसऱ्या फळीचे नेते मैदानात उतरून, विधेयकाच्या बाजूने भक्कमपणे बाजू मांडताना दिसले.

अमितभाई शहा, किरेन रिजिजु सुधांशू त्रिवेदी, मेधा कुलकर्णी, तेजस्वी सूर्य इत्यादी नेते भाजपकडून विधेयकावर राज्यसभा व लोकसभेत बोलले आणि मोटाभाई यांनी सिनिअर म्हणून भूमिका पार पाडली. मुख्य महत्वाचा मुद्दा असा की, पुढच्या ४ वर्षांच्या काळात हा पक्षांतर्गत सत्तांतर बदल प्रकर्षाने जाणवेल. म्हणून हा चार वर्षांचा काळ भाजपा, देश, हिंदू सर्वांसाठी खूप महत्वाचा आहे.

या प्रक्रियेत घडलेली खूप महत्वाची गोष्ट, जिचे परिणाम कदाचित आज दिसत नसले तरीही, ही गोष्ट घडवण्यात, भाजपा नक्कीच यशस्वी झालेली आहे, असं मी आज खात्रीने सांगू शकतो. ते म्हणजे मुस्लिम धर्मातील गरीब, मागासलेले, महिला पसमंदा, खोजा, बोहरा, शिया अशा सर्वांना नवीन व्यवस्थेत योग्य ते प्रतिनिधित्व मिळेल,याची या विधेयकात कायदेशीर तरतूद करण्यात आलेली आहे. म्हणजेच त्यांच्यातील फार मोठ्या वर्गाला आजपर्यंत, त्यांच्यातच डावलण्यात आलेलं होतं. त्यावर सुधांशू त्रिवेदी यांनी मार्मिक आणि उपरोधिक भाषेत बोलून, एकप्रकारे या गरीब, मागासवर्गीय आणि भारतात मुस्लिमांकडून वापरून आणि तरीसुद्धा डावलून मागेच ठेवण्यात आलेल्या समाजाचा, दाबला गेलेला आवाज, मोदी शहा आणि एकूणच भाजपाने यानिमित्ताने उघड केला आहे. ज्यावेळी वक्फ विधेयक




मंजूर झालं, त्यानंतर मुस्लिम समाजाच्या या वर्गाने विशेष करून, आनंदोत्सव साजरा केला.

मोदींच्या नावाचा जयघोष केला. सोशल मीडियावर त्या दिवसानंतर आलेल्या मुस्लिम महिला आणि इतर मुस्लिमांच्या प्रतिक्रिया कृतज्ञ भाव व्यक्त करणाऱ्या होत्या. माझ्या मते, जरी its too early to say, तरीपण याच भीतीने ओवेसी यांनी आक्रमक पावित्रा घेऊन, विधेयक फाडण्याचं नाटक केलं. कारण हेच आक्रमक मुस्लिम बाकीच्या मुस्लिमांना दाबण्यात आणि सतत वापरून घेण्यात यशस्वी होत आहेत. पण एकूणच मुस्लिम समाजातील मोठ्या वर्गाला वक्फ बोर्डाने, आधीच्या कायद्याच्या आधारे फसवून, वक्फच्या अधिकृत आणि वादग्रस्त, अशा दोन्ही प्रकारच्या प्रॉपर्टीजचा दुरुउपयोग करून, आपले खिसे भरल्याचे केलेले काम, या निमित्ताने पुढे आणण्यात, मोदी शहा आणि टीम मोठ्या प्रमाणात यशस्वी.झालेत, हे नक्की.

(पान ४ वर)



# म्यानमारमधील भयावह धरणीकंप

नोंद

**प्रा. अशोक ढगे**

म्यानमारमधील भयचक्र अद्याप थांबलेले नाही. आतापर्यंत हजारो बळी गेले असले, तरी अजूनही ढिगाऱ्याखाली लोक दबले असण्याची शक्यता आहे. १० हजारांहून अधिक मृत्यू झाले असण्याची भीती आहे. हा गेल्या दोन दशकांमधील सर्वात विनाशकारी भूकंप आहे. गेल्या काही दिवसांमध्ये म्यानमारमध्ये झालेल्या भूकंपांमुळे आतापर्यंत अनेकांना आपला जीव गमवावा लागला आहे. म्यानमारमध्ये भूकंप वारंवार का होत आहेत आणि किती वेळा भूकंप येऊ शकतात, याची खात्री देता येत नाही.

गेल्या काही दिवसांमध्ये म्यानमारला भूकंपाचे अनेक धक्के बसले आहेत. भूकंपामुळे म्यानमारमध्ये प्रचंड हाहाकार माजला आहे. आता हा प्रश्न अनेकांच्या मनात येत आहे की, म्यानमारमध्ये पुन्हा पुन्हा भूकंप का होत आहेत. 'टेक्टोनिक प्लेट्स'च्या टकरीमुळे भूकंप होतात. भारतीय प्लेट आणि युरेशियन प्लेट यांच्यामध्ये म्यानमार आहे. भारतीय प्लेट दरवर्षी ४-५ सेंटीमीटरने उत्तरेकडे सरकत आहे. त्यामुळे दबाव निर्माण होतो आणि दाब अचानक वाढतो, तेव्हा भूकंप होतो. म्यानमारमध्ये भूकंप झाला तेव्हा भूकंपाचे केंद्र सागिंग होते. ते म्यानमारमधील सेस्मिक झोन-पाचमध्ये येते. ते मार सुंदा खंदकाजवळ आहे. येथे असलेली इंडो-ऑस्ट्रेलियन प्लेट खाली बुडत आहे.

प्लेट्स अडकल्याने किंवा अचानक घसरल्याने धक्के बसतात. म्यानमारमधील ही १,२०० किलोमीटर लांबीची फॉल्टलाईन उत्तर-दक्षिण पसरलेली आहे. ती वारंवार घसरल्याने भूकंप होतात. म्यानमारमध्ये अजूनही भूकंपाचे धक्के सातत्याने जाणवत आहेत. त्यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

भूकंपामुळे म्यानमारमध्ये मोठी हानी झाली आहे. या आपत्तीतील मृतांची संख्या हजारांच्या घरात आहे, तर मोठ्या प्रमाणात लोक जखमी झाले आहेत. भूकंपाचे केंद्र मंडाले शहरापासून सुमारे १७.२ किलोमीटर अंतरावर असलेल्या मध्य म्यानमारमध्ये होते. शेजारील थायलंडलाही याचा फटका बसला. राजधानी बँकॉकमध्ये बांधकाम सुरू असलेली एक गगनचुंबी इमारत कोसळून किमान नऊ जणांचा मृत्यू झाला. भूकंपाचा प्रभाव ईशान्य भारतातील काही भागांमध्येही दिसून आला; परंतु येथे कोणतीही जीवितहानी झाली नाही.

म्यानमार भूकंपाच्या दृष्टीने सक्रिय प्रदेशांपैकी एक आहे. भूकंपाच्या जोखमीच्या जागतिक नकाशावर म्यानमार हा भूकंपाचा मध्यम ते उच्च धोका असलेल्या रेड झोनमध्ये येतो. 'युनायटेड स्टेट्स जिओलॉजिकल सर्व्हे'नुसार, हा एक उथळ भूकंप होता, ज्याची खोली १० किलोमीटर होती. गेल्या दोन वर्षांमध्ये जगामध्ये आलेला हा सर्वात शक्तिशाली भूकंप होता. म्यानमारमध्ये भूकंपाचा धोका वाढण्याचे सांगितले जाणारे सर्वात मोठे कारण म्हणजे 'सागिंग फॉल्ट.' हा एक भूशास्त्रीय मोठा दोष आहे. तो प्रामुख्याने भारतीय प्लेट आणि सुंदा प्लेट यांच्यामध्ये येतो. या फॉल्टमध्ये दोन भूभाग दरवर्षी ११ मिलीमीटर आणि १८ मिलीमीटर दरम्यान एकमेकांच्या पुढे सरकतात, असा अंदाज आहे. भूभाग सतत सरकल्यामुळे ताण वाढून भूकंप होतो.

पृथ्वीच्या टेक्टोनिक प्लेट्स एकमेकांवर सरकतात तेव्हा अचानक हालचालीमुळे फॉल्टलाईनच्या बाजूने धोकादायक जमिनीचा थरकाप होऊन भूस्खलन, पूर, त्सुनामीचा धोका वाढू शकतो. 'यूएसजीएस'ने एका अहवालात म्हटले आहे की, म्यानमारमधील भूकंप भारतीय आणि युरेशियन प्लेट्समधील 'स्ट्राईक स्लिप फॉल्टिंग'मुळे झाला आहे. याचा अर्थ दोन प्लेट्स एकमेकांवर घासल्या गेल्या. भूकंपाचा केंद्रबिंदू असलेल्या ठिकाणी भूकंप सुरू होतो. सहसा भूकंपाच्या केंद्राजवळ सर्वात तीव्र हादरे जाणवतात; परंतु हादरे शेकडो किंवा हजारो मैल दूरही जाणवू शकतात. सागिंग फॉल्टमुळे म्यानमारमध्ये वारंवार भूकंप होतात. 'यूएसजीएस' डेटानुसार, १९०० पासून सागिंग फॉल्टजवळ सातपेक्षा जास्त तीव्रतेचे किमान सहा भूकंप झाले आहेत. यापैकी सर्वात अलिकडील म्हणजे जानेवारी १९९० मध्ये सात रिश्टर स्केल तीव्रतेचा भूकंप झाला. त्यामुळे ३२ इमारती कोसळल्या. फेब्रुवारी १९१२ मध्ये भूकंपाच्या केंद्राच्या दक्षिणेला ७.९ तीव्रतेचा भूकंप झाला. २०१६ मध्ये जवळपास याच भागात ६.९ रिश्टर स्केलचा भूकंप झाला होता. शास्त्रज्ञ भूकंपाचा आकार आणि तीव्रता वापरून तपासतात, सिस्मोग्राफ वापरून सोडलेली ऊर्जा मोजतात. १९३० च्या दशकात चार्ल्स रिश्टरने तयार केलेले रिश्टर स्केल एकेकाळी या उद्देशासाठी वापरले जात होते; परंतु आता मोठ्या, दूरच्या भूकंपांसाठी ते कालबाह्य झाले आहे.

रिश्टर स्केल रेकॉर्डिंगवर सर्वात मोठे मोठेपण मोजते, तर इतर परिमाण भूकंपाचे वेगवेगळे भाग मोजतात. म्यानमारमध्ये गृहयुद्ध सुरू असतानाच देशाला भूकंपाचा मोठा धक्का बसला. ७.७ रिश्टर स्केलच्या भूकंपाने मोठी हानी झाली आहे. या आपत्तीच्या निमित्ताने गृहयुद्ध थांबलेले दिसले. भूकंपानंतर लष्करी उठावाविरुद्ध लढणाऱ्या बंडखोरांनी पुढील दोन आठवड्यांसाठी तात्पुरता युद्धविराम जाहीर केला. मदत आणि बचावकार्याला गती देण्यासाठी हे पाऊल उचलण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. तथापि, 'पीडीएफ'ने हे स्पष्ट केले आहे की, आपल्यावर हल्ला झाल्यास बचावात्मक कारवाई केली जाईल. बर्मा या नावाने प्रसिद्ध असलेला म्यानमार दीर्घकाळ चाललेल्या रक्तरंजित गृहयुद्धाच्या कचाट्यात असून तेथे आधीच एक मोठे मानवतावादी संकट घोंघावत आहे. भूकंपाच्या भीती आणि व्याप्तीमुळे म्यानमारमध्ये मदत आणि बचावकार्य करणे कठीण होत आहे. भूकंपामुळे अनेक भागांमध्ये इमारती कोसळल्या आणि मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. अलिकडेच दुपारी भूकंपाचा धक्का बसला, त्याचा केंद्रबिंदू म्यानमारमधील मंडाले शहरापासून फार दूर नव्हता. त्यानंतर अनेक 'आफ्टरशॉक्स' जाणवले, त्यापैकी एकाची तीव्रता ६.४ इतकी होती.

भूकंपामुळे अनेक भागांमध्ये इमारती कोसळल्या, रस्ते खराब झाले, पूल कोसळले आणि धरण फुटले. भूकंपामुळे राजधानी नायपीतावमध्ये खराब झालेले रस्ते दुरुस्त करण्यासाठी अलिकडे अनेक कर्मचारी काम करत होते, तर शहरातील बहुतेक भागांमध्ये वीज, फोन आणि इंटरनेट सेवा खंडित राहिली. भूकंपामुळे म्यानमारचा ७० टक्के जीडीपी नष्ट झाला आहे. म्यानमारच्या लष्कराने फेब्रुवारी २०२१ मध्ये आंग सान स्यू की यांच्या निवडून आलेल्या सरकारकडून सत्ता हस्तगत केली. देश आता दीर्घकाळ प्रस्थापित बंडखोर संघटना आणि नव्याने स्थापन झालेल्या लोकशाही समर्थक गटांसह गृहयुद्धात गुंतला आहे. भूकंपानंतरही बंडखोर संघटनांवर लष्करी दलांचे हल्ले पाहायला मिळाले.

उत्तरेकडील कायिन राज्य आणि दक्षिणेकडील शान राज्यात तीन हवाई हल्ले करण्यात आले. दोन्ही मंडाले राज्याच्या सीमेवर आहेत. 'यूएस आर्मी स्पेशल फोर्स'चे माजी सैनिक डेव्ह युबँक यांनी ही माहिती दिली. युबँक यांनी 'फ्री बर्मा रेंजर्स'ची स्थापना केली. ही एक मानवतावादी मदत संस्था असून १९९० पासून म्यानमारमधील बंडखोर आणि नागरिक या दोघांनाही मदत करत आहे. भूकंपाचा सर्वाधिक फटका बसलेल्या भागात रक्ताची मागणी खूप जास्त आहे. चीनने १३५ हून अधिक बचाव कर्मचारी आणि तज्ज्ञ तसेच वैद्यकीय किट आणि जनरेटरसारखे साहित्य पाठवले आहे. आपत्कालीन मदत म्हणून सुमारे १३.८ दशलक्ष डॉलर देण्याचे वचन दिले. हाँगकाँगने आपली ५१ सदस्यांची टीम म्यानमारला पाठवली.

'तास'या रशियन सरकारी वृत्तसंस्थेच्या वृत्तानुसार, रशियाच्या आपत्कालीन मंत्रालयाने १२० बचाव कर्मचारी आणि मदत सामग्री घेऊन दोन विमाने पाठवली आहेत. मलेशियानेही म्यानमारमध्ये ५० जणांची टीम पाठविण्याची घोषणा केली आहे. भारताने बचाव पथक आणि वैद्यकीय पथक तसेच मदत सामग्री पाठविली आहे. जगभरातून मदत येत असली, तरी भूकंपग्रस्तांचे पुनर्वसन हे तिथल्या लष्करी राजवटीपुढचे मोठे आव्हान आहे.

---

संस्काराच्या देशा

**डॉ. रमा गोळवलकर**

# ...तेथ भगवंताचे अधिष्ठान असावे

पृथ्वीला अंतरिक्षातून पाहिल्यानंतर त्याच्या केवळ आकारानं ओळखू येणारा देश म्हणजे आपला भारत! इतर सर्व भूभाग म्हणजे उत्तर आणि दक्षिण अमेरिका, युरोप, आशिया, आफ्रिका, ऑस्ट्रेलिया, अंटार्क्टिक यांसारखे खंड आहेत आणि त्यांच्यात विविध देश वसतात. भारत मात्र या सगळ्या देशांपासून सर्वस्वी वेगळाच दिसून येतो. हा भूभाग कसा आहे याचं वर्णन करताना विष्णुपुराणातल्या दुसऱ्या खंडात तिसऱ्या अध्यायातला पहिला श्लोक आहे.



**उत्तरं यत् समुद्रस्य हिमाद्रेश्चैव दक्षिणम् । वर्षं तद् भारतं नाम भारती यत्र सन्ततिः।।** (समुद्राच्या उत्तरेला आणि हिमालय पर्वताच्या दक्षिणेला असलेल्या देशाला भारत म्हणतात आणि त्यात वसणाऱ्या लोक या देशाची संतती भारती म्हणवली जाते.) माझ्या माहितीप्रमाणे एखाद्या देशाची आणि त्यात राहणाऱ्या लोकांची अशी व्याख्या जगात इतर कोणत्याही देशाची करण्यात आली नाही. असल्यास जाणकारांनी माझ्या माहितीत भर घालावी, ही नम्र विनंती. कारण जगात भूगोल आणि त्यात उत्क्रांत झालेल्या वंशांचा उल्लेख येतो, तो त्यांच्या आंगीक लक्षणांमुळे म्हणजे शारीरिक वैशिष्ट्यांमुळे. उदाहरणार्थ कॉकेशिया प्रांतातून युरोप आणि अमेरिकेत वसलेले कॉकेशियन वंशाचे लोक उंच, गोरे, सोनेरी केसांचे, तरतरीत नाक, भव्य कपाळ आणि नाजूक जिवणीचे घाऱ्या, निळ्या किंवा हिरवट झाक असलेल्या डोळ्यांचे असतात. तर, आफ्रिकेतले आफ्रिकन वंशाचे लोक उंच, काळेकभिन्न, राठ आणि कुरळ्या केसांचे, अरुंद कपाळ, चपटं नाक, जाड ओठ आणि काळ्या डोळ्यांचे असतात, इत्यादी. हे वंशाचं वर्णन, पण देशाचं वर्णन करून त्यात राहणाऱ्या सर्वांना 'भारती' म्हणणारी ही व्याख्या सर्वसमावेशक आणि अतिशय व्यापक आहे. भारत या देशात जन्मलेल्या लोकांच्या विचारसरणी आणि जीवनशैलीचा विस्तार किती आणि कसा झाला होता असा विचार केला तर आपल्याला इतिहासाचा धांडोळा घ्यावा लागेल.

विविध विज्ञान शाखांचा आधार घेऊन भारतीय संस्कृतीच्या प्राचीनत्वाचा शोध घेणाऱ्या नीलेश ओक, डॉ. रूपा भाटी, लीना (खागोलीना) दामले या ताज्या दमाच्या संशोधकांच्या कामाचा आवर्जून उल्लेख करायला हवा. परंतु यांच्या कामाविषयी पारंपरिक पद्धतीनं पुरातत्त्व आणि इतिहासाचा अभ्यास करणारे अभ्यासक अनेक शंका आणि प्रश्न उपस्थित करतात. पण अशा विद्वानांना मात्र बोगाजकोई अभिलेख मान्य आहे. तुर्कीमधील बोगाजकोय या ठिकाणी मातीच्या पाटीवर कोरलेले जवळपास २५ हजार अभिलेख सापडले आहेत. अंदाजे इ. स. पूर्व दुसऱ्या सहस्त्रकात ते लिहिले असल्याचं सर्वच प्रकारच्या अभ्यासकांना मान्य आहे. यातला एक लेख हित्ती राज्याची राजधानी हत्तुसास (आता तुर्कीमधील बोगाजकोय) या ठिकाणी हित्ती वंशाच्या राजानं मित्तानी वंशाच्या राजाशी केलेल्या एका तहाचा दस्तावेज आहे. त्यात मित्र, वरुण, इंद्र, नासत्य आणि दस्त्रया दोन अश्विनी कुमारांपैकी नासत्य या चार देवतांना वंदन करून पुढे लेखन करण्यात आलेलं आहे. यातून काही विद्वानांनी वेद आणि वैदिक देवतांचे उगमस्थान मध्यपूर्व (मिडिल ईस्ट) मध्ये असल्याचं तर्कट मांडलं. पण वेद ज्या सरस्वती नदीच्या काठी रचण्यात आलेत त्या लुप्त सरस्वती नदीचं पात्रच आता वायव्य भारतात सापडलेलं आहे. शिवाय वेद पठण करणारे कोणी म्हणता कोणी त्या मध्यपूर्वेत सापडत नाहीत आणि भारतात आजही वेद पठण जतन संवर्धन करणारे वैदिक परंपरा मानणारे लोक आहेत. हा सगळा वैचारिक गोंधळ निर्माण करण्यात एक महत्त्वाची गोष्ट मात्र दुर्लक्षित ठेवण्यात आली.

इ. स. पूर्व दोन हजार वर्षांपूर्वी वेद वाङ्मयात पुन्हा पुन्हा येणारे हे देव सध्याच्या तुर्किये नावाच्या देशात पूजनीय होते. आणि एक नव्हे, तर दोन राजे त्या देवतांना साक्षी ठेवून ही संधी करत होते. याचा अर्थ असा की, प्राचीन काळात भारतीय विचारधारा, संस्कार आणि संस्कृतीची व्याप्ती ही थेट मध्यपूर्वेपर्यंत होती. आता एखादी देवदेवता न मानणारी व्यक्ती प्रश्न करू शकेल की, देवांना साक्षी मानण्यात कुठले आलेत संस्कार आणि संस्कृती? एकतर आपल्याहून श्रेष्ठ आणि सामर्थ्यशाली कोणी आहे, ते अदृश्य-अमूर्त असले, तरी त्यांचं अस्तित्व विश्वाच्या आणि निसर्गाच्या बहुरूपात अभिव्यक्त होत असतं हा एक सिद्धांत आहे. यालाच आधुनिक समाजशास्त्र्यांनी बहुदेवतावाद म्हटलं. त्याचा पुरस्कार सर्वच प्राचीन लोकव्यवहारात होता, हे सांगणारा हा पुरावा मध्यपूर्वेतच मिळाला आहे, हे उत्तमच. मूळ मुद्दा आहे तो भारतीय संस्कारांचा. कोणत्याही कार्याची सुरुवात करताना आपल्या आराध्य देवतांना आवाहन करून, त्यांचा आशीर्वाद घेऊन त्यांना साक्षीला ठेवायचा, हा प्रघात अस्सल भारतीय आहे.

हे दोन प्राचीन राजे युद्ध करतात आणि शांतता प्रस्थापित करण्यासाठी संधीदेखील करतात. हा संधी (अर्थी करार; ही संधी नव्हे) करत असताना संधीचा देव म्हणून वरुण देवाला आवाहन करण्याचा प्राचीन भारतीय प्रघात या बोगाजकोय (पक्षी तुर्किये) अभिलेखात पाळलेला दिसतो. जगाच्या पाठीवर नांदलेल्या कोणत्याही प्राचीन सभ्यतांमध्येच काय तर आधुनिक संस्कृतींतदेखील 'कराराचा देव' ही परिकल्पना भारताशिवाय अन्यत्र कुठेही आढळत नाही. आज आपण वरुण देवाला पश्चिम दिशेचा दिग्पाल म्हणून पूजतो. पण वैदिक संस्कृतीत तो इंद्राच्या खालोखाल लोकप्रिय आणि शक्तिशाली देव आहे. तो या विश्वाच्या नियमांचा नियामक आहे. त्याच्याच साक्षीनं या संधीचे नियम तयार करण्यात आलेले आहेत. वरुण देवाच्या साक्षीनं केलेल्या नियमांचं उल्लंघन जो कोणी करेल त्याला जलोदर होईल, अशी सार्वत्रिक मान्यता होती. म्हणूनच त्याला साक्षीला ठेवण्यात येत असे. हीच परंपरा आजही आपण पाळतो.


कोणत्याही शुभकार्याच्या सुरुवातीला देवाचं आवाहन पूजन करण्यात येतं. या सगळ्या कार्याला तुम्ही साक्षी राहावं, अशी विनंती करण्यात येते आणि नंतरच ते कार्य हाती घेण्यात येतं. यासाठी समर्थ रामदास स्वामींची एक ओवी आपण मराठी भाषिक नेहमीच उद्धृत करत असतो- **सामर्थ्य आहे चळवळीचे। जो जे करील तयाचे। परंतु तेथ भगवंताचे। अधिष्ठान पाहिजे।।** नेमकी हीच भावना हा नवा स्तंभ सुरू करताना आहे. आपल्या संस्कृतीला समजावून घेताना तिचा गर्भरेशमी तलम पोत आणि भरजरी काठ पदराला अनुभवताना जी मर्मं उलगडली, शक्तिस्थानं उमगली, रहस्यं उमजली आणि सौंदर्यस्थळं भावली ती शब्दबद्ध करण्याचा मानस आहे. त्यासाठी सर्व देवी-देवतांना साक्षीस ठेवून हा संकल्प करू या. तो सिद्धीस नेण्यास श्री समर्थ आहे. तरी **न्यून ते पुरतें। अधिक ते सरते। करून घ्यावे हें तुमते। विनवीतु असे।।** (ज्ञानेश्वरी १.८०) माउलींच्या या शब्दांचा आधार घेत या लेखनकार्याचा आरंभ करू या. राष्ट्रीय चारित्र्याचा आदर्श श्रीरामाच्या जन्मोत्सवाच्या हार्दिक शुभेच्छा!

---

सुखात्म

**डॉ. अविनाश मोहरील**

# शब्दांच्या पलीकडले...



मोबाईल फोन टेबलवर ठेवला होता. काकू पाळण्यावर बसून त्याच्याकडे एकटक बघत होत्या. त्याच्या रिंगचा आवाज ऐकण्यासाठी कधी नव्हे त्या अतिशय आतूर झाल्या होत्या. काका तर सारखे टेबलसमोरून फेऱ्या मारत होते. ते पण त्या मोबाईलच्या रिंगची वाट बघत होते, परंतु त्यांना ते काकूला कळू द्यायचे नव्हते. 'मला काही फरक पडत नाही' असा आव त्यांनी आणला होता. सारखे काही ना काही कारण काढून त्या मोबाईलसमोरून जात येत होते व हळूच काकूंच्या नकळत त्याच्याकडे बघून घेत होते. काकूंना ते सारे कळत होते.

आज त्या काकांची गंमत करण्याच्या अवस्थेतच नव्हत्या. एरवी काकांच्या अशा वागण्यावर त्या त्यांची फिरकी घ्यायच्या, पण आज त्यांना केवळ एकाच गोष्टीची आस लागली होती. मधेच त्या काकांना म्हणाल्या, ''अहो, तो फोन सुरू आहे ना की बंद झाला, एकदा बघता का?'' काकादेखील धावत आले व पटकन फोन उचलून बघितला. ''हो ना! मी पण किती वेळचा विचार करतोय, सुरू आहे की नाही?'' काकांच्या मनातले बाहेर पडले व काकांनी लगेच सावरून घेतले... ''म्हणजे तुला फोन येणार आहे ना म्हणून म्हणतोय.'' काकू केवळ कसेनुसे हसल्या. काकांच्या मनाची अधीरता त्यांना कळत होती. आज फोन येणार म्हणून काकांनी काल रात्रीच फोन चार्ज करून ठेवला होता. विनाकारण अडचण नको जायला. तशा तर काकू खूप बोलक्या होत्या. कोणताही विषय आणि बोलायला कुणीही असो, काकू सहजच संवाद साधण्यात तरबेज होत्या. भाजी घेता घेता भाजीवाल्याशी, ऑटोरिक्षात बसल्यावर ऑटोवाल्याशी, साफसफाईवाला कचरा न्यायला आला की त्याच्याशी, धुणी भांडी करायला आलेल्या बाईशी सहजच त्या बोलायच्या व त्यामुळे या साऱ्यांची मुलेबाळे काय करतात, यांच्या घरी कोण कोण सदस्य आहेत, त्यांचा व्यवसाय किंवा काम कसे चालते या सर्व गोष्टींची खबर त्यांच्याकडे असायची. परंतु, आजच्या फोनवर मात्र काय काय बोलायचे, याचा त्यांनी सराव करून ठेवला होता. काय काय विचारायचे, कसे विचारायचे याची त्यांनी मनातल्या मनात उजळणी केली होती. त्यातील काही गोष्टी काकांनादेखील सांगून ठेवल्या होत्या. त्यांना बजावले होते की, मी बोलण्याच्या नादात या महत्त्वाच्या गोष्टी विसरली तर मला आठवण द्यायची. काकांनी देखील ते सारे मुद्दे काकूंच्या आग्रहाखातर लिहून ठेवले होते. गेली तब्बल साडेपाच वर्षे या फोनची त्या वाट बघत होत्या. साडेपाच वर्षे. तसा विचार केला तर आयुष्यातला पटकन निघून जाणारा काळ पण काकूंसाठी मात्र ही साडेपाच वर्षे फार लांब व कंटाळवाणी होती. तुळशीजवळ दिवा लावताना अशी एकही सायंकाळ नव्हती, ज्यावेळी काकूंचे डोळे पाणावले नसतील. अखेर फोन येणार असे कळले. बोलता येणार. आणि फोन वाजला! काका जोरात धावले, काकूंच्याही हृदयात एकदम धडधड झाली. पाळण्याची दांडी त्यांनी घट्ट धरून ठेवली.

काकांनी पटकन फोन उचलला. ''हॅलोऽ हॅलोऽऽ'' तिकडून आवाज आला, आपल्या मोबाईलवर उत्तम ग्राहक सेवा देण्यासाठी आम्ही काही नवीन ॲप सुरू केले आहेत, त्याची माहिती देण्यासाठी आम्ही आपणाशी संपर्क केला आहे, मराठीत माहिती सुरू ठेवण्यासाठी वगैरे वगैरे. ''नको!'' काकांनी जोरात ओरडून फोन ठेवून दिला. ''या कंपनीवाल्यांना कळतच नाही केव्हा फोन करावा आणि केव्हा करू नये. इथे आम्ही कशाची वाट बघतोय आणि यांचे काहीतरी भलतेच सुरू आहे. कसले ॲप काढतात, इथे जीव जायची वेळ आलीय.'' काकांनी त्रागा केला, पण काकूंना हे सारे ऐकू आले म्हणल्यावर त्यांनी लगेच सावरून घेतले व कसेनुसे हसत म्हणाले, ''म्हणजे तू वाट बघत आहेस आणि मधेच हा फोन.'' चिडल्यामुळे आपल्या डोळ्यातली आलेली आसवे लपविण्यासाठी ते बाजूच्या खोलीत गेले. एरवी काकूंनी त्यांच्या पाठीवर हात फिरवून त्यांना आधार दिला असता. पण आज! आज त्यांना मोबाईल समोरून उठायचे नव्हते. नियोजित वेळ उलटून गेली होती. साडेपाच वर्षांची वाट बघितल्यावरही हा एक तास काकूंना सहन झाला नाही. काकांनी मधेच 'काही खाऊन घेतेस का' म्हणून चौकशी केली होती, पण ती खाणार नाही हे त्यांना ठाऊक होतेच. एक तास उलटून गेल्यामुळे आता त्या दोघांनाही वाट बघणे अगदी असह्य झाले होते. इतक्या दिवसांनंतर मनात निर्माण झालेली आस आणि आता फोनसाठी लागणारा वेळ! काकूंच्या मनात परत धाकधूक सुरू झाली आणि काकांच्या मनात राग. अजून पंधरा मिनिटे गेली आणि फोन खणखणला. यावेळी फोन उचलण्याआधी काकांनी त्यावरील नंबर बघितला. नंबरच्या आधी +४४ लिहून आले होते. 'आला! फोन आला!' त्या क्षणी हातात फोन धरून त्यांनी डबडबलेल्या डोळ्यांनी तो काकूंना दाखविला. काकूंच्या लक्षात आले, ज्या फोनची ती दोघे गेली साडेपाच वर्षे वाट बघत आहेत तो फोन आला. आतापर्यंत सारख्या फेऱ्या मारणारे काका बाजूच्या खुर्चीत बसूनच गेले. काकूंकडे फोन निर्देशित करून त्यांनी तो केवळ धरून ठेवला. काकू पाळण्यावरून उठून फोनपर्यंत पोहोचल्या. एका हाताने काकांच्या हातून फोन घेऊन त्यांनी दुसऱ्या हाताने फोन सुरू केला व परत तो हात आपल्या डोळ्यांमधील अश्रू लपविण्याचा प्रयत्न करणाऱ्या काकांच्या हातावर ठेवला व थरथरत्या आवाजात त्या 'हॅलोऽ' म्हणाल्या, पलीकडून आवाज आला, ''हॅलो आई, कशी आहेस?'' एखाद्या पाण्याच्या बांधाला मर्यादेच्या पलीकडे रोखल्यावर एखाद्या दिवशी तो जसा सारे काही फोडून वाहू लागतो तसे काहीसे काकूंचे झाले, ते शब्द ऐकल्यावर... 'आई, कशी आहेस?' सातासमुद्रापलीकडच्या देशातून त्या माउलीचा मुलगा साडेपाच वर्षांनंतर तिला विचारत होता, 'आई तू कशी आहेस?' काकूंना त्याला खूप काही सांगायचे होते. साडेपाच वर्षांपूर्वी वडिलांशी किरकोळ कारणावरून भांडून परदेशी निघून गेलेला तिचा पोटचा पोर तिच्याशी बोलत होता. या साडेपाच वर्षांमध्ये त्याच्या वडिलांनी साडेपाच हजारवेळा तरी त्या भांडणाबद्दल माफी मागितली होती स्वतःच्या मनात. पोराला सांगता मात्र आले नव्हते. परंतु, तो निघून गेल्यानंतर एक एक क्षण किती कठीण गेला; जणू शरीरातून प्राण निघून गेला, असे काकूंना सांगायचे होते. पण काकू एक शब्दही बोलू शकल्या नाही. पुढचे दहा मिनिटे सिद्धार्थ पलीकडून 'आईऽ आईऽऽ' करीत राहिला आणि काकूंचे शब्दच खुंटले. केवळ अश्रू नि हुंदके एवढेच काय ते सिद्धार्थला ऐकू येत होते. काकूंच्या शब्दांपलीकडले जे मनातून पाझरत होते ते शब्दाविना सिद्धार्थला कळावे अशी अपेक्षा होती. परंतु, शब्दांपलीकडले समजण्यासाठी मनाने जोडलेले असणे आवश्यक असते. तशी शब्दांची ताकद फार मोठी असते. शब्दांच्या आधारे मग ते लिखित असो वा बोललेले, जग जिंकण्याची उदाहरणे सापडतात. शब्दांचे महत्त्वच थोर असते. अतूट भावनांनी बांधलेल्या मनाची साथ लाभली की शब्दांची गरजच पडत नाही. अशी शब्दांच्या पलीकडले समजणाऱ्या व्यक्तीची सोबत जेव्हा आयुष्यात लाभते ना तेव्हा, जग सुंदर भासू लागते. कारण त्या सुंदर जगात आपण नसतो तर आपल्या मनाची भाषा ओळखून आपला सांभाळ करणारे कुणीतरी असते. (पान ६ वर)

यशासाठी

डॉ. नितीन विघ्ने
भ्र. ९८२२४६२९६८

# केल्याने होत आहे रे, आधी केलेची पाहिजे!



१. केपू कर्नाटकातील एक छोटसं गाव, जिथे १९४५ साली अमायी महालिंगा नाईक यांचा जन्म झाला. त्यांची नेमकी जन्मतारीख कुणालाच माहिती नाही. गावात फक्त ११०० घरं आणि जेमतेम ६२०० च्या आसपास लोकसंख्या होती. १४ व्या वर्षी त्यांनी सुपारी आणि नारळाच्या बागेत मजुरी करायला सुरुवात केली. ना स्वतःचं घर ना जमीन. पण सातत्याने १६ वर्षे त्याची मेहनत, समर्पण आणि प्रामाणिकपणा बघून त्या बागेचे मालक महाबाला भट यांनी १९७८ मध्ये नाईक यांच्या वयाच्या ३२ व्या वर्षी दोन एकर जमीन बक्षीस म्हणून दिली. ही जमीन एका टेकडीच्या माथ्यावर होती. पूर्ण नापीक आणि ओसाड! तेथे पाण्याचा मागमूसही नव्हता.

दुसरा कोणी असता, तर त्या जमिनीचा नाद सोडून दिला असता. पण नाईक यांनी या जमिनीवर सुपारीच्या बागेचं स्वप्नं बघितलं; आणि सुरू झाला एक शोध- संघर्ष अंगावर घेणाऱ्या साहसांचा, प्रश्न पडलेल्या वाटांचा, उत्तरांच्या प्रवासाचा आणि जगण्याचा... सर्वप्रथम त्यांनी टेकडीच्या पायथ्याला कुटुंबासाठी झोपडी बांधायला सुरुवात केली. टेकडी सपाट करून घेतली. त्यासाठी भिंत बांधली. पाण्याचा प्रश्न होताच. विहीर खोदण्यासाठी पैसे नव्हते. मग ती स्वतःच खोदायचं ठरवलं आणि लागले कामाला. पहिले तीन वर्षे विहीर खोदायचा प्रयत्न जमिनीतील वेगवेगळ्या ठिकाणी करून पाहिला, पण पाणी मिळाले नाही. मग टेकडीतून आत पाणी कुठल्या दिशेला झिरपत जाते त्याचा अभ्यास केला. आधी टेकडीच्या पायथ्याला असल्यानं पाणी साठवण्याच्या प्राचीन पद्धतीप्रमाणं आडवा अरुंद बोगदा खोदायला सुरुवात केली. नंतर खालच्या दिशेने खोल जायचा प्रयत्न सुरू केला. दिवसभर भटांच्या शेतात मजुरी करायची आणि घरी आलं की, चार-पाच वातींचे दिवे घेऊन बोगदा खोदायला निघायचं. कधी कधी हे काम रात्री ९ पर्यंत चालायचं. एक बोगदा २० मीटरपर्यंत खोदल्यावर कोसळला. मग दुसरा, तिसरा करत चार बोगदे कोसळले, पण नाईकांची जिद्द थोडीसुद्धा कोसळली नव्हती. जेव्हा त्यांचे एकामागून एक अयशस्वी सुरुंगाचे खोदकाम सुरू होते, तेव्हा लोकांनी त्याची थट्टा केली. गरिबीमुळे सुरुवातीच्या काळात दर महिन्याला नातेवाईकांना घरखर्चासाठी उसने पैसे मागावे लागायचे. लोक टोमणे मारायचे. नाईक यांनी इतर लोक काय बोलतात, त्याकडे लक्ष दिले नाही. कारण जरी त्यांनी शाळा-महाविद्यालयात शिक्षण घेतले नव्हते, तरी १६ वर्षांचा निसर्गाच्या सोबतीने काम करण्याचा जबरदस्त अनुभव होता. गरजही होती आणि कशा पद्धतीने काम केले तर यश मिळू शकेल, याचा अनुभवावर आधारित अंदाज होता. त्या आधारावरच आत्मनिर्भरतेचे स्वप्न त्यांनी पाहिले होते. म्हणूनच चार बोगदे कोसळले तरीही पाचवा बोगदा खोदायला सुरुवात केली. टेकडी आणि पाणी दोघांनीही त्यांच्यापुढं हार मानली आणि ३१५ फूट लांबीचा बोगदा खोदल्यावर एक पाण्याचा झरा लागला. त्यांची जमीन ज्या उताराच्या टेकड्यांवर होती त्या उताराच्या टेकड्यांमध्ये खोलवर बोगदे खोदून आणि बोगद्यांमधून टेकड्यांच्या आतड्यांमध्ये अडकलेले भूजल काढून हे साध्य केले. या प्रयत्नात यश मिळाल्यानंतर, त्यांनी पिण्यासाठी आणि घरगुती वापरासाठी पाणी आणण्यासाठी आणखी एक बोगदा खोदला. या बोगद्यांच्या अथक प्रयत्नांमुळे त्यांना 'द टनेल मॅन ऑफ कर्नाटक' असे टोपणनाव मिळाले. त्यांनी एकट्याने शेताच्या सभोवतालच्या टेकड्यांमध्ये सुमारे ३०० पाझर खंदके आणि दोन पाझर तलाव आणि १२ हजार लिटर क्षमतेचा एक हौद बांधला. त्यांच्या कामामुळे एका निर्जन आणि ओसाड जमिनीचे रूपांतर सुपारी, नारळाची झाडे, काजूची झाडे, केळीची रोपे आणि मिरचीच्या वेलींनी बनलेले हिरवेगार ओएसिसमध्ये झाले.

नाईक यांचे शेत एक आदर्श शेत बनले आहे आणि दरवर्षी १००० हून अधिक पर्यटक येतात, ज्यात अनेक परदेशी पर्यटकांचा समावेश आहे. सुपारीच्या झाडाच्या खोडाचा पाईपसारखा वापर करून ते पाणी घरापर्यंत आणलं. काही वर्षांपूर्वी बघितलेल्या एका वेड्या स्वप्नाच्या शोधात सुरू झालेला प्रवास एकट्यानं केला. लिहिताना किंवा वाचताना जरी हे सगळं एवढं सहज वाटत असलं, तरी नाईक यांनी ऑलिम्पिकच्या स्वीमिंग पुलापेक्षा दीड पट मोठा बोगदा खोदला होता. तेसुद्धा सतत आठ वर्षं आणि सुमारे २३ हजार तास एकट्याने काम करून...! अक्षरशः एक एक थेंब पाण्यासाठी त्यांनी अथक संघर्ष केला. आज नाईक यांच्या शेतात ३०० पेक्षा जास्त सुपारीची, ७५ नारळांची, १५० काजूची, २०० केळीची आणि मिरचीची झाडं आहेत. संपूर्ण सेंद्रिय शेती आहे आणि ऊर्जेचा वापर शून्य! नाईकांच्या शेतात एक थेंब पाण्याचादेखील अपव्यय होत नाही. प्रत्येक थेंबाचा पुनर्वापर केला जातो. शिक्षण, तंत्रज्ञान, जमीन आणि साधनसंपत्ती यांपैकी काहीही नसताना निखळ मेहनतीच्या जोरावर प्रत्येक अडथळ्यांवर मात करून अशक्य गोष्टी वास्तवात बदलता येतात, हे त्यांनी सिद्ध केलंय. 'आदिके पाथ्रीके' या कृषी मासिकाचे संपादक पाद्रे यांनी नाईक यांची कहाणी इतर शेतकऱ्यांना प्रेरणा देण्यासाठी प्रकाशित केली. नाईक यांच्या यशोगाथेबद्दल जाणून घेतलेल्या इतर शेतकऱ्यांनी त्यांच्या शेती पद्धतींबद्दल, विशेषतः पाणीपुरवठा सुनिश्चित करण्याच्या आणि पाण्याचे संवर्धन करण्याच्या पद्धतींबद्दल अधिक जाणून घेण्यासाठी त्यांच्या शेताला भेट दिली. तसेच आज देश-विदेशातून हजारो लोक त्यांच्या पाणी पुरवठा पद्धतीचा अभ्यास करायला भेट देतात. ३२ व्या वर्षी दोन एकर जमीन मिळाल्यानंतर ४० वर्षांच्या सातत्यपूर्ण प्रचंड मेहनतीनंतर वयाच्या ७२ व्या वर्षी सुखाचे दिवस मिळालेत. आज ८० वर्षे वय झाले तरी नाईक शेतातली सगळी कामं आणि कष्ट स्वतः करतात. त्यांचे हे अजोड कार्य पाहून त्यांना २०२२ साली त्यांच्या वयाच्या ७७ व्या कृषी विषयातील पद्मश्री पुरस्कार देऊन त्यांना गौरविण्यात आले.

२. एक एकर शेतीचा चमत्कार शेतकऱ्यांना त्यांच्या मालाला अपेक्षित भाव मिळत नाही. त्यांनी शेतीसाठी केलेला खर्चही भरून निघत नाही. डोक्यावर कर्जाचे डोंगर वाढत जातात. मुलांना शिक्षण आणि शेतकरी असूनही पोटाला अन्न मिळत नाही. या परिस्थितीने त्रासून हजारो शेतकऱ्यांनी आत्महत्या केली. मात्र, तुमच्या-आमच्या सारख्या साधारण ग्राहकाला घरी भाजी-फळे महागच मिळतात. म्हणजे मूळ उत्पादक शेतकरी गरीब आणि उपभोक्ता त्रासलेला; मात्र मध्ये मलई खाणारे अडतीये श्रीमंत अशी परिस्थिती सगळीकडे कायम आहे. आपण खातो ते धान्य, भाजीपाला आणि फळे यांना सोडून इतर ज्याही वस्तू आपण वापरतो त्यात सर्वप्रथम उत्पादन, यातायात किंवा वाहनाचा खर्च याची बेरीज केली जाते. त्यावर मग ठोक व्यापारी, चिल्लर व्यापारी यांच्या मिळकतीची व्यवस्था म्हणून त्यांची मार्जिन जोडली जाते; मग त्यावर विविध प्रकारचे कर लावल्यानंतर उपभोक्त्याने कोणत्या किमतीत खरेदी करावे ती किंमत ठरवली जाते. त्यामुळे जो वस्तूंचे संशोधन, उत्पादन, विपणन, व्यापार करतो त्या सर्वांना त्यांचा चरितार्थ चालण्यासाठी अडचण येत नाही. मात्र, शेतीमालाची किंमत ठरवताना त्याचा उत्पादन खर्च विचारात न घेता बाजारातील दलाल त्या मालाची किंमत ठरवतात किंवा सरकार त्याचा हमीभाव ठरवतात. मात्र, शेतकऱ्याला कधीच त्याने मेहनतीने पिकविलेल्या मालाची किंमत ठरवता येत नाही. शिवाय नैसर्गिक आपत्ती, कमी किंवा जास्त पाऊस, वादळ-वारा, पिकांवर येणारे रोग, बीबियाणांच्या व खतांच्या व जंतुनाशकांच्या भरमसाट किमती, विजेची बिले या सगळ्या अडचणींना शेतकरीच तोंड देतो. त्यात जर शेतकऱ्याची जमीन कमी असेल तर त्याच्या अडचणी आणखी वाढतात. गावातील शेतमजुरांना सरकारतर्फे कमी किमतीत धान्य व पैसे मिळत असल्यामुळे शेतीत काम करायला मजूरच मिळत नाहीत. या सगळ्या अडचणींना तोंड देण्यासाठी 'अभिनव फार्मरस क्लब' ही शेतकऱ्यांनी शेतकऱ्यांसाठी तयार केलेली महाराष्ट्रातील पुण्याच्या मुळशी तालुक्यातील सहकारी संस्था आहे. संस्थेच्या सुरुवातीला १५ ऑगष्ट २००४ या दिवशी एकूण १५३ हेक्टर जमिनीचे मालक असलेले ११ शेतकरी एकत्र आलेत. National Bank for Agriculture and Rural Development आणि ATMA यांच्या मदतीने या सगळ्या शेतकऱ्यांना एकत्र आणून ही संस्था स्थापन झाली.

शेतकरी ते ग्राहक थेट विक्री या एका अभिनव कल्पनेने हजारो शेतकऱ्यांना गरिबीतून वर काढून श्रीमंत बनवणारे शेतकरी आहेत ज्ञानेश्वर बोडके. त्यांना मारण्याचेसुद्धा प्रयत्न झाले, पण त्यांनी हार मानली नाही. एप्रिल २००८ साली या संस्थेला राष्ट्रीय पुरस्कार मिळाला. आजपर्यंत महाराष्ट्र, मध्य प्रदेश, गुजरात, उत्तर प्रदेश, आंध्रप्रदेश, कर्नाटक आणि तेलंगणा राज्यातील शेतकरी मिळून आज एकूण १ लाख ५६ हजार शेतकरी या संस्थेत सहभागी झाले आहेत. या संस्थेतर्फे क्लब पॉली हाऊसमध्ये फूल आणि भाज्यांचे उत्पादन घेऊन ते मुंबई-दिल्लीसारख्या मोठ्या शहरातील ग्राहकांना व चिल्लर विक्रेत्यांना थेट विकतात. त्यामुळे मध्ये कुणीही दलाल नसल्यामुळे ग्राहकांना कमी किमतीत देऊनही शेतकऱ्यांना जास्त नफा मिळतो. कोरोना काळात ॲप वापरून या संस्थेने भरपूर नफा कमावला तसेच पुण्यातील शेकडो परिवारांना त्यांच्या फ्लॅट व बाल्कनीमध्ये ताजी भाजी पिकवायला मदत करीत आहेत. 'अभिनव फार्मर्स क्लब' या आपल्या संस्थेच्या माध्यमातून ज्ञानेश्वर बोडके यांनी देशातील सुमारे एक लाख शेतकऱ्यांना एकत्र आणून 'एक एकर शेती आणि एक देशी गाय' या मॉडेलचा वापर करून त्यांच्या आयुष्यात समृद्धी आणली. अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून, रासायनिक खते न वापरता, शेण व गांढूळ खत व सेंद्रिय पद्धतीने केलेली शेती आणि ग्राहकांपर्यंत थेट पोहोचणारी विक्री प्रणाली व कौशल्य यामुळे शेतकरी आणि ग्राहक या दोघांनाही आर्थिक व आरोग्याचा फायदा होत आहे. तसेच नवीन 'अभिनव कार्ट' मोबाईल ॲपमुळे ग्राहकाला थेट शेतकऱ्याशी संपर्क साधणे सोपे झाले आहे. भाजीतील अनावश्यक भाग काढून लगेच शिजवता येईल अशा पॅकिंगमध्ये भाज्या उपलब्ध झाल्यामुळे मोठ्या शहरातील ग्राहकांचा वेळ वाचतो. जैविक कचरा कमी होऊन शेतात त्यापासून नैसर्गिक खत निर्माण करता येत. धान्य, भाजी, फळे, फुले व ३२ गुणवत्तेचे भारतीय गायींचे दूधही ग्राहकांना उपलब्ध होतेय. तेव्हा रामराज्य येण्यासाठी, आपल्या युवक-युवतींना रोजगार मिळावा, शेतकऱ्यांना न्याय मिळावा व भारताच्या सर्वांगीण सुरक्षेसाठी अशा संस्था मोठ्या होण्याची खूप गरज आहे. केल्याने होत आहे रे, आधी केलेची पाहिजे! (लेखक सायकॉलॉजिस्ट, करीअर कौन्सेलर व सॉफ्ट स्किल्स ट्रेनर आहेत.)



## तोचि स्थिरावला । ब्रह्मानंदी ।।

ज्याचे त्याचे भाग्य । लाभतो विलास ।।
कोणाच्या वाट्यास । क्लेश येतो ।।१।।

कोणी विकारात । गुंते रात्रंदिन ।।
तया कैसे भान । पाप-पुण्य ।।२।।

कर्म फळासाठी । आशेने राबतो ।।
गुंतूनीया जातो । जन्मभर ।।३।।

मनाच्या मंदिरी । ज्याच्या वाजे टाळ ।।
भाग्यवान बाळ । विठ्ठलाचा ।।४।।

जगाच्या बाजारी । विरक्त जगला ।।
तोचि स्थिरावला । ब्रह्मानंदी ।।५।।

प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
९४०३०२९१७८



## भजन

माणसा भजन हरीचे सोडू नको माया खेळ मोहक,
तू अडकू नको जो चांगला तो भावे मनाला कटकट
होता धरी रागाला परी जीव तो शिवच आहे भला
तू ऐक्य तेवढे सोडू नको माणसा भजन हरीचे सोडू
नको क्षण सुखाचे आपुलकीचे क्षणात होई नावडतीचे
इंद्रियांचे व्यवहार फुकाचे तू 'जाण' पवित्र नको माणसा
भजन हरीचे सोडू नको मना मनाचे खेळ मोहक रचती
नाते, दिसतील सुबक कोण कुणाचे, कसे सुखदायक?
स्मरण आत्म्याचे कधी टाळू नको माणसा भजन हरीचे
सोडू नको. काळ येई काळ जाई अंश त्याचा हा विसर
होई परी भ्रमाचा पाईक होई जन्म लाभला तो घालवू
नको माणसा भजन हरीचे नको.

अतुल ठाकरे

## क्षितिज

निळी निळी संध्याकाळ
निळे जांभळे आकाश
निळ्या निळ्या क्षितिजाशी
निळसर अवकाश निळा पाऊस पाऊस निळे
सावळे आभाळ निळ्या निळ्या वाऱ्यावर
निळ्या फुलांचीच माळ
जाई-जुईच्या कळ्यांचा गंध निळा निळा
मंद जीव उमलून येई असा हिरवासा छंद
रंगभूल पावसाळी निळी नितळ निर्मळ
निळ्या निळ्या धुक्यामागे
निळेनिळे निळे जळ

जयश्री दाणी

# प्राचीन 'ती'





कोणे एके काळी

स्वाती काळे (कोलारकर)

प्राचीन भारतीय संस्कृतीत शिक्षणाला अतिशय महत्त्व होते. भारतीय स्त्रिया उच्चविद्याविभूषित होत्या. वैदिक काळातील वेदाध्ययनापासून भारतीय शिक्षण पद्धतीचा जन्म झाला आणि पुढील काळात बौद्ध विद्यापीठांनी तिचा विकास घडवला. वयाच्या आठव्या वर्षी मुलींचाही उपनयन विधी होऊन त्यांना गुरुगृही पाठवले जाई. स्त्री विद्यार्थिनींचे 'सद्योवध्व:' आणि 'ब्रह्मवादिनी' असे दोन प्रकार होते. शिक्षणानंतर लग्न करून गृहस्थाश्रमी प्रवेश करणाऱ्या मुलींना 'सद्योवध्वः' म्हणत. वेदाभ्यासाला पूर्णवेळ देणाऱ्या स्त्रियांना 'ब्रह्मवादिन्यः' म्हणत. या ब्रह्मवादिनी आश्रमांमध्ये विद्यार्थ्यांना शिकवायच्या.

तपोमय आणि तेजस्वी जीवन त्या जगायच्या. गृहस्थाश्रम स्वीकारला तरी स्त्री घराची स्वामिनी होती. 'जाया इद अस्तं' असे विश्वामित्र म्हणतात. काही ब्रह्मवाहिनी ऋषिपदाला पोहोचल्या होत्या. महारोगाने पछाडलेल्या काक्षिवत ऋषिकन्या घोषाने वडिलांच्या इच्छेमुळे अतिशय मेहनतीने ऋषिपद प्राप्त केले होते. ऋग्वेदाचे दहाव्या मंडळात तिची दोन सुक्ते आहेत. लोपमुद्रा ही अगस्ती ऋषींची पत्नी आणि विदर्भ देशाची राजकन्या. ऋग्वेदातील पहिल्या मंडलात तिने रचलेल्या दोन ऋचा आहेत. विश्ववरा आणि सुकन्या या दोघीसुद्धा ऋषिपदाला पोहोचलेल्या विदुषी. विश्ववराने ऋग्वेदात अग्निदेवतेला उद्देशून सहा ऋचा रचल्या आहेत. वेदोत्तर काळात गार्गी आणि मैत्रेयी या प्रसिद्ध पंडिता होत्या. त्या याज्ञवल्क्य ऋषींशी बरोबरीने चर्चा करीत असत. मैत्रेयी याज्ञवल्क्य ऋषींची पत्नी परंतु ऐहिक जीवनापासून पूर्णत्वाने अलिप्त होती. याज्ञवल्क्य आणि मैत्रेयी या विद्वान पती-पत्नीमधील परमात्मा आणि जीवात्मा यासंबंधीची गहन चर्चा बृहदारण्यकोपनिषदात आहे. गार्गी मिथिला नरेश महाराजा जनकाच्या दरबारात

नवरत्नांमधील एक रत्न होती. तिने वेदांमधील संहिता लिहिल्या; त्याचबरोबर 'गार्गी संहिता' नावाचे पुस्तकही लिहिले. तिने याज्ञवल्क्य ऋषींना निसर्गातील वस्तूंच्या उत्पत्तीचे कारण विचारले होते. लवकुशाबरोबर वाल्मीकिच्या आश्रमात आलेली आत्रेयीसुद्धा अतिशय विद्वान होती. खरं कारण काळालाच माहीत. एक कारण असे पुढे येते की, त्यानंतर कर्मकांडाचे महत्त्व वाढले आणि अभ्यासाचा कालावधी वाढल्याने स्त्रियांनी एवढी वर्षे आश्रमात राहणे योग्य ठरत नव्हते किंवा असेही असू शकते की, त्या काळात कृषिप्रधान व्यवस्था आकाराला येत होती. जनपदांच्या रूपाने राष्ट्र ही संकल्पना अंकुरत होती. स्त्रीचा गर्भ प्रजोत्पादनाच्या आणि पर्यायाने समूह शक्तीच्या दृष्टीने महत्त्वाचा होता. त्यावर सत्ता मिळविणे ही त्यावेळच्या समाजाची गरज होती. यातून निर्माण झालेली हीच ती पुरुषप्रधान संस्कृती. वेदोत्तर काळात स्त्रियांचे शिक्षणासाठी आश्रमात जाणे बंद झाले असेलही; तरीही स्त्री शिक्षण पूर्णपणे बंद झाले नसावे. हे शिक्षण आश्रमातून न देता मातापित्यांकडून दिले जात असावे. महाभारतातील विराट पर्वात अर्जुन स्त्रीवेष घेऊन विराट नगरीतील राजकन्या आणि इतर स्त्रियांना लिहिणे-वाचणे आणि इतर कला शिकवी, असे वर्णन आहे. नल राजा दमयंतीला प्रेमपत्र लिहून राजहंसाकडून पोहोचवतो. जर दमयंतीला लिहिता-वाचता येत नसतं तर नलराजाने पत्र लिहिण्याचा एवढा खटाटोप कशाला केला असता? कालिदासाची शकुंतला दुष्यंताला प्रेमपत्र लिहिते. संस्कृत नाटकातील स्त्रियांच्या तोंडी संस्कृत सुभाषितेसुद्धा येतात. यावरून वेदोत्तर काळात स्त्रियांच्या शिक्षणाकडे पूर्णपणे दुर्लक्ष झाले, असे म्हणता येणार नाही. रामायण-महाभारत काळात स्त्रियांची शिक्षणाबद्दल परिस्थिती आणखीनच खालावली असं म्हणतात. पण त्या काळातील स्त्रियांच्या चरित्राचा अभ्यास केला असता त्यांच्याबद्दल आदरच वाटतो. पुरुषप्रधान संस्कृतीने चारी बाजूंनी घेरले असून ही स्त्रियांनी त्यांची अस्मिता कायम ठेवली. रामायणामध्ये कौशल्या आणि तारा यांना 'मंत्रविदू' म्हटले आहे. त्या युद्धशास्त्रात पारंगत होत्या. महाभारतात अनेक स्त्री व्यक्तिरेखांचे जाळे आहे.

एकही स्त्री व्यक्तिरेखा दुर्बळ नक्कीच नाही. पण सर्व व्यक्तिरेखांमध्ये जास्त भावणारी व्यक्तिरेखा द्रौपदीची आहे. तिला 'पंडिता' म्हटले आहे. कारण तिची बुद्धिमत्ता प्रगल्भ आणि विचारसरणी स्वतंत्र आहे. ज्या काळी स्त्रीकडे केवळ मालमत्ता म्हणून बघितले जायचे त्या काळातदेखील तिने पुरुषांना युद्धात प्रवृत्त केले आहे आणि प्रेमात वश करून घेतले आहे. स्त्रीबुद्धीला पोषक वातावरण नसतानाही तिने अनेक प्रसंगात पांडित्य दाखवले आहे. वनपर्वातील द्रौपदी-सत्यभामा संवाद वाचनीय आहे. सत्यभामा द्रौपदीला विचारते की, ती पाच पंडू पुत्रांना कशी सांभाळते? यावर तिने दिलेले उत्तर आजच्या काळातील महिलांनादेखील विचारप्रवृत्त करायला लावणारे आहे. ती म्हणते, तिजोरीतील पैसा येतो कोठून आणि खर्च होतो कसा, याची संपूर्ण माहिती तिच्याजवळ आहे. तिजोरीवर सर्वार्थाने नियंत्रण तिचे आहे. आजच्या काळातदेखील नवऱ्याचा बँकेतील व्यवहार तपासण्याएवढ्या बायका सुज्ञ नाहीत. पण सहा हजार वर्षांपूर्वीच्या द्रौपदीला केवढे प्रचंड व्यवहारज्ञान आहे, हे बघून मन थक्क होते. द्युतपर्वात द्रौपदीच्या प्राकृतिक शक्तीचे आणि पांडित्याचे दर्शन झाले आहे. द्रुपद राजाने धृष्टद्युम्न्याच्या बरोबरीने द्रौपदीलाही सर्व विद्यांमध्ये पारंगत केले होते. राज्यशास्त्रात तिने नैपुण्य मिळविले होते. "कितवाने स्वतः दास्य पत्करले असताना माझ्यावर पण कसा लावू शकतो?" असा सडेतोड प्रश्न ती सभेत उपस्थित करते. यावेळी ती युधिष्ठिराला त्याच्या नावाने संबोधित नाही तर 'कीतव' म्हणजे जुगारी असे म्हणते. व्यास महाभारतातील रूढ कथानकात धृतराष्ट्राकडून प्राप्त झालेल्या वराच्या आधारे द्रौपदीने पांडवांची सुटका केल्याचे वर्णन आहे. पण काही प्राचीन कवींनी द्रौपदीला स्वकर्तृत्ववान ठरवले आहे. ती दुर्योधनाला द्युताचे आव्हान देते आणि स्वतःच त्याच्याशी खेळत दोन डावात त्याला हरवून पांडवांची सुटका करून घेते.

कवी नामा पाठक (इ. स. १४५०-१५००) यांनी असे वर्णन केले आहे- "मग फासे घेऊनी उदकी टाकीले मग समस्तही उठीले म्हणती द्रोपदीया जींकिले आपेसे घेतले कौरवी." वीरेश्वर याची एक जुनी तंजावरी कवितादेखील द्रौपदीने द्युत जिंकल्याची साक्ष देते. ते म्हणतात, "बैसली सभेसि देवि कंजरीटलोचनी शोभली नभात जेंवि दिव्यरूप दामिनी." कवी किंकर यांच्या द्रौपदी वस्त्रहरणात तसेच कृष्णयाज्ञवल्की याच्या 'कथाकल्पतरू' या काव्यसंग्रहातदेखील द्रौपदीच्या द्युत कौशल्याचे वर्णन केले आहे. अनेक प्राचीन कवींच्या डोक्यातून निघालेली एक कल्पना म्हणून या घटनेकडे पाहण्यापेक्षा द्रौपदीच्या द्युतनैपुण्याला कोणत्या अज्ञात लोकमहाभारताचा आधार आहे का हे तपासून पाहिले पाहिजे. द्रौपदीनंतर महाभारतातील सत्यभामादेखील अनेक प्रसंगात प्रगल्भ प्रज्ञा दाखवते. जेव्हा कृष्ण आणि सत्यभामा नरकासुराने लुटलेली संपत्ती आणायला स्वर्गापर्यंत पोहोचले तेव्हा त्यांना एक पारिजातकाचे झाड दिसले. सत्यभामेला त्यावर फुललेली फुले फार आवडली. सत्यभामेने कृष्णाला म्हटले, "हे कृष्णा, जर तुझ्या मनात माझ्याबद्दल प्रीती असेल तर हे झाड माझ्या बागेत लाव." पण इंद्राला त्याच्या पत्नीसाठी हे झाड स्वर्गातच पाहिजे होते. सत्यभामेने इंद्राशी केलेला युक्तिवाद विलक्षण आहे. ती इंद्राला म्हणते, "जर हे झाड समुद्रमंथनातून बाहेर निघाले आहे तर त्यावर एकाचाच हक्क का? जर तुमच्या पत्नीला तिच्या पतीच्या कर्तबगारीवर मिळवलेले हे झाड आहे असे वाटत असेल तर तिला सांगा की, सत्यभामा हे झाड नेते आहे आणि तिला क्षमा करू नकोस. तिला सांगा की एक मर्त्य मानव ते झाड पृथ्वीवर नेते आहे." मालमत्ता सर्वांची असताना फक्त देवांनीच का फायदा घ्यावा, हा खडा सवाल साक्षात देवाधिराज इंद्राला विचारण्याचे धैर्य सत्यभामेत होते. दुर्दैवाने पुढे सत्यभामा रुक्मिणीबाबत अतिशय मत्सरी होती, असं या कथेत उपकथा जोडून सांगण्यात आलं. स्त्री तेजाचे सामर्थ्य झळाळत असताना उगीचच स्त्री मत्सराचे बीज या कथेत का पेरण्यात आले कोण जाणे. युद्धभूमीवर प्राचीन भारतीय स्त्रियांनी शौर्य गाजवले होते. विश्पला या स्त्रीच्या युद्धात अधू झालेल्या पायाची शस्त्रक्रिया आश्विन ऋषींनी केल्याचा उल्लेख ऋग्वेदात आढळतो. कैकेयीने दशरथाला युद्धात मदत केली होती. इंद्रसेनेने युद्धात पतीचे सारथ्य केले होते. त्यानंतर सामाजिक परिस्थितीनुसार स्त्रियांना अनेक बंधने घातली गेली तरी स्त्रिया त्यांच्या अंगभूत हुशारीने नेहमीच फिनिक्स पक्ष्याप्रमाणे आकाशी झेपावत राहिल्या. मेगास्थेनिसने आपल्या प्रवास वर्णनात पांड्य देशातील स्त्री राज्याचा उल्लेख केला आहे. गुप्त काळात वाकाटक राणी प्रभावती गुप्ता आणि सातवाहन राणी नयनिका यांनी राज्य कारभार केले. चालुक्य राजा विक्रमादित्याच्या एका प्रांताचा कारभार राजकुमारी विजयभट्टारिका चालवीत असे. प्राचीन काळी इतर अनेक देशांमधील स्त्रीजीवन म्हणजे एक भयावह शोकांतिका होती. त्यासाठी रोमन कायदा, प्राचीन ग्रीसमधील स्त्रीच्या आयुष्याचा अभ्यास करायला हवा. या जागतिक पृष्ठभूमीवर प्राचीन भारतीय स्त्रीजीवन निश्चितच संपन्न आणि समृद्ध वाटते. काही अपवाद वगळता भारतीय समाजाने स्त्रियांबद्दल नेहमीच सुसंस्कृतता आणि सभ्यता दाखवली आहे. प्राचीन काळी प्रगत राष्ट्र अस्तित्वात नव्हते. महाभारत काळात जनपदे विकासास येत होती. जनपद काळामध्ये माणसे टोळ्यांमध्ये राहायची त्यामुळे प्रजनन क्षमतेला निश्चितच अतिशय महत्त्व होतं. यातूनच स्त्रिया म्हणजे मालमत्ता ही भावना गडद झाली असावी. असे असले तरी भारतीय स्त्रियांनी काळाच्या आवर्तनात आपले स्थान त्यांच्यामध्ये असलेल्या अंगभूत बुद्धिचातुर्याने आणि सामर्थ्याने टिकवून ठेवले.

# बदललेल्या चैत्राचे संदर्भ

ऋतूरंग.....
किरण डोंगरदिवे
भ्र. ७५८८५६५५७६

चैत्र पाडवा हा चैत्रमासाची सुरुवात करून देणारा दिवस. झाडांवर पानकळीच्या निर्जीव मरगळीनंतर नाजूक लाल हिरवे केशरी असे कोंब फुटून नवीन पालवी घेऊन सर्व वनराई प्रसन्नतेने हसत असते. पळसासारख्या रान सुंदर करणाऱ्या फुलांचा मोहर झडला तरी हिरव्या ओलसर शेंगा त्या झाडाला लटकलेल्या असतात. एखाद्या झाडाला त्या इतक्या मोठ्या प्रमाणात असतात की शेंगांचे झुंबर झाडावर लटकवले की काय? असे वाटू लागते. पळसाची नवी पाने आकार घेऊ लागतात. पूर्वी आया-बाया कुरडया करण्यासाठी आम्हा लेकरांना माळरानावर पिटाळून पळसाचे पाने तोडून आणायला लावत. ही तोडलेली पाने पाण्यात भिजू घालून त्यात दोन तीन चमचे तेल टाकले आणि त्यावर कुरडया करायला लागल्या की त्या पानाचे महत्त्व पटायचे. तसेही लग्नातील पंक्तीत पळसाच्या पत्रावळीवर जेवायला बसल्यावर ते पटलेले असायचेच. तिळाच्या कुरडयासाठी तीळ आणून ते स्वच्छ धुऊन वाळू घातले की ते ओलसर तीळ मुठभर घेऊन खाण्यात जी मजा होती ती आज पाकिटातली स्वच्छ पांढरे शुभ्र तीळ खाण्यात नक्कीच नाही हे मी अनुभवाने सांगतो.

कुरडया करण्याच्या निमित्ताने चार घरच्या बाया एकत्र येत, चार घरच्या बाजा जमा केल्या जात. गहू भिजायला टाकण्यापासून तर कुरडया वाळेपर्यंत आणि नंतर ज्यांनी करू लागल्या त्यांच्या घरी नव्हाळी पोहोचेपर्यंत ह्या बाया एकमेकांच्या सुखदुःखात सहभागी झालेल्या असत. कुरड्याप्रमाणे शेवाळ्या आणि पापड ह्या जिनसाही घरीच तयार केल्या जातात.आमरस आणि शेवाळ्या याची लज्जत मॅगीला नाही हे नवीन पिढीला सांगून समजणार नाही. फार दिवसानंतर गावातच कुणीतरी तिळाच्या कुरडया करून देतात म्हणून तेथून आणलेल्या कुरडया दोन वर्ष संपत नाहीत हे सत्य आपल्या घरी केलेल्या कुरडयाची सर इतरत्र येत नाही हे सांगण्यासाठी पुरेसं आहे. चैत्रामधला निसर्ग माणसाला भुरळ घालेल असे काय आहे त्यात? चैत्रा मधली फुललेली वनराई तर फाल्गुना-तही होतीच ना? अरे हो चैत्रामध्ये फुलांसोबत वनराई आकाराला येतात ती फळे, आंब्याचा मोहर हिरव्या कैरीत परावर्तित झालेला असतो आणि त्या कैर्यातून पाडाला पिकलेला एखादा आंबा मनाला मोहवित असतो. देऊळगाव कुंडपाळ या माझ्या मूळच्या गावी अगदी तिसरी चौथीत असताना आजोबांनी राखायला म्हणून घेतलेला आंबा, त्याचे पार पडल्यावर ते पाड खाण्यासाठी धावणे. झाडावर आलेली माकडे हाकलण्यासाठी दगड उचलून त्याच्याकडे फेकणे. त्या झाडावर आलेल्या वेगवेगळ्या पक्षांची पिसे जमा करणे. ती पिसे एका वहीत चिटकवणे आणि शाळा सुरू झाल्यावर उन्हाळ्यातील प्रकल्प किंवा उपक्रम म्हणून शाळेत दाखवणे हे सर्व अगदी काल आज घडल्यासारखे आठवते. त्या काळात बाजारात आंबे मिळत ते १७ च्या हिशोबाने, आजोबा गेले, आजी गेली, बाबा गेले आंबा गेला आणि नवीन पिढीला फार गोड आहे असे म्हणून किलोने मिळणारे केशर, बदाम, लालबाग, आणि हापूसच्या नावाने जिथे आपण फसू तो आंबा घेऊन खाऊ घालताना स्वतःचे बालपण आणि नवीन पिढीचे बालपण यांची तुलना केल्यावर नवीन पिढीच्या बालपणाची खरोखरच दया येते. काटा वो लाल असे म्हणत लाड भडक टरबूज विकणारा एखादा रहीम त्याच्या अजूनही आठवडे बाजारात दिसतो. मात्र, काटा वो कितना लाल? याची त्याची त्यालाच खात्री नसल्याने त्याचा आवाज त्याच्यापुरता मर्यादित असतो. हे सर्व आठवल्यावर आता आपल्या हातात निसर्ग दत्त असे काहीच उरलेले नाही हेही लक्षात ठेवावे लागते.



**बहरलेल्या पळसाचा फुलोरा गळायला सुरुवात झालेली. पळसाच्या, काटेसावरीच्या झाडाखाली निर्जीव होऊन पडलेली लाल फुले चैतन्याचा भर ओसरल्यावर येणारी मरगळ कशी असते? याची प्रचिती देणारे असतात. फाल्गुन हा वसंताच्या आगमनाची बिगुल वाजवणारा जणू वसंताच्या बालपणीचा काळ दर्शवणारा तर चैत्र हा वसंताच्या ऐन तारुण्याचा बहरलेला काळ दर्शवणारा महिना होय. फाल्गुनातली रंगपंचमी संपली की चाहूल लागते ती चैत्र पाडव्याची.**

चैत्रातील झाडाचे पालवी जितकी आकर्षक असते तितकेच आकर्षक असायचे या ऋतूमधील सणवार, गुढीपाडव्याच्या दिवशी कोणतेही किंतु परंतु मनात न ठेवता घराघरावर गुढ्या उभारल्या जायच्या, आंब्याचा आणि लिंबाचा पाला, होळीच्या दिवशी आलेल्या साखरगाठ्या, घरातील गृहिणीसाठी घेत-लेली नवी कोरी साडी किंवा पातळ असा साज लेवून गुढी उभे राहायची. पुढे गुढीची जागा भगव्या झेंड्यांनी घेतली मग हळूहळू भगवा रंग हा विशिष्ट धर्मापुरता मर्यादित झाला मग इतर अनेकघरांवरच्या गुढ्या १४ एप्रिल आंबेडकर जयंतीच्या दिवशी पंचशील ध्वजामध्ये किंवा निळ्या रंगाच्या ध्वजामध्ये परावर्तित झाल्या. कुठेतरी गुढीपाडवा हा सण एका आसूरी आनंदातून साजरा केला जात असल्याचा फतवा काढण्यात आला.

गुढीपाडवा म्हणजे मराठी नववर्ष दिवस या भावनेपुरता तो सण मर्यादित झाला. गुढीपाडव्यानंतर रामनवमी, हनुमान जयंती जयंती, गुड फ्रायडे आणि एखाद्या चैत्र महिन्यात येणारा रमजान ईद महोत्सव असा समावेशक उत्साह चैत्र महिन्यात आढळून येतो. त्याशिवाय चैत्र महिन्यात अथवा वसंत ऋतुमध्ये डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती ही सुद्धा जातीयतेच्या रणरणत्या उन्हामध्ये हक्काची सावली मिळवून देणार्या महापुरुषाची आठवण करून देण्यासाठी येते असे मला वाटते.

चैत्रातील निसर्ग आपल्या चरम सीमेवर असतो, प्रणयधुंद पक्षी एकमेकांना हाका घालत असतात, संपूर्ण सृष्टी सृजनासाठी आसुसलेली असते. वडाच्या झाडावर लालबुंद फळांचा फडाशा पडत एकाच वेळी वेगवेगळ्या प्रकारचे पक्षी गाणी म्हणत असतात. कडूलिंबाच्या झाडावरील निंबोळ्या पिकल्यावर त्याही आंब्या इतक्या स्वादिष्ट लागतात हे सांगणारी आजी आज घरात नसल्याने आणि दारातही कडुलिंब नसल्याने लिंबाचे आयुर्वेदिक फायदे आम्हाला फक्त पुस्तकात वाचावे लागतात. पळस, पळस पांगरा आणि काटेसावरी या झाडांची फुले गळून यांना आता शेंगा आणि फळे लागलेली दिसून येतात.

निसर्गातली ही लालीमा कमी होऊ लागते त्याच वेळी गुलमोहर हळूहळू लाल तांबड्या कळ्या मधून बाहेर डोकावून निसर्गातील लाल रंगाचे संतुलन कायम ठेवण्यासाठी कार्यरत होऊ लागतो. रणरणत्या उन्हात फिरून यावे ते गुलमोहर हे सांगण्यासाठीच गुलजारसारख्या माणसाला गुलमोहर गर तुम्हारा नाम होता सारख्या गीताचे बोल सुचले असते नाही का? गुलमोहराच्या शेंगांच्या तलवारी हातात घेऊन ज्यांनी शिवाजी आणि तानाजी खेळले त्या पिढीतील लोकांनाही आता फुललेला गुलमोहर पाहायला वेळ नाही असे चित्र दिसते. चैत्रामध्ये झाडावर पक्षांचे घरटे आकार घेऊ लागतात. अंगणातील आभाळातून संध्याकाळच्या वेळी बगळ्याची रांग उडू लागली की, बगळ्या बगळ्या दूध दे, पाची बोटं रंगू दे... हे म्हणण्याचा संदर्भ बगळा दुधासारखा पांढरा असतो इथपर्यंत ठीक पण पाच बोटे रंगण्याचा त्याचा काय संबंध? अशा प्रश्नांचा विचार करायला त्यावेळी फुरसत नव्हती हेच खरे. चैत्रातल्या उन्हात सुरू व्हायचे ते परीक्षेचे दिवस, अभ्यास करण्यापासून, एकमेकांना आपला पेपर न दाखवण्यापासून तर आपला नंबर कितवा येईल, याचा अंदाज काढण्यात बर्यापैकी दिवस निघून जात असतं, आता खर्या अर्थाने ती गंमतच नष्ट झाल्यासारखी वाटते. आपण पासच होणार ह्या जाणिवेतून पेपर झाल्याबरोबर आपले जुने पुस्तक अर्ध्या किमतीत विकून पुढील वर्गातील हुशार आणि आत्मविश्वासू मुलाकडून त्याची पुस्तक अर्ध्या किमतीत घेणारे त्या पिढीतील जवळपास मुले आज यशस्वी जीवन जगत असावेत असे मला राहून राहून वाटत असते. निकाल लागल्यावर मामाच्या घरी जाण्याचे संदर्भ आजच्या काळात जवळपास संपुष्टात आले असावेत असे वाटते. (पान ६ वर)

पान१ वरून

## अमेरिकेच्या व्यापारयुद्धामागची रणनीती




चीनने अमेरिकेचे निर्बंध टाळण्यासाठी व्हिएतनाम आणि मेक्सिकोसारख्या देशांमध्ये उत्पादन करायला सुरुवात केली आहे. त्यासोबतच जगभरातील बंदरे, रस्ते, रेल्वेमार्ग आणि विमानतळ बांधणी क्षेत्रातही चीनने आघाडी घेतलेली दिसते. जागतिक व्यापारात होणार्या फायद्यांमुळे चीनसाठी ही गुंतवणूक करणे शक्य झाले आहे. जर आंतरराष्ट्रीय व्यापाराची ही साखळी तोडली, तर चीनची गुंतवणूक वाया जाऊन त्याचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होऊ शकेल. चीनची अर्थव्यवस्था मंदावली असून, चीनच्या अर्थव्यवस्थेत सुमारे २५ टक्के वाटा असलेल्या गृहनिर्माण क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर मंदी आली आहे. अमेरिकेच्या नेतृत्वाखाली चालणारी आंतरराष्ट्रीय व्यापार व्यवस्था मोडकळीस आली, तर चीन हा दबाव सहन करू शकणार नाही. सध्याच्या आंतरराष्ट्रीय व्यवस्थेत सर्वच देशांचे आर्थिक भवितव्य गुंतले आहे. अमेरिकेला असे वाटत असावे की, बाकीचे देश अमेरिकेकडून केल्या जाणाऱ्या सेवांच्या निर्यातीवर कर लादू शकणार नाहीत. दुसरे म्हणजे, अमेरिका कायम स्वतःचा विचार करते. अशा निर्णयांमुळे जगभरात अगदी आपल्या मित्रदेशांमध्ये काय परिणाम होतील, याची फिकीर अमेरिकेला नाही. आर्थिक संकटांचे पर्यावसान युद्ध, यादवी आणि सत्ता परिवर्तनात झाले तर काय, या प्रश्नाचे उत्तर अमेरिकेकडे नाही. खुद्द अमेरिकेत शेअर बाजार, वित्तीय संस्था आणि तंत्रज्ञान क्षेत्रात लाखो लोक काम करतात. ट्रम्प यांच्या निर्णयांमुळे अमेरिकेत मंदीची भीती निर्माण झाली असून, अनेक कंपन्यांनी आपले प्रकल्प थांबवण्याचा निर्णय घ्यायला सुरुवात केली आहे. त्यामुळे एकूणच हे प्रकरण अत्यंत गुंतागुंतीचे बनत चालले आहे.

पान१ वरून

## ‘बिमस्टेक’ची फलश्रुति



मात्र, २०३० ‘बँकॉक व्हिजन’मध्ये संपूर्ण कामांचा रोडमॅप आखण्यात आला आहे. शिवाय, कृषी आणि पशुचिकित्सा या विषयांवर काम करणाऱ्या प्रशिक्षण केंद्रांसंदर्भातही प्रस्ताव ठेवला. ‘बोधि’ उपक्रमाअंतर्गत एकूण सदस्य देशांच्या एकूण ३०० सदस्यांना शिष्यवृत्ती देण्यात येणार आहे. यात संशोधक, विद्यार्थ्यांना प्रशिक्षण दिले जाईल. २०२७ मध्ये होणाऱ्या ३० व्या ‘बिमस्टेक’ शिखर परिषदेचे यजमानपद भारताकडे असेल. यावेळी युवावर्गाला एकत्रित आणण्यासाठी भारत युवा नेता संमेलन, ‘हॅकेथॉन’सह अन्य कार्यक्रमांची घोषणा केली. याशिवाय, शिखर परिषदेतील देशांनी नौवहन करारावर स्वाक्षरी केली आहे. याचा फायदा या देशांत होणाऱ्या सागरी वाहतुकीला लागणाऱ्या परवानग्या संदर्भात होणार आहे. ‘बिमस्टेक’च्या देशांशी जोडणारा एक भारतीय संस्कृतीचा दुवाही कायम आहे. इथल्या वास्तू कला आणि बुद्धांच्या विशालकाय ४६ मीटर लांब प्रतिमा असलेल्या बँकॉकच्या ‘वात फो’ मंदिराला मोदींनी भेट दिली. यावेळी थायलंडच्या पंतप्रधान पैतोंगतार्न शिनावात्रा उपस्थित होत्या. भारत आणि थायलंडच्या दृढ संबंधांच्या आठवणीही जाग्या केल्या. चीनच्या विस्तारवादाला जरब बसविण्याचा हा भारताचा प्रयत्न यशस्वी होण्यासाठी या देशांना सोबत घेऊन चालणे हाच एक पर्याय आहे.

पान१ वरून

## ‘वक्फ नंतर’ची राजकीय परिस्थिती

एकप्रकारे, विधेयक संयुक्त संसदीय समितीकडे पाठवण्याची भूमिका घेऊन, विरोधकांनी आपल्याच पायावर आणि आपापल्या पक्षाच्या मतपेटीवर घाव घातला आहे, हे विधेयकावरील चर्चेदरम्यान त्यांच्या लक्षात आलं. म्हणूनच संसदेत घडलेल्या चर्चेत विरोधकांचा फार दम दिसला नाही. चर्चा गरम झाली, पण त्यातून विरोधकांनी भाजपाला अनेक फुल टॉस चेंडू दिले. विरोधकांचे अनेक मुद्दे किती तकलादू आहेत, हे दाखवण्यात आणि विरोधकांना उघडं पाडण्यात, भाजपा, यावेळी कमालीचं, यशस्वी झालंय, हे नक्की. म्हणजेच नजिकच्या भविष्यात विरोधकांच्या हातातील मुस्लिम मतांमधे भेग पाडण्यात मोदींचं राजकारण यशस्वी झालंय, हे सकृतदर्शनी चित्र दिसत आहे.


कदाचित आज याचे ताबडतोब पुरेसे परिणाम दिसतील असं लगेच म्हणता येणार नाही. पण मुस्लिम मतं आपल्या गाठीशी बांधून ठेवण्यात, खूप मोठा आधार असलेलं वक्फ नावाचं हुकुमी पान, विरोधकांच्या हातातून काढून घेण्यात, भाजपाचे दोन्ही एक्के यशस्वी झालेत. आता इथून पुढे राजकीव पट मोदी शहा मांडणार. म्हणजे इतके दिवस मोदी शहा, समोर आलेले डाव यशस्वीपणे उधळून लावत होते. पण आता सर्व राजकीय पट मोदी शहा मांडतील आणि विरोधकांना त्यावरून चाचपडत चालणं भाग पाडतील. पुढील खेळी छठ्ठ असेल. त्याला फार विरोध होईल असं चित्र आज दिसत नाही. यावेळी पहिल्यांदा घडलेली अजून एक गोष्ट म्हणजे, पूर्ण भारतात कुठेही रामनवमीच्या उत्सवावर आणि शोभायात्रेवर दंगल, गडबड झाल्याची बातमी आली नाही. कारण वक्फ निमित्ताने आक्रमक मुस्लिम आणि मवाळ, गरीब, गरजू, मुस्लिम असा भेद करण्यात मोदी शहा यशासी झालेत. अगदी बंगाल मध्ये सुद्धा रामनवमी उत्सवावर कोणतंही गालबोट लागल्याची बातमी नाही.

असो मेमध्ये कमी जागा मिळाल्याने धास्तावलेला सनातन हिंदू समाज, गेल्या ११ महिन्यातील घटनांनी एकजूट होण्यास मदत झाली आहे. मोदी आजच्या घडीला, अल्पमतातील सर्वात बलवान पंतप्रधान दिसत आहेत. कारण नितीश, नायडू यांच्यासारख्या नेत्यांना आज उलट भीती बसली आहे की, मोदी कधीही सरकार मोडून, मध्यावधी निवडणुका घेऊ शकतात. जर तसं घडलंच तर त्यांच्यासह सर्वच विरोधकांचं पानिपत मोदी करू शकतात, याची चुणुक, हरियाणा, महाराष्ट्र आणि दिल्ली यांनी दाखवून दिली आहे. म्हणजेच अल्पमत हे मोदींनी आपल्या कामाच्या आणि लोकप्रियतेच्या जोरावर बलस्थानात परिवर्तित करवून घेतलं आहे.

## वेड्या बहिणीची वेडी रे माया

ललित
रश्मी वाघमारे

मोठी दुर्गा आणि गौरी दोघी लहानशा वस्तीत राहणाऱ्या अनाथ, पोरक्या बहिणी! दुर्गा १७-१८ वर्षांची आणि गौरी तिच्यापेक्षा लहान. एका एनजीओनी दत्तक घेतलेली त्यांची वस्ती, त्यामुळे त्या दोघींचा शिक्षणाचा खर्च तिथूनच होत असे. पोरक्या असल्यामुळे आजूबाजूंच्या बायाबापड्या दुर्गा-गौरीला प्रेमाने वागवीत. चार घरची कामे करून आपले जीवनयापन करणाऱ्या त्या दोघी परिस्थितीमुळे समजूतदार. दुर्गा नेहमी गौरीला स्वतःची जबाबदारी असल्यागत पाहत असे. गौरी थोडीशी अल्लड, लहान. त्यामुळे कधी कधी तिला रागवावं लागे. मात्र, दुर्गाचे आपल्या गौरीवर नितांत प्रेम!



एक दिवस कसल्याशा समारंभात गौरीने कार्यक्रमाच्या स्थळी खूप सुंदर नक्षीदार रांगोळी काढली. समारंभाला आलेल्या पाहुणेबाई खूश झाल्या. ‘‘अरे वा! किती सुंदर आहे ही नक्षीदार कलाकृती! कुठे आहे ती मुलगी? बोलावता का तिला. आपण एखादे रीतसर शिक्षण देऊ.’’ दुर्गाला खूप आनंद झाला. त्यानंतर साऱ्या गोष्टी भराभर घडल्या. त्या बाईंनी गौरीला ज्वेलरी डिझायनिंग संस्थेत घातले. गौरीची आकलन शक्ती तिच्या विषयात अजोड होती. गौरी ज्वेलरी डिझाईनिंगच्या क्लासला जाऊ लागली, खूप आनंदाने, उत्साहाने! खरं तर ज्वेलरी डिझाईनिंग हे क्षेत्र जरा वरच्या वर्गातले; मात्र आपल्या गौरीला जे हवे ते शिकायला मिळते आहे, याचा दुर्गाला कोण अभिमान. दुर्गा जिवापाड मेहनत करून तिला जे पाहिजे ते देण्याचा प्रयत्न करीत असे. गौरी कधी कधी त्या क्लासमध्ये कुचेष्टेचा विषय होई. तिच्या बरोबरीच्या मुली तिच्याकडे तुच्छ नजरेने बघत. असाच एक दिवस.. आकस्मिक परीक्षा. त्यात गौरीचे डिझाईन पहिल्या क्रमांकावर होते. सोनियाचा दुसरा नंबर आला. ती खूप तणतणली व मॅडमला तिचे वडील या शिक्षण संस्थेचे सर्वेसर्वा असल्याची जाणीव करून दिली. नाईलाजाने मॅडमने स्वतःच्या भवितव्याचा विचार करून सोनियाला पहिला व गौरीला दुसरा क्रमांक दिला. गौरी खंतावली, घरी आल्यावर तिच्या भावनांचा बांध फुटला व ती आक्रंदत दुर्गाला विचारू लागली... ‘आपण गरीब का आहोत दीदी?’ दुर्गाने तिला जवळ घेतले. ‘काय झालं?’ तिने सारी कहाणी सांगितली.

दुर्गा म्हणाली, ‘‘थोडे सहन कर; हेही दिवस जातील बघ. तू तुझ्या कलेवर लक्ष दे.’’ गेले वर्षभर गौरीने खूप मेहनत घेतली होती. आता तिची वार्षिक परीक्षा होती. त्यासाठी तिला काही सामान लागणार होते, जे त्यांच्या दृष्टीने अत्यंत महागडे असे होते. कसे करायचे, एवढे पैसे कुठून आणायचे, दुर्गाला प्रश्न पडला. तिने अजून दोन घरची कामे वाढवली, तरीही गौरीला लागणारा खर्च त्यातून निघणार नव्हता. गौरीची परीक्षा होती. त्या दिवशी सगळ्यांना एका विशिष्ट ठिकाणी तयार होऊन जायचे होते. दुर्गाने कसाबसा एक नवीन पांढरा ड्रेस खरेदी केला गौरीसाठी. त्यावर घालायला काही दागिने हवे होते. गौरीने शक्कल लढवली.

तिने कल्पकतेने मोगऱ्याच्या कळ्यांचे काही दागिने बनवले. त्या पांढऱ्या ड्रेसवर ते दागिने घातले. त्यादिवशी अनेक सुंदर महागड्या कपडे व दागिने घातलेल्या इतर मुलींमध्ये गौरी उठून दिसत होती. तिच्या चेहऱ्यावरचे अत्यंत सोज्वळ भाव, मोगऱ्याच्या कळ्यांचे दागिने, पांढऱ्या कपड्याचा एक लांबसर परकर पोलका आणि त्यावर पांढरीच ओढणी ती जणू सात्त्विकतेची मूर्ती वाटत होती. गौरीच्या सहजसुंदर सौंदर्याला खुलेल असा साज होता.

तिच्या या रूपाकडे पाहून सभागृहात टाळ्यांचा कडकडाट झाला. गौरी अव्वल ठरली. आजूबाजूला असणाऱ्या कितीतरी महागडे कपडे दागिने घातलेल्या इतर मुलींचा मात्र जळफळाट झाला. एक म्हणाली, ‘‘अरे हे तर चार आण्याचे. यात काय एवढं. गौरी मुळातच हळवी; तिच्या कानावर हे संभाषण जावे, असेच त्या मुली बोलत होत्या. गौरीचे डोळे भरून आले. तिला आठवले आपल्या दीदीने किती कठीण परिस्थितीत आजचा हा सगळा साजशृंगार जुळवून आणला आहे. तिने हळूच डोळे पुसले आणि ती त्या मुलींसमोर येऊन उभी राहिली. ‘‘हे बघा, मी जे काही केलं आहे त्याच्याशी माझ्या घरच्या आर्थिक स्थितीचा संबंध जोडू नका. माझे अव्वल येणे तुमच्यासारख्या ‘आहे रे’ लोकांना खुपणारचं!’’ तेवढ्यात त्या फॅशन शोचे सर्वेसर्वा तिथे आले आणि त्यांनी जाहीर केले‘आजचे प्रथम पारितोषिक ‘गौरी रावते.’ सभागृहात मागे बसलेल्या दुर्गाचे डोळे भरून आले. यानंतर गौरीला पुढे अभ्यास करायचा होता. गौरीची संघर्ष यात्रा सुरू झाली. कितीही योग्यता असली, तरी ओळखीशिवाय कुणीही काम द्यायला तयार नव्हते. दुर्गा तिच्या परीने प्रयत्न करीत होती. मात्र दोन निराश्रित मुली, कोण त्यांच्याकडे लक्ष देणार? गौरी आपला नियमित अभ्यास करू लागली. आपली शैक्षणिक पात्रता वाढवू या, असा विचार करून कसेबसे स्वतःला ती रेटत होती. एक दिवस अचानक तिची दीदी कुठेतरी निघून गेली. गौरी उन्मळून पडली. ‘दीदी तू हे काय केलेस? मला एकटीला सोडून कशी गेलीस तू? तुझा तर कुणी मित्रही नव्हता?’ साऱ्या वस्तीमध्ये दुर्गाची बदनामी होऊ लागली. गौरीचा आत्मविश्वास ढासळला, ती मानसिकदृष्ट्या विस्कळीत झाली. वस्तीतले लोक वेडेवाकडे बोलू लागले होते. दुर्गा कुठेतरी निघून गेली होती. गौरीचाही विश्वास बसू लागला की, आपली दीदी आपल्याला मध्येच सोडून निघून गेली आहे, कुणाबरोबर तरी! असेच सहा महिने गेले आणि एक दिवस गौरीला समोरच्या टपरीवर फोन आला. दुर्गा बोलत होती उत्साहाने.. आनंदाने.. ‘‘गौरी, तुझे काम झाले!’’ ‘‘काय...?’’ गौरी मोठ्याने ओरडली. ‘‘तू आहेस कुठे दीदी...’’ दुर्गाने सांगितले, ‘‘मी इथे अहमदाबादला येऊन एका मोठ्या डायमंड ज्वेलर्सच्या घरी नोकरी करते आहे. त्यांच्याकडे छोट्या बाळाला सांभाळते आहे. खूप कष्ट करून त्यांचा विश्वास संपादन केला आहे.’’ ‘‘त्यांना तुझे सर्व कागदपत्र दाखवले आहेत. ते तुला त्यांच्याकडे काम देणार आहेत व पुढे तुझ्याच विषयात उच्च शिक्षण करायची संधी देणार आहेत. त्यांच्या भल्या मोठ्या बंगल्यात आऊट हाऊसमध्ये एक खोलीही देणार आहेत.’’ ‘‘दीदी, तू यासाठी निघून गेलीस, मला न सांगता. मी काय विचार केला. आणि तू माझ्यासाठी इतक्या लांब निघून गेली.’’ गौरी रडत रडत म्हणाली.

दुर्गा म्हणाली, ‘‘हे बघ वेडे, ते सर्व काही महत्त्वाचे नाही. तुझ्या हातात जादू आहे आणि तुला पाहिजे ते शिक्षण घेता येत नाही. मी तुला निराश होऊ देणार नाही, तू माझी जबाबदारी आहेस. मी तुला असे सांगितले असते, तर तू मला कधीही इतक्या दूर एकट्याने येऊ दिले नसते.’’ ‘‘... तू आता तयारी करून ठेव. मी येते.’’ गौरीला आनंदाने काय बोलावे ते सुचेना. तिच्यात एक वेगळाच उत्साह संचारला होता. दोन बहिणींचा संघर्ष, त्यांची वेडी माया... त्याला फळ मिळाले होते. ‘‘देवा, खरंच तू आहेस.’’ गौरी म्हणाली आणि तिची साधीशी सूटकेस स्वच्छ करू लागली.

# रथावरी आरूढ रावण, प्रभू मात्र अनवाणी

संत
प्रकाश एदलाबादकर

**आपदां अपहरतारम दातारं सर्वसंपदां। लोकाभिरामं श्रीरामं भूयो भूयो नमाम्यहं।। भर्जनं भवबीजानामर्जनं सुखसंपदां। तर्जनं यमदूतानां रामरामेति गर्जनं ।।** सर्व संकटांचे हरण करून यमदूतांचीही भीती नष्ट करणाऱ्या प्रभू रामचंद्रांचा अवतरण दिन नुकताच साजरा केला. प्रभू रामचंद्र आणि भगवान श्रीकृष्ण म्हणजे आमच्या अविनाशी आणि अक्षर अशा संस्कृतीचे दोन विजयस्तंभ. प्रभुरामचंद्र ही सर्व आपदांचे, संकटांचे, दुष्टप्रवृत्तीचे, हरण करणारी देवता आहे. प्रभू रामचंद्रांच्या अयोध्येतील विशाल मंदिराचे आपण बघितलेले स्वप्न पूर्ण झालेले आहे. प्रभूंच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा होण्यासाठी किती शतकांचा संघर्ष आपण केला! परकीय आक्रांतच्या पाशवी खुणा अजूनही काही शिल्लक आहेत. येणाऱ्या काळात त्या पूर्णतः मिटणार हे निश्‍चित. प्रभूंना आपण परमेश्वराचा अवतार मानतो. का घ्यावा लागला रामाला अवतार? प्रभूंनी स्वतः सांगितलेले आहे की, मानव धर्माच्या रक्षणासाठी मी अवतार घेतलेला आहे.



वाल्मीकि रामायणाच्या अरण्यकांडात एक श्लोक आहे. **किन्नुवक्ष्याम्यहं देवी त्वयैवोक्त मिदं वच। क्षत्रियैर्धार्यते चापो नार्तशब्दो भवेदिती।। अप्प्यहं जीवितं जह्यामब त्वां वा सति सलक्ष्मणां। न तुं प्रतिज्ञा संश्रुत्य ब्राह्मणेभ्यो विशेषतः।।** 'आपण सध्या तापसी वेषात आहोत तेव्हा तापस वेषात शास्त्रे का धारण करता?' असे एका प्रसंगात सीतेने रामाला विचारलेले आहे. त्यावर 'तापसी वेषात असलो, तरी मी प्रथमतः क्षत्रीय आहे. क्षात्र धर्म हा माझा प्रथम धर्म आहे. मानव धर्म आणि सज्जनरक्षणासाठीच द्वापारयुगातील आपल्या अवतार कार्याचे उद्दिष्टही श्रीकृष्णानेही गीतेत स्पष्टपणे सांगितलेले आहे. 'यदा यदा हि धर्मस्य...।' परमेश्वराचा कोणताही अवतार असो, त्याचे उद्दिष्टच मानवधर्माचे रक्षण असते. सर्व प्राणिमात्रांचे कल्याण करणे हाच त्याचा हेतू असतो. अरण्यकांडात मारिचाच्या तोंडी एक श्लोक आहे. त्यात त्याने, रामाचा शत्रू असूनही, रामाच्या साधुत्वाची, सत्यनिष्ठेची, धर्मपालनाची आणि लोककल्याणाची प्रशस्ती केली आहे. मारिच म्हणतो... **रामो विग्रहवान धर्मः साधू सत्य पराक्रमः। राजा सर्वस्य लोकस्य देवानामिव वासवः।। नच धर्मगुणैर्हिनः कौसल्यानंदवर्धनः। नच तीक्ष्णो दि भूतानां सर्व भूतहिते रतः।।** 'रामचरित मानस' ज्याला आपण तुलसीरामायण म्हणतो, त्याचे कर्ते महान रामभक्त संतप्रवर गोस्वामी तुलसीदासांना रामरूपात विलीन होऊन चारशेच्यावर वर्षे होऊन गेलीत, परंतु त्याची आणि त्यांचे तुलसीरामायण आजही चिरंजीव आहे.

वाल्मीकि रामायणाच्या खालोखाल ज्याला संपूर्ण विश्वात मान्यता प्राप्त झालेली आहे, ज्याचे पठण-पाठण अत्यंत पुण्यप्रद समजले जाते; तो ग्रंथ म्हणजे गोस्वामी संत तुलसीदासांचे 'रामचरित मानस!' या रामचरित मानसातील लंकाकांडात एक अत्यंत हृद्य प्रसंग आहे. या प्रसंगातून गोस्वामीजींनी प्रभूंचे संपूर्ण व्यक्तिमत्त्वच उभे केलेले आहे. प्रसंग आहे राम-रावण युद्ध सुरू होण्याच्या घडीचा. रावण हा महापराक्रमी होता. त्याच्या पराक्रमाची आणि युद्धकौशल्याची वर्णने अनेक ठिकाणी आलेली आहेत. रावण आपल्या प्रचंड रथात बसून आणि सर्व शस्त्रास्त्र संभारासहित युद्धभूमीवर येतोय. त्याला बघून तिथे असलेल्या बिभीषणाच्या हृदयाचा ठोकाच चुकतो. पायात पादत्राण नसलेले, केवळ धनुष्य-बाण हेच शस्त्र असलेले, घोडे-रथ असे कुठलेही युद्धवाहन नसलेले, अयोध्येचे हे राजकुमार या रावणाला कसे सामोरे जातील आणि त्याच्याशी कसे लढतील, हीच एक चिंता बिभीषणाला लागली. गोस्वामीजी लिहितात... **रावनु रथी बिरथ रघुबीरा। देख बिभीषन भयउ अधीरा।। अधिक प्रीती मन भा संदेहा। बंदी चरन कह सहित सनेहा।। नाथ न रथ नहि तन पद त्राना। केही बिधि जितब बीर बलवाना।। सुनहु सखा कह कृपानिधाना। जेही जय होई सो स्यंदन आना ।।** 'प्रभू, तुमच्या जवळ रथ नाही, पादत्राण नाही. कसे जिंकणार तुम्ही ह्या बलवान रावणाला?' प्रभू रामचंद्रांविषयीच्या काळजीने आणि भीतीपोटी निर्माण झालेल्या शंकेने, बिभीषणाने विचारलेल्या प्रश्नाला प्रभूंनी जे उत्तर दिले आहे ते आज घडीला आपण सर्वांनी नुसते ऐकणे, वाचणे किंवा कुणाला सांगणे पुरेसे नाही. ते उत्तर म्हणजे आपल्या अंगी बनवण्याचे गुण आहेत. कोणतेही आणि कितीही मोठे संकट आले तरी मनाचे धैर्य टिकवून ठेवायला हवे. ते मनोधैर्य कसे येते याचे उत्तर प्रभूंनी दिलेले आहे. प्रभू म्हणतात, 'अरे बिभीषणा, नसेल माझ्याजवळ रावणासारखा रथ, नसतील तशी शस्त्रे आणि अस्त्रे, परंतु ज्या रथावर मला आरूढ होऊन युद्ध जिंकायचे आहे माझा तो रथ वेगळा आहे.'

मी ही शस्त्रे धारण केली आहेत.' हे प्रभुरामचंद्राने भगवती सीतेला दिलेले उत्तर आहे. प्रभू रामचंद्र पुढे असेही म्हणाले की, 'माझ्या वचनांचे मी काटेकोरपणे पालन करीन.' प्रभू रामचंद्र मानव धर्माच्या रक्षणास अवतार घेते झाले, त्यासाठीच आपण जन्माला आलो, अशी त्यांची ग्वाही आहे. ते आपला आदर्श आहेत. अशा प्रभू रामांचा जन्मोत्सव आपण धडाक्याने साजरा करीत असतो. यापूर्वीही वर्षानुवर्षे साजरा केला आणि येणाऱ्या काळातही करू. परंतु मानव धर्माच्या रक्षणाचे काय?

रामाने त्रेतायुगात कोदंड धारण करून दुष्टशक्तींचा नाश केला. त्या दुष्टांच्या पारिपत्यासाठी सर्वसामान्य वनचरांना एकत्र आणले. त्यांची मने आपल्या वाणीने प्रज्वलित केली. राम स्वतःच अग्निरूप होते, चंडप्रतापी होते. एकट्या रामाला वंदन करणे म्हणजे पुराणांतरीच्या तीन रामांना वंदन करणे होय, असे गोस्वामी तुलसीदासांनी म्हटलेले आहे. गोस्वामी तुलसीदास म्हणजे प्रभू रामचंद्रांचे निस्सीम भक्त. भारताच्या संतांच्या मांदियाळीत गोस्वामीजींचे नाव अग्रस्थानी आहे. भारतवर्षात वाल्मीकि रामायणाखालोखाल जर कोणते रामायण सर्वाधिक लोकप्रिय असेल तर ते गोस्वामीजींचे 'रामचरित मानस' अर्थात तुलसी रामायण! संस्कृतचे गाढे विद्वान असलेल्या गोस्वामीजींनी ब्रज आणि अवधी भाषेत विपुल रचना केली आहे. हनुमान चालीसा, पार्वती मंगल, जानकी मंगल, कृष्ण गीतावली, बरवै रामायण या ग्रंथांसोबतच रामचरित मानस आणि विनयपत्रिका हे त्यांचे प्रसिद्ध ग्रंथ आहेत. संत तुलसीदासांची प्रतिभा महाकवीची होती. त्यांच्या साहित्यातून केवळ अध्यात्माच नाही तर तत्कालीन सामाजिकतेच्या दृष्टीने लोकप्रबोधनही आहे. त्यांच्या प्रत्येक शब्दातून रामनिष्ठा प्रकटलेली आहे. रचनेमध्ये कोणतीही कृत्रिमता नाही. एखाद्याच्या मननातून, चिंतनातून सहजोद्‌गार निघावे असे त्यांचे शब्दसामर्थ्य आहे. गोस्वामीजींनी भक्तीचे एक आंदोलनच निर्माण केले. रामभक्तीचा प्रचार आणि प्रसार केला. असे करत असताना त्यांचे काव्यकर्तृत्व उजळून निघाले. समन्वयशील वृत्ती आणि लोकांचे आत्मभान जागृत करणे हा त्यांचा विशेष गुण होता. शैव आणि वैष्णव परंपरांना त्यांनी एकत्रित आणले. यासाठी भगवान विष्णूंचा अवतार प्रभू श्रीरामचंद्र आणि रुद्राचा अकरावा अवतार महाबली हनुमान ही त्यांची आराध्य दैवते ठरली. कोदंडधारी राम हे तर त्यांचे परम आराध्य दैवत होते. **बंदउं नाम राम रघुवरको। हेतू कृसानु भानू हिमकरको ।।** कृशान म्हणजे अग्नी. अग्निकुळातील परशुराम. भानू म्हणजे सूर्य. सूर्यकुळातील दाशरथी राम आणि हिमकर म्हणजे चन्द्र. चन्द्रकुळातील बलराम! केवळ राम या एकाच नावाच्या उच्चाराने या तीनाही रामांना वंदन घडते, असे गोस्वामीजी म्हणतात.

या तिन्ही रामांनी त्यांच्या त्यांच्या काळात पराक्रमाचा इतिहास घडविलेला आहे. क्षात्रधर्माचे हे तीन आदर्श आहेत. कशासाठी त्यांनी हा क्षात्रधर्म स्वीकारला? दुष्टांचा समूळ नाश करून धर्मरक्षण आणि समाजातील सज्जनशक्तींचे रक्षण करायला! 'रामः शस्त्रभृतांमहं' असे प्रत्यक्ष भगवान श्रीकृष्णाने गीतेत सांगितले आहे.


या आगळ्या-वेगळ्या स्पंदनाचे म्हणजे रथाचे वर्णन करताना प्रभू म्हणतात... **सौरज धीरज तेही रथ चाका। सत्य सील दृढ ध्वजा पताका।। बल विवेक दम परहित घोरे। छमा कृपा समता रजु जोरे।। ईस भजनु सारथी सुजाना। बिरती चर्म संतोष कृपाना।। दान परसु बुधि सक्ति प्रचंडा। बर बिग्यान कठिन कोदंडा।।** 'बिभीषणा, तुला दिसत नाही माझा रथ? अरे सख्या बिभीषणा नीट बघ. शौर्य आणि धैर्य ही माझ्या रथाची चाके आहेत. सत्य आणि शील-चारित्र्य हे माझ्या रथावरील ध्वज आणि पताका आहेत. शारीरिक-मानसिक बख, विवेक बुद्धी, दम म्हणजे इंद्रियनिग्रह आणि परोपकार-परहित हे चार घोडे रथाला आहेत. क्षमाशीलता, कृपा आणि सर्वांप्रती समानता या दोऱ्यांनी (रजू) हे घोडे रथाला जोडलेले आहेत. माझा सारथी म्हणजे परमेश्वराचे भजन आणि चिंतन तर वैराग्य हीच माझी ढाल (चर्म) आहे. संतोष ही माझी तलवार आहे. दानधर्म हाच माझा परशु आणि श्रेष्ठ असे विज्ञान माझे कोदंड आहे, माझे धनुष्य आहे.' रामाचा रथ आणि आपल्या प्रपंचाच्या रथाची तुलना करून बघा. रामाचा रथ आणि आपला राष्ट्ररथ यांची तुलना करून बघा. हे दोन्ही रथ हाकायलाही याच गुणांची आवश्यकता आहे. समोरचा शत्रू बलाढ्य असताना साधनांचा अभाव असो किंवा सामग्रीची कमतरता असो, शरीर आणि मुख्यतः मन खंबीर हवे.


आजघडीला या खंबीरतेची आवश्यकता आहे. शासनकर्त्यांपासून ते सामान्य माणसापर्यंत याच शौर्य आणि धैर्याची गरज आहे. जीवनाचा रथ हाकताना म्हणजेच जगात वावरताना सुख-दुःखाचे अडचणींचे अनेक प्रसंग समोर येतात. यासाठी आपल्या प्रपंचाचा रथही रामरथासारखाच असायला हवा. प्रभू पुढे म्हणतात. **अमल अचल मन त्रोन समाना। यम जम नियम सिलीमुख नाना।। कवच अभेद बिप्र गुर पूजा। एहि सम बिजय उपाय न दूजा।। सखा धर्ममय अस रथ जाकें। जीतन कह न कतहुं रिपु ताकें ।। महा अजय संसार रिपु जीति सकई सो बीर । जाके अस रथ होइ दृढ सुनहु सखा मती धीर।।** 'सख्या बिभीषणा, माझे पापरहित, स्वच्छ आणि स्थिर मन म्हणजे माझ्या बाणांचा भाता आहे. (पान ६ वर)

---

मागे एका लेखात देवपूजेच्या औषधी द्रव्याची आपण माहिती घेतली. आजच्या लेखात आणखी काही औषधी द्रव्यांची माहिती घेऊ या...

# देवपुजेची औषधी द्रव्ये





आजीचा बटवा
नारायण कारंजकर
भ्र. ९४२३७५८४०१

**रूई अगर मंदार:-** रूईचे झाड सर्वत्र प्रसिध्द आहे. हनुमान भक्त रूईच्या पानांची व फुलांची माळ श्री. मारुतीरायाच्या गळ्यात घालतात. रूई हे वातव्याधीवरील प्रभावी औषध आहे. वायूने अंग ठणकत असल्यास त्यावर रूईच्या पानाचा शेक द्यावा. मस्तक वायूवर- रूईची पिकलेली पाने बांधावीत. अपस्मारावर रूईच्या चिकात रान शेणीची राख भिजवून सुकवावी. व ती तपकिरीप्रमाणे ओढावी म्हणजे शिंका येऊन डोके उतरते. फार शिंका आल्यास उतारा म्हणून नकात तूप घालावे.

**गंडमाळेवर:-** रूईच्या चिकात हिराकस खलून त्याचा गंडमाळेवर लेप द्यावा. बदाची गाठ बसण्यास रूईच्या चिकात धूप कालवून त्याचा लेप द्यावा. अर्धांगवायूवर रूईची पाने दुषित भागावर बांधावीत, म्हणजे वेदना कमी होतात. रूईच्या विषावर चिंचेचा पाला वाटून लेप केल्यास रूईचा दोष नष्ट होतो.

**कापूर:-** कापूर एक प्रकारच्या झाडापासून निघतो. जखमेत कीड पडली तर कापूर, तूप, मध यात घोटून मलमकरून लावावे. इसबावर कापूर एक तोळा, पांढरा कात एक तोळा व शेंदूर अर्धातोळा ही एकत्र करून गाईच्या लोण्यात काशाच्या ताटात काशाच्या वाटीने घोटावे व ते मलमइसबावर लावावे. रुग्णास प्रथमएरंडेल देऊन कोठा साफ करून घ्यावा.

**झेंडू:-** झेंडूची फुले दसरा, दिवाळीला शोभेच्या दृष्टीने हार व तोरणे करून लावतात. अंगावर पित्त उठल्यास झेंडूच्या पानाचा रस चोळावा, गांधील माशी चावल्यास झेंडूच्या पानाचा रस त्याजागी चोळावा.

**जास्वंदीची फुले:-** प्रदर व मूळव्याधीवर जास्वंदीचे मूळ गाईच्या दूधात उगाळून खडीसाखर घालून दिल्यास गुण येतो. रक्तातिसारावर पांढऱ्या जास्वंदीचे फूल नागकेशर घालून खडी साखरेतून दोन वेळा दिवसातून द्यावे. पित्त शमविण्यास पांढऱ्या जास्वंदीच्या पानाचा रस काढून घ्यावा.

**कुंकू :-** कुंकू हळदीपासून तयार करतात. यात खरा गुण हळदीचा आहे.

**निशिगंध:-** तिव्र विषाने पुरळ अगर फोड उठल्यावर निशिगंधाची फुले बारीक वाटून त्यात चंदनाचे गंध मिसळून दुषित भागावर चोळावे.

देश जागेवर लेप करावा. उपदंशावर पांढऱ्या कन्हेरीचे मूळ उगाळून वाटून त्यात चंदनाचे गंध मिसळून दुषित लोण्यात कालवून चट्ट्यावर लेप करावा. डोके दुखीवर पांढर्या व तांबड्या कन्हेरीचे मूळ पाण्यात उगाळून कपाळावर

**केळी:-** श्रीसत्यनारायण पूजेत केळी अवश्य लागतात. केळीच्या पानाचा उपयोग जेवणासाठी करतात. केळ फुलांची भाजी होते आणि केळ फळाचा खाण्यासाठी उपयोग होते.

पोटात विष गेल्यास केळीच्या गाभ्याचा रस काढून पाजावा. जिभेस खर येते त्यावर पिकलेली केळी गाईच्या दह्यात घालून सूर्योदयापूर्वी खावीत. धुपणी व मूत्रातिसारावर पिकलेली केळी आवळ्याच्या रसात खडीसाखरेची पूड घालून घ्यावीत. दाह शमन होण्यास केळीच्या व कमळाच्या पानावर निजावे.

**मूत्र बंद होते त्यावर:-** केळीच्या गाभ्याचे पाणी काढून त्यात १ अगर २ तोळे तूप मिसळून घ्यावे. म्हणजे लवकर लघवीला होते. पित्त रोगावर पिकलेली केळी तूप व साखर घालून घ्यावीत.

**कन्हेर:-** कन्हेरीचे पिवळे, तांबडे फूल व पांढरे असते. त्यावरून त्याचे गुण निरनिराळे आहेत. पिवळे फूल शंकराला, व मारुतीला वाहतात. पांढरे व तांबडे फूल इतर देवांना वाहतात.

**विंचवाच्या विषावर:-** पांढर्या कन्हेरीचे मूळ उगाळून दंश जागेवर लेप करावा. उपदंशावर पांढरा कन्हेरीचे मूळ उगाळून लोण्यात कालवून चट्टयावर लेप करावा. डोके दुखीवर पांढर्या व तांबड्या कन्हेरीचे मूळ पाण्यात उगाळून कपाळावर लावावे.

**कडुनिब:-** संवत्सराच्या आरंभी गुढी पाडव्याच्या दिवशी आपण कडुनिंबाचा कोवळा पाला खातो.

श्रीरेणुका देवी उर्फ यल्लम्मा देवीचे भक्तात निंब नेसण्याची प्रथाही रुढ आहे. निंब हा आरोग्य वृक्ष आहे.

**गरमीवर:-** कडुनिंबाच्या पाल्याचा रस एक शिंपभर व खडीसाखरेची पूड अर्धातोळा यांचे मिश्रण सकाळ-संध्याकाळ घ्यावे. एक आठवड्यात गुण येतो. उवा जाण्यासाठी कडुनिंबाच्या बिया त्याच्याच रसात वाटून डोकीस लावाव्यात.

---

# रवींद्रनाथ टागोर : वारसा आणि कार्य


## भारतीय संस्कृतीचे प्रतिनिधी रवींद्रनाथ- भाग दोन

थोडं मनातलं
विश्वास देशपांडे
भ्र. ९४०३७४९९३२

(भाग ४२)

रवींद्रनाथांच्या परदेश दौऱ्याचा दुसरा टप्पा १९२० पासून सुरू झाला. या दुसऱ्या टप्प्यात त्यांनी ब्रिटन, अमेरिका, जर्मनी, स्वीडन, फ्रान्स आणि इतर देशांना भेटी दिल्या. याप्रसंगी त्यांच्यासोबत त्यांचा मुलगा आणि सून होते. त्यांच्या अमेरिकेच्या दौर्यात त्यांनी अनेक ठिकाणी व्याख्याने देऊन लोकांपर्यंत भारतीय संस्कृती आणि परंपरा प्रभावीपणे पोहोचवण्याचा प्रयत्न केला. या अमेरिका भेटीच्या दरम्यान त्यांची भेट एका उच्चशिक्षित अमेरिकन तरुणाशी झाली त्याचे नाव एल्महर्स्ट असे होते. हे एल्महर्स्ट कृषी आणि अर्थतज्ज्ञ होते. त्यांचा नुकताच डोरोथी व्हिटने स्टेट या श्रीमंत कुटुंबातील तरुणीशी विवाह ठरला होता. रवींद्रनाथांच्या व्यक्तिमत्त्वाचा प्रभाव या दोघांवरही जबरदस्त होता. एल्महर्स्ट यांनी तर नंतर आपल्या नोकरीतून निवृत्त होऊन रवींद्रनाथांच्या मार्गदर्शनाखाली भारतातील ग्रामीण भागाच्या पुनर्रचना आणि विकासाच्या कामासाठी स्वतःला वाहून घेतले.

ब्रिटन आणि अमेरिकेखेरीज फ्रान्स, जर्मनी, स्वीडन, ऑस्ट्रिया आदी देशांमध्ये रवींद्रनाथांचे अभूतपूर्व असे स्वागत झाले. जर्मनीत तर त्यांच्या भेटीसाठी लोकांनी गर्दी केली. त्यांच्याबरोबर असलेला त्यांचा मुलगा या संदर्भात असे लिहितो, मध्य आणि उत्तर युरोपातल्या लोकांनी त्यांची पायधूळ घेतली. गर्दीच्या सभांमध्ये आणि रेल्वे स्टेशनवर लोक एकमेकांशी रेटारेटी करून वडिलांच्या अंगरख्याला तरी स्पर्श व्हावा म्हणून पुढे झेपावत होते. त्यांच्या पुस्तकांची विक्री विलक्षण होती. जर्मनीत तर लाखो प्रती विकल्या गेल्या. या युरोप भेटीच्या (१९२४) दरम्यान रवींद्रनाथांचा युरोपातील अनेक विद्वान आणि महान लोकांशी परिचय झाला. पुढे त्यातील बर्याच लोकांनी रवींद्रनाथांना त्यांच्या कार्यात मदत केली. माणसे जोडून ठेवण्याची कला रवींद्रनाथांना अवगत होती. केवळ आपल्या कामापुरते लोकांशी संबंध त्यांनी कधीच ठेवले नाहीत तर वेळोवेळी अशा लोकांशी प्रेमपूर्वक पत्रव्यवहार करून त्यांचे संबंध जपून ठेवले.



आपल्या पुढील प्रवासात रवींद्रनाथ चीनमधील शांघाय, हानचाऊ, नानकिंग आणि पेकिंग या ठिकाणी थांबले. तेथील लोकांनी त्यांचे मोठ्या प्रेमाने स्वागत केले. रवींद्रनाथ भारतीय प्राचीन संस्कृती आणि सभ्यता यांचा परिचय करून देण्यासाठी चीनमध्ये आले आहेत हे चिनी नागरिकांनी ओळखले आणि त्यांचा योग्य तो सन्मान केला. चीनमधील एक विद्वान आणि विचारवंत प्रोफेसर लिआंची चाऊ रवींद्रनाथांच्या गौरवपर भाषणात म्हणाले, भारतीय संस्कृती सभ्यता, प्रेमआणि स्वातंत्र्य यावर आधारलेली आहे. या गोष्टींचे प्रतिबिंब आपल्याला रवींद्रनाथांच्या व्यक्तिमत्वात आणि कवितांमध्ये आढळते. भारतीय संस्कृतीमधील प्रेम, सभ्यता आणि स्वातंत्र्य या गोष्टी अनुकरणीय आहेत. यानंतर त्यांनी जपानला भेट दिली. त्यांना असे आढळले की युरोपमध्ये आपापसात युद्ध घडवून आणणारा स्वार्थी राष्ट्रवाद जपाननेही अंगीकारला आहे. जपानने पाश्चिमात्य देशांच्या पावलावर पाऊल ठेवले हे पाहून त्यांना अतिशय वाईट वाटले. त्यांनी तिथे केलेल्या भाषणात आपली ही खंत स्पष्टपणे बोलून दाखवली. ते म्हणाले, ही काय राष्ट्राची मूल्ये आहेत? विध्वंसक यंत्र आणि नफेबाज दुहेरी नीतीमुळे नीतीमूल्ये ढासळत चालली आहेत. आणि मानवातील परस्पर बंधूभावाची भावना ही नष्ट होते आहे. एक तर तुम्ही लालचावले आहात किंवा तुम्हाला याचा स्वीकार करणे भाग पडत आहे. त्यानंतरचा त्यांचा प्रवास समुद्रमार्गे झाला.

अटलांटिक महासागरातून प्रवास करत ते ब्यूनॉस आयर्सला पोहोचले. या सततच्या प्रवासाने मात्र ते आजारी पडले. परंतु त्या ठिकाणी त्यांची एक चाहती असलेल्या व्हिक्टोरिया उकांपू या तरुणीने त्यांची अतिशय हळुवार आणि प्रेमपूर्वक शुश्रुषा केली. तिच्या काळजीपूर्वक केलेल्या सेवा आणि शुश्रुषा यामुळे रवींद्रनाथ या मोठ्या आजारातून बरे झाले. त्या दोघांमध्ये स्नेहबंध निर्माण झाले. रवींद्रनाथांनी त्या ठिकाणी आपल्या काही कविता लिहिल्या आणि त्या कवितांचे पुस्तक व्हिक्टोरियाला अर्पण केले.

बरे झाल्यानंतर त्यांनी नेपल्स, इटली, स्विझर्लंड या देशांना भेटी दिल्या. त्यातही अनेक लोकांना ते भेटले. नंतर पुन्हा १९२७ मध्ये ते विविध देशांच्या दौर्यावर बाहेर पडले. या त्यांच्या दौर्यात सिंगापूर, इंडोनेशिया आदी देशांचा समावेश होता. या दौऱ्यात त्यांच्याबरोबर सुप्रसिद्ध भाषा शास्त्रज्ञ प्रोफेसर सुनीती कुमार चॅटर्जी आणि चित्रकार सुरेंद्रनाथ कार हे दोघे होते. ईस्ट इंडीज मधील वास्तव्यात चित्रकार सुरेंद्रनाथ यांना तिथे कापडावर छापलेली एक डिझाईन खूप आवडली. तिला बाटीक असे म्हटले जात होते. एका विशिष्ट पद्धतीचा वापर करून वक्ररेषांमुळे तयार झालेल्या या मनोवेधक प्रकाराला स्वतःचे असे खास सौंदर्य आहे. सुरेंद्रनाथ यांनी ते बाटिक तंत्रज्ञान आत्मसात केलं आणि आपल्या सोबत श्रीनिकेतनला आणलं. तिथे त्यांनी ही कला शिकवली. या कलेच्या सौंदर्याने लोकांना तिच्याकडे आकर्षित केले आणि आता तर एक आधुनिक डिझाईन म्हणून या कलेला खूपच लोकप्रियता मिळाली आहे. नंतर त्यांना कॅनडाला येण्याचे निमंत्रण मिळाले. महान साहित्यिक म्हणून लोक रवींद्रनाथांना ओळखत होतेच पण आता रवींद्रनाथांची कीर्ती एक महान शिक्षणतज्ज्ञ म्हणूनही पसरली होती. त्यामुळे त्यांना एका अधिवेशनात शैक्षणिक समस्यांवर चर्चा करण्यासाठी बोलावले गेले. त्यांचे कॅनडातील वास्तव्य फक्त दहा दिवसांचे होते. त्यावेळी कॅनडातील श्रीमंत लोकांना एक छोटासा पंखा हातात बाळगण्याची सवय होती. चाहत्यांच्या आग्रहामुळे रवींद्रनाथांना या पंख्यावर सही करणे भाग पडत होते. ती सही करताना ते काही स्वरचित ओळी त्यावर लिहून देत. त्यांच्या या अशा त्यांच्या छोट्या रचनाही एक पुस्तक सहज प्रकाशित होईल इतक्या जमा झाल्या. आणि त्यांचे पुढे 'फायर फ्लाईज' नावाचे पुस्तक प्रसिद्ध झाले. त्यातील एक रचना उदाहरण म्हणून या ठिकाणी पाहू.

दिवस म्हणजे रंगीबेरंगी बुडबुडे.
रात्रीच्या अथांग पृष्ठभागावर तरंगणारे...

यादरम्यान युरोप अमेरिकेत त्यांच्या चित्रांची प्रदर्शने भरली. त्यांच्या चित्रकलेच्या नवीन वैशिष्ट्याने लोकांचे लक्ष वेधून घेतले. साठाव्या वर्षानंतर रवींद्रनाथांनी चित्रकला शिकायला सुरुवात केली होती. आपल्या लेखनात दुरुस्त्या करत असताना ते त्यात लय साधलेला एखादा आकार काढत आणि मजेशीर आकृत्या तयार होत. मग त्यांनी चित्रे काढायला सुरुवात केली. आणि कलेच्या या प्रांतात लेखणी आणि कुंचला या दोन्हींचाही वापर ते करू लागले. त्यांच्या या अनोख्या शैलीच्या रंगचित्रांमुळे युरोपीय जनतेत त्यांच्या चित्रांबद्दल आकर्षण निर्माण झाले. याविषयीची दुसरी बाजू अशी म्हणता येईल की आपल्या आयुष्याच्या उत्तरार्धात देखील नवनवीन गोष्टी शिकण्याची आणि प्रयोग करण्याची दुर्दम्य इच्छाशक्ती त्यांच्याजवळ होती. त्यांच्या सृजनशील मनाची प्रगल्भता यात आपल्याला आढळून येते. (क्रमशः)

# ग्रहसंकेत

**(रविवार, १३ एप्रिल ते शनिवार, १९ एप्रिल २०२५)**

**नारायण जगन्नाथ कारंजकर, ज्योतिष भास्कर**
ज्येष्ठ पत्रकार, फिल्टर पंपाजवळ, माढा रोड, मु.पो.कुर्डूवाडी, जि.सोलापूर (भ्र. ९४२३७५८४०१)

✻ **रविवार, १३ -एप्रिल-** इष्टी, अश्वीनी रवि, श्री महालक्ष्मी रथोत्सव कोल्हापूर, शिरकाईदेवी यात्रा शिरकोली (जि.पुणे), येडेश्वरी यात्रा येरमाळा, एकवीरादेवी यात्रा डफळापूर, येडोबा यात्रा येराड (ता.पाटण), जालियनवाला बाग स्मृतिदिन, गोविंदगिरी महाराज पुण्यतिथी ✻ **सोमवार, १४ एप्रिल-** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती, बैसाखी (पंजाब), छत्रपती शिवाजी महाराज रथोत्सव कोल्हापूर ✻ **मंगळवार, १५ एप्रिल-** श्रीधरस्वामी पुण्यतिथी सज्जनगड, खंडोबा यात्रा वाटंबरे (ता. सांगोला), धानाईदेवी यात्रा कार्वे (ता. कराड), श्री मसोबा यात्रा नरसेवाडी (ता. तासगाव) ✻ **बुधवार, १६ एप्रिल-** संकट चतुर्थी (चंद्रोदय- मंबई- २१:५१, अहिल्यानगर-२१:४३, कलबुर्गी-२१:३१, कोल्हापूर-२१:४०, जालना-२१:४०, धाराशिव-२१:३६, नांदेड-२१:३२, पंढरपूर-२१:३८, परभणी-२१:३५, पुणे-२१:४६, बीड-२१:३९, बीदर-२१:२९, लातूर-२१:३४, विजापूर-२१:३४, छत्रपती संभाजीनगर-२१:४३, सांगली-२१:४, सातारा-२१:४३, सोलापूर-२१:३५), दुसरी तीज, दुर्गा देवी रथ यात्रा आंजर्ले, दक्षिणमूर्ती महाराज पुण्यतिथी करवीर, ज्योर्तिलिंग यात्रा पाडळी निमाम (सातारा) ✻ **गुरुवार, १७ एप्रिल-** श्री काडसिध्देश्वर स्वामी महाराज जयंती कणेरी, भैरवनाथ यात्रा गावडेवाडी (पुणे), श्री बिरदेव यात्रा कुरुंदवाडी (ता. आटपाडी) ✻ **शुक्रवार, १८ एप्रिल-** चंदलादेवीचा उत्सव, गुडफ्रायडे, शांतादुर्गा रथोत्सव सदाशिवगड (कारवार), मच्छिंद्रनाथ यात्रा मच्छिंद्रगड (वाळवा), श्री वज्रेश्वरी प्रकटदिन एकरूखे ✻ **शनिवार, १९ एप्रिल-** सौर ग्रीष्म ऋूत प्रारंभ, तिकोटेकर महाराज पुण्यतिथी विजापूर, श्री भैरवनाथ यात्रा कण्हेरखेड ता. कोरेगाव

**मुहूर्तः-** ✻ **साखरपुडा-** १४, १८ एप्रिल ✻ **डोहाळ जेवण-**१८ एप्रिल (१७ पर्यंत) ✻ **बारसे-** १४ एप्रिल ✻ **जावळ-** १४ एप्रिल ✻ **गृहप्रवेश-** १४, १८ एप्रिल

### मेष :- अपेक्षित कामे होतील

चव सोडली तर शरीराला फायदा मिळतो. पंचमेश रवि सप्ताहरंभी राशीत येत आहे. उत्साहवर्धक घटना घडतील. खर्च वाढले तरी प्राप्तीचे प्रमाणही तसेच चांगले राहणार आहे. आत्मविश्वास वाढणार आहे. बँक, विमा, ज्ञानदान अशा क्षेत्रात चांगल्या संधी लाभणार आहेत. लाभ उठवावा. नव्या कामांना गती मिळेल. अपेक्षित कामे होतील. शुभ ता. १४, १८

### वृषभ:- मनासारख्या घटना

वाद सोडले तर नातेसंबंधात फायदा होतो. रवि बारावा होत आहे. सरकारी कामे विचारपूर्वक करावी. प्राप्तीचे प्रमाण वाढेल. चिकाटीने राहावे. नोकरी व्यवसायात मनासारख्या घटना घडतील. अडचणीवर मात कराल. धडाडीने राहावे. विद्या, संततीबाबत शुभ फले मिळतील. नव्या विचारांना चालना मिळेल कलागुणांचा विकास होत जाईल अपेक्षित घटना घडतील. शुभ ता. १४, १९

### मिथुन:- अडचणी सुटत जातील

खूप त्रास होत असेल तर आपल्या मनाशीच लढायचं. दुसऱ्यावर राग काढायचा नाही. धनात मंगळ असल्याने आपले आर्थिक गणित बिघडण्याची शक्यता आहे. अनावश्यक खर्च टाळणे म्हणजे बचत होय. कार्यक्षेत्रात मनासारख्या घटना घडतील. नव्या विचारांना विचाराने चालना द्यावी. डोळ्यांच्या तक्रारी संभवतात. काळजी घ्यावी. अडचणी सुटत जातील. शुभ ता. १४

### कर्क:- जनसंपर्क वाढेल

संकट आले तर वेळेलाही थोडा वेळ द्यावा. त्रास करून घेऊ नये. राशीत मंगळ असल्याने कोणतेही काम विचारपूर्वक करावे. आर्थिक उन्नतीच्या घटना घडतील. नव्या संधी विचारपूर्वक स्वीकाराव्यात. अपेक्षित संधी लाभतील. सरकारी कामे मार्गी लागतील. कौटुंबिक जीवनात सामंजस्याने राहावे. मतभेदाचे प्रसंग टाळावेत. जनसंपर्क वाढेल. शुभ ता. १४, १८

### सिंह:- धनचिंता राहिल

अपेक्षा आणि स्वार्थ या विचित्र खेळात माणूस एकदा अडकला की तो स्वतःचं सत्व, तत्त्व, नाती, माणुसकी विसरून जातो. आठवा शनि तर व्ययात मंगळ त्यामुळे सध्याचे मार्गक्रमण विशेष सोपे नाही. चार पावले पुढे टाकली तरी दोन पावले मागे येण्याची तयारी ठेवा. नोकरी व्यवसायात अडचणी संभवतात. विचाराने रहावे. धन चिंता राहील. शुभ ता. १४, १९

### कन्या:- नव्या कामांना गती

अपेक्षा आणि समाधान यात अंतर एवढेच आहे की, अपेक्षा माणसाला दुःखात ठेवते. समाधान माणसाला सुखात ठेवते. भाग्यात गुरु, लाभात मंगळ त्यामुळे आपले मार्गक्रमण चांगले राहील. वैद्यकीय, कृषी क्षेत्रात मनासारखी प्रगती होईल. नव्या कामांना गती मिळेल. अडचणीवर वेळीच मात कराल. कौटुंबिक सौख्य लाभेल. अपेक्षित संधी लाभतील. शुभ ता. १४

### तुला:- अपेक्षित कामे होतील

ज्यांनी तुम्हाला समुद्राच्या मध्यभागी आणून सोडले, तुम्ही किनाऱ्यावर पोहोचला की नाही हे विचारण्याचा त्यांना अधिकारच नाही. कर्मस्थानी मंगळ आहे. त्यामुळे कार्यक्षेत्रात धडाडी वाढेल. नव्या संधीचे स्वागत करावे. स्पर्धांमध्ये यश मिळेल. नव्या ओळखी लाभदायक ठरतील. प्रतिकूलतेवर मात कराल. अचानक प्राप्ती वाढेल. अपेक्षित कामे होतील. शुभ ता. १४, १८

### वृश्चिक:- मनासारख्या घटना

गेलेली वेळ व तुटलेला विश्वास परत येत नाही, म्हणून सर्व नातेसंबंध जपून ठेवावे. राशी स्वामी मंगळ भाग्यात आहे. सप्तमात गुरु त्यामुळे मनासारख्या घटना घडतील. यांत्रिक, तांत्रिक क्षेत्रात प्रगती होईल. कौटुंबिक जीवनात सौख्य लाभेल. नव्या योजना मार्गी लावता येतील. अडचणींवर मात कराल. शुभ ता. १४, १९

### धनु:- काळजी घ्यावी

आयुष्यात कधी, कोण, कसा, कधी, कुठे बदलला याचा विचार करू नका. तो काय शिकवून गेला, याचा विचार करा. चौथा शनी, आठवा मंगळ त्यामुळे ऐन उन्हाळ्यात प्रकृतीत जपावे. शारीरिक तक्रारी राहतील. काळजी घ्यावी. स्पर्धांमध्ये यश मिळेल. नव्या संधी विचारपूर्वक स्वीकाराव्यात. प्रगतीच्या घटना घडतील. शुभ ता. १४, १८

### मकर:- अपेक्षित कामे होतील

चांगले कर्म न कळत जरी केले, तरी त्याचे फळ नेहमी गोडच असते. पंचमातील गुरुमुळे आर्थिक अडचणीतून सुधारणा होईल. धावपळ करू नका. कौटुंबिक जीवनात, भागीदारीच्या व्यवसायात सामंजस्याने राहावे. कला-गुणांचा विकास होईल. नव्या कामांना गती मिळेल. फार विचार करू नका. अडचणी सुटत जातील. दूरचे प्रवास टाळावे. अपेक्षित कामे होतील. शुभ ता. १४

### कुंभ:- चिंता करू नका

राग मनात ठेवून गोड बोलणाऱ्या माणसापेक्षा प्रेम मनात ठेवून रागावणारी माणसं खूप चांगली असतात. षष्ठातील मंगळामुळे उत्साह, धडाडी वाढेल. खर्च वाढले तरी प्राप्ती ही तशी चांगली होत जाईल. नव्या संधी लाभतील. अडचणीवर मात कराल. अंगीकृत कार्यात समाधान लाभेल. नव्या विचारांना चालना देऊ शकाल. फार चिंता करू नका . शुभ ता. १४

### मीन:- फार चिंता करू नका

जे देता येईल, ते द्यायचं कोणाला मदतीचा हात, कोणाला साथ, कोणाला आधार, कोणाला माया. दान करण्यात संतुष्टता असते. राशीतील बुध, शुक्र, शनिमुळे विलंबाने पण, कामे मनासारखी होतील. नव्या योजना मार्गी लावता येतील. पंचमतील मंगळ अडचणीतून मार्ग निघत जाईल. कौटुंबिक सौख्य लाभेल. नव्या विचारांना चालना मिळेल. फार चिंता करू नका. शुभ ता. १४, १९

!! शुभ भवतु !!



# महाराष्ट्र देशा

**दुर्ग जिज्ञासा**

**प्राची पालकर**

महाराष्ट्र आणि गडकिल्ले यांचे एक अतूट नाते आहे. पश्चिमेकडे अरबी समुद्र, कोकण, सह्याद्रीच्या डोंगररांगा, घाटमाथा, त्यानंतर पठारी प्रदेश, मराठवाडा, खानदेश, सातपुड्याच्या डोंगररांगा, विदर्भ अशी साधारण महाराष्ट्राची रचना आहे. उत्तरेस पश्चिम वाहिनी नर्मदेचे खोरे, सातपुडा पर्वतरांग, दक्षिणेस पश्चिम वाहिनी तापीचे खोरे, त्याच्या दक्षिणेस अजंठा सातमाळा डोंगररांग, त्यानंतर गोदावरीचे खोरे, त्याच्या दक्षिण दिशेला हरिश्चंद्र बालाघाट डोंगररांग, भीमा नदीचे खोरे, कृष्णेचे खोरे अशी साधारण महाराष्ट्राची भौगोलिक रचना आहे.

गोदावरी, प्रवरा, मुळा-मुठा, भीमा, इंद्रायणी, तापी या नद्यांच्या काठी झालेल्या उत्खननातून आदिपाषाणयुग, मध्यपाषाणयुग, ताम्रपाषाणयुग असा इतिहास पुढे आला. एकंदरीत महाराष्ट्र प्रदेशाला अप्रतिम निसर्गसौंदर्य लाभले आहेच व ऐतिहासिक दृष्टीनेदेखील हजारो वर्षांचा गौरवशाली इतिहास प्राप्त झाला आहे. प्रत्येक प्रदेशाच्या भौगोलिक रचनेचा तेथील संस्कृतीवर, सभ्यतेवर व लोकजीवनावर प्रभाव असतो. महाराष्ट्रात तर सह्याद्रीच्या पर्वतरांगांनी केवळ येथील हवामान, लोकजीवन, संस्कृतीला प्रभावित केले नाही तर महाराष्ट्राचा इतिहास घडविला आहे. ज्येष्ठ इतिहास अभ्यासक गो. नि. दांडेकर म्हणायचे, ''सह्याद्रीने मराठी माणसाला जगायचे कसे तेही शिकविले व सोबतच मरायचे कसे तेही शिकविले.'' सह्याद्री, सातपुडा पर्वतरांगातील काही सोप्या, काही अवघड वाटा नवख्या माणसांपासून ते निष्णात गिर्यारोहकांपर्यंत सर्वांना आपल्यात सामावून घेतात. मात्र, या वाटेवर चालताना मनात निसर्गाबद्दल केवळ आदर आणि आदरच असायला हवा.

निसर्ग आपल्यापेक्षा प्रचंड बलवान आहे त्यामुळे त्याच्याशी खेळ करू नये. किल्ले पर्यटन हा विषय साहसी पर्यटन या विषयांतर्गत येतो. गडकोट फिरताना काळजीपूर्वक फिरावे. अनुभवी व्यक्तीचे मार्गदर्शन व अतिसाहस न दाखवता काळजीपूर्वक केलेले गिर्यारोहण आनंददायी ठरते. गिर्यारोहण हा सर्वांगसुंदर असा छंद आहे; तो एकदा जडला की, माणूस खूप काळ निसर्गापासून दूर राहू शकत नाही. महाराष्ट्राचा बराचसा भाग हा लाव्हारसापासून तयार झालेल्या अग्निजन्य ज्वालामुखी खडकांनी व्यापला आहे. भारतीय भूशास्त्रीय परिभाषेत या खडकांना 'डेक्कन ट्रॅप' असे म्हणतात. सह्याद्रीतील खडक पूर्णतः स्तररूपातील असून साधारणतः पूर्वेकडे व दक्षिणेकडे घटत जाणाऱ्या या थरांची सर्वात जास्त जाडी सह्याद्रीच्या पश्चिम कड्यात आढळते. इथल्या पर्वतरांगात लाव्हाजन्य भूरचनेची पठारी शिखरे आणि बगलेत माचीसारख्या मोठ्या पायऱ्यापायऱ्यांनी चढणारे उभे कडे ही वैशिष्ट्य आढळतात. 'डेक्कन ट्रॅप'नंतरच्या काळात तयार झालेल्या काही गाळाच्या खडकांचे प्रकार दक्षिण रत्नागिरी जिल्ह्यात आढळतात.

सह्याद्रीच्या घाटमाथ्यावर जांभा हा विटेसारखा दगड आढळतो. हा खडक मऊ असल्याने नैसर्गिक खाणीतून खोदून काढला जातो. याला काढताना व्यवस्थित आकार देऊन काढतात, त्याला चिरे म्हणतात.

चिऱ्याचा वापर बांधकामात करतात. कोकण फिरताना लाल दगडांची बांधलेली आकर्षक मंदिरे, घरे आपले लक्ष वेधून घेतात. ऊन, वारा, पाऊस यात तावूनसुलाखून जांभा अधिक कठीण होतो व म्हणून काही किल्ल्यांच्या बांधकामात तो वापरलेला आढळतो.

सह्याद्रीची सर्वसाधारण उंची २००० ते ३५०० फूट असून काही ठिकाणी ती ४००० ते ५००० फूट पाहायला मिळते. कळसुबाई, साल्हेर व घनचक्कर अशी उंच शिखरांची क्रमाने उदाहरणे आपल्या समोर आहेत. सह्याद्रीचा दक्षिणोत्तर कणा पश्चिमेस त्याच्या पायथ्याशी, सागरकिनारी, कोकणाची चिंचोळी भूपट्टी सोडतो. कोकण प्रदेश खडकाळ असून काही ठिकाणी उभे अभेद्य कडे, सुशोभित केलेला सागर किनारा, नद्यांचे खोरे, तळकोकण अशी साधारण रचना आढळते. भूरचनेच्या या विविधतेमुळे कोकणात रायगड हा अभेद्य गिरीदुर्ग तसेच मुरुड जंजिऱ्यासारखे जलदुर्ग आजही इतिहासाच्या पाऊलखुणा जपत आहेत. कोकणातील कल्याण, दाभोळ, सोपारा बंदरे व घाटावरील पैठण, जुन्नर यासारख्या व्यापारीपेठातील वाहतुकीसाठी, यात्रेकरूंसाठी सह्याद्रीतील कमी उंचीच्या डोंगरांमधून घाटवाटा निर्माण करण्यात आल्या. कोल्हापूरवरून कोकणात उतरणारा गगनबावडा घाट असो की पुण्या-मुंबईला कोकणाशी जोडणारे अनेक घाट असो, सर्व घाटवाटांचे सौंदर्य अप्रतिम आहे. या डोंगररांगा विविध दिशांना विस्तारल्या आहेत. यांचे वैशिष्ट्य म्हणजे त्या मुख्य सह्यशिरोधारेचा एखाद्या उंच शिखरमाथ्याच्या सान्निध्यात निरोप घेतात. धुळे जिल्ह्याच्या म्हणजेच महाराष्ट्राच्या वायव्य सीमेवर सह्याद्री व सातपुडा एकमेकांचा काटकोनात निरोप घेतात. सह्याद्रीचे हे उत्तर टोक सेलबारी व डोलबारी या दोन छोट्या डोंगररांगांना जन्म देते. या जिथे मुख्य सह्यशिरोधारेचा निरोप घेतात तिथे सह्याद्रीतील द्वितीय सर्वात उंच शिखर साल्हेर पर्वत आहे. महाराष्ट्र हा गडकिल्ल्यांचा प्रदेश आहे.

गडकोट, दुर्ग याविषयी प्रत्येक व्यक्तीच्या मनात जिज्ञासा आहे. महाराष्ट्राच्या ज्वलंत इतिहासातील किल्ल्यांचे महत्त्व आपण सर्व जाणतो. या किल्ल्यांचे ऐतिहासिक महत्त्व तसेच त्यांची वैशिष्ट्ये याबद्दल प्रत्येकाच्या मनात कुतूहल असते. महाराष्ट्राच्या मनावर अधिराज्य गाजवणाऱ्या सह्याद्री व सातपुड्याच्या पर्वतरांगा आपल्याला मोहात पाडतात. या पर्वतरांगांतील किल्ले मुख्य आकर्षणाचा विषय आहे. कारण छत्रपती शिवाजी महाराजांनी याच गडकिल्ल्यांच्या मदतीने स्वराज्य निर्माण केले. त्यांनी आदिलशाही व निजामशाहीच्या ताब्यात असलेले किल्ले जिंकले तसेच अनेक मोक्याच्या ठिकाणी किल्ले बांधले.

रांगड्या सह्याद्रीच्या मदतीने साडेतीनशे वर्षांचे पारतंत्र्य नष्ट झाले आणि मराठी माणसाने, या महाराष्ट्राच्या पावन भूमीने स्वराज्यात मोकळा श्वास घेतला. १७ व्या शतकात औरंगजेब दक्षिणेत उतरला. छत्रपती संभाजी महाराज गेल्यावर स्वराज्य संकटात असताना राजाराम महाराज छत्रपती झाले. त्यावेळी या किल्ल्यांनी औरंगजेबाच्या प्रचंड फौजेला किती काळ अडवून ठेवले. पुढे महाराणी ताराबाईंच्या नेतृत्वात धनाजी जाधव, संताजी घोरपडे, रामचंद्रपंत अमात्य यांनी स्वराज्य वाचविले, ते या किल्ल्यांच्या मदतीने. एक एक किल्ला वर्षभर औरंगजेबाच्या प्रचंड फौजेशी लढला.

महाराष्ट्रातील प्रत्येक किल्ला आपल्या शौर्याच्या इतिहासाचे प्रतीक आहे. महाराष्ट्राच्या इतिहासात पुढे बाळाजी विश्वनाथ भट, पहिले बाजीराव पेशवे, चिमाजी आप्पा यांनी आपल्या पराक्रमाने मराठा साम्राज्य नर्मदा पार करून पुढे नेले. १८ व्या शतकात मराठ्यांनी अटकेपार झेंडे रोवले; मात्र गडकिल्ल्यांचे महत्त्व या काळात थोडे कमी झाले.

मराठ्यांचे सैन्य मैदानावर लढाई करू लागले. डोंगरदऱ्यात लपून गनिमी कावा पद्धतीच्या लढाया कमी झाल्या. पुढे शाहू महाराज गादीवर बसले, राज्यविस्तार झाला. किल्ले पूर्णतः ओस पडले नव्हते. किल्ल्याची व्यवस्था ठेवली जात होती, शिबंदी होती, किल्ल्यावरील मंदिरातील उत्सव सुरू होते. छत्रपती शिवाजी महाराजांनी इंग्रजांचा डाव खूप आधीच ओळखला होता. कदाचित महाराज दीर्घायू असते तर या भारतमातेला अजून दीडशे वर्षं पारतंत्र्य भोगावे लागले नसते. इंग्रजांची राजवट अत्यंत जुलमी होती. इंग्रजी राजवटीत त्यांनी किल्ल्यांचे अतोनात नुकसान केले. त्यांच्याकडे आधुनिक शस्त्र होते. त्यांनी तोफा डागून किल्ल्यावरील तटबंदी, बांधकाम पाडले, किल्ल्यवर जाणारे रस्ते उद्ध्वस्त केले. इंग्रजांना भीती वाटत असावी की, पुन्हा गडकिल्ल्यांच्या मदतीने महाराष्ट्रात स्वराज्यनिर्मिती होईल. कालांतराने लोकांचे गडांवर राहणे, येणे-जाणे बंद झाल्याने तेथील वास्तूंची पडझड झाली. 'गव्हर्नमेंट लिस्ट ऑफ सिव्हिल फोर्ट' या नावाने इंग्रजांनी एक अहवाल प्रसिद्ध केला होता. महाराष्ट्रातील २०० हून अधिक किल्ल्यांची व तेथील अवशेषांची नोंद या अहवालात केली आहे. पर्वतरांगातील लोभस, आकर्षक व रांगडे निसर्गसौंदर्य अनुभवताना सह्याद्रीच्या मुख्य रांगेवर व उपरांगेवर वसलेले गिरीदुर्ग तसेच कोकण किनाऱ्याचे वैभव असलेले जलदुर्ग, काही भुईकोट किल्ले यांचे दर्शन या लेखमालिकेत आपल्याला होईल. किल्ल्यांवरील बांधकाम, त्यावेळचे स्थापत्यशास्त्र, मराठ्यांच्या शौर्याचा इतिहास या विषयांना स्पर्श करण्याचादेखील प्रयत्न करणार आहोत.

अभ्यास बखरी, काही कागदपत्रे, पत्रव्यवहार, रोजनिशी या ऐतिहासिक विषयाचा अभ्यास करताना महत्त्वाच्या आहेतच; मात्र प्रत्यक्ष अनुभव घेऊन किल्ल्यांवरील वास्तू व वस्तुरूपी इतिहासाचा अनुभव घेणेही तितकेच महत्त्वाचे आहे. शिवदुर्ग रचनेत दुर्गबांधणी तंत्राचा परमोच्च आविष्कार आढळतो, जो समजून घेतला पाहिजे. प्रत्येकाने दुर्ग विज्ञान समजून घेत गडकिल्ले भटकंती करायला हवी. त्यामुळे आपल्या पूर्वजांनी केलेल्या गौरवशाली कार्याचा योग्य इतिहास समजण्यास मदत होईल.

पान ४ वरून

# बदललेल्या चैत्राचे संदर्भ...

वर्षभर राबणाऱ्या सासरवासिनीला चार दिवस माहेरात निवांत मिळावे म्हणून मामाच्या गावाला निघालेली गाडी आता कोणत्या स्टेशनवर का थांबत नाही? असा प्रश्न आज अस्वस्थ करणारा ठरू शकतो. मामाचे पत्र तर कधीचे हरवले ते सांगताच येत नाही. चैत्र आला म्हणजे अंगणात बाज (खाट) टाकून भुताच्या आणि चकव्याच्या किसी आणि कहाण्यांना रंजकते सोबत भीतीची एक हलकीशी किनार लाभलेली असायची.

दुपारच्या उन्हात झाडाखाली सावलीत चौफुल किंवा शेर बकरी ह्या खेळांची जागा बुद्धिबळ, कॅरम आणि पुढे पुढे तर ५२ पानाच्या पत्त्यांनी घेतली. घरातील सोप बारीक करून, साखर आणि शेजारून मागितलेले लिंबू यांचे शरबत पुढे रसनामध्ये आणि नंतर तर रासायनिक कोल्ड्रिंक्समध्ये बदलून गेले पण जुन्या शरबताची चव अजूनही जीभेवर कायम आहे. चैत्रामध्ये साधारणपणे शेतातील गहू सोयाबीन हरभरे तुरी सर्व पीक घरी आलेले असायचे आणि शेतात फिरायच्या त्या सर्व वेचणाऱ्या बाया किंवा मुली, सरवा म्हणजे काय? तर पीक काढताना शेतात पडलेले पिकाचे दाणे, त्या सरव्यावर गुजराण करणारी मंडळी होती हे आठवले की अंगावर काटा येतो आणि सरकार कोणते का असत नाही? त्यांनी एक दोन रुपये किलोने दिलेली धान्य योजना फार चुकीचे आहे असे मला वाटत नाही. सरवा वेचून झाल्यावर शेतकरी आपले शेत नीट करत असे त्यासाठी अनेक प्रकारे तो शेतात राबत असे आताशा शेतातील काडी कचरा काढण्यासाठी शेतकरी सरळ वाळलेल्या कचर्याला माचिसची पेटलेली काडी लावून देतो आणि तडतड आवाज करत त्या शेतातील कचरा किडा मुंगीसह ढेकळाखाली लपलेले साप आणि जमिनीवर अंडी घालणार्या टिटव्याच्या पिलासह सर्व भस्मसात करत जाऊ लागतो. पूर्वीचा चैत्र रमणीय होता म्हणून अविस्मरणीय होता. आजचा चैत्र अविस्मरणीय असला तरी चिंतनीय आहे. चैत्रातला निसर्ग त्यावेळी मानवासाठी मनोहरी होता. आज मानवच चैत्रातल्या निसर्गासाठी हानिकारक ठरत आहे. असे असले तरी चैत्र हा चित्रमय सजीवतेला साकार करणारा आहे याची जाणीव शहरा बाहेर पडून ग्रामीण भागात माळरानावर, शेत रस्त्यावर, खेड्या पाड्यातील मंडळीत जिथे मोबाईलची रेंज नाही अशा गावांमध्ये जाऊन बसल्यावर नक्की होते यात शंका नाही.

पान ५ वरून

# रथावरी आरूढ रावण...

यम, दम, नियम हे सर्व माझे बाण आहेत. सज्जनांची सेवा आणि गुरूची पूजा हे माझे अभेद्य कवच आहे. हे सर्व माझ्याजवळ असताना मला विजयासाठी दुसरा उपाय करण्याची आवश्यकताच नाही. असा धर्ममय रथ ज्याचे जवळ आहे त्याच्या समोर जिंकण्यासाठी मुळी शत्रूच नाही. ज्याच्या जवळ असा दृढ रथ असतो तो कोणत्याही शत्रूला जिंकू शकतो. अगदी दुर्जय अशा संसाररूपी (जन्ममृत्यू ) शत्रूलाही!' रावणासारखा बलाढ्य आक्रमणकारी प्रत्यक्ष चालून येत असताना प्रभू रामचंद्रांनी ऐन युद्धभूमीवर बिभीषणाजवळ केलेले आपल्या रथाचे वर्णन 'बिभीषण गीता' म्हणून प्रसिद्ध आहे.

कोणत्याही संकटाच्या काळी हातपाय गाळून बसणे हा पुरुषार्थ नाही. मनाची दृढता आणि आत्मविश्वास हीच खरी शास्त्रे आहेत, कोणतेही युद्ध जिंकण्यासाठी! हे युद्ध जिंकायला जो रथ हवा असतो तो साधनेने मिळतो. ती साधना कोणती हे युद्धप्रसंगी प्रभूने बिभीषणाला त्रेतायुगात सांगितले, परंतु ते आज कलियुगातही तितकेच महत्त्वाचे आहे. प्रभू रामचंद्रांची वचने म्हणजे जीवन जगण्याची तत्त्वे आहेत. रामचंद्रासारख्या अवतारी पुरुषाच्या आणि युगनिर्मात्याच्याही आयुष्यात अनंत अडचणी आल्या, अनेक जीवघेणी संकटे आली, स्वजनांपासून कित्येक योजने दूर असूनही त्यांनी संकटांचा परिहार केला. प्रभुरामचंद्रांसारखा कर्तव्यपरायण आदर्श आपल्यासमोर असताना आपण प्रारब्धावर किती विसंबून राहायचे, याचा विचार करायला हवा. प्रभू रामचंद्र म्हणजे मानवी प्रयत्नांची पराकाष्ठा! आणि हीच पराकाष्ठा गोस्वामीजींनी किती समर्थपणे रामचरित मानसात व्यक्त केली आहे. यासाठीच गोस्वामी संत तुलसीदासजी श्रेष्ठ संत ठरतात. त्यांचे शब्द सुभाषिते होतात. रामभक्त गोस्वामीजींना श्रद्धापूर्वक वंदन.

पान २ वरून

# शब्दांच्या पलीकडले...

सिद्धार्थनेदेखील त्याच्या आईच्या शब्दांपलीकडले गुज समजून घ्यावे, असे आपल्याला वाटत असेल. सुदैवाने त्याने ते समजून घेतले. त्या शब्दांपलीकडल्या संवादाने त्या पोराच्या मनाला पार हेलावून टाकले. तो संवाद इतका प्रभावी होता की, दहा मिनिटे आपल्या आईचे ते मूक रुदन ऐकल्यावर, सिद्धार्थने फोन ठेवून दिला आणि केवळ एका महिन्याच्या आत लंडनमधील आपला सगळा गाशा गुंडाळून तो आपल्या आई-बाबांकडे भारतात परत आला. आपली पत्नी, मुले आणि आई-बाबांसह आता तो अतिशय आनंदात राहतो आहे. ही ताकद आहे शब्दांपलीकडल्या संवादाची, केवळ तो संवाद ऐकू जाणारे मन मात्र आपण जपायला हवे.

## संवाद

कालचक्र कालचक्र हे अविरत फिरते
कधी मागुती पुन्हा न वळते काळ
चालतो अपूली गती पाऊल याचे
पुढती पुढती सकाळ दुपार आणि
संध्याकाळ काळ मोजण्या अपुरे
घड्याळ युगानुयुगे शके व संवत्
काळाचा हा विस्तीर्ण पथ याचे उदरी
काळोख प्रकाश काळ व्यापतो
अवनी आकाश काल आज उद्या नि
परवा यास नसे कुणाची परवा
काळ अनादी काळ अनंत काळास
नसे कशाची खंत चाल याची नित्य
निरंतर यत्किंचित कुठे पडे न
अंतर काल गती ही विस्मयकारक
स्थित्यंतर असे मूर्तिमंत द्योतक काळ
कारणे ब्रह्मांड अचंबीत काळ सत्य
हे त्रिकालाबाधित रामायण महाभारत
सर्व गत् काळ सर्वांस साक्षी असे
हा काळ अस्तित्व यांचे सदा
सर्वकाळ साधू संत वद्ती मानवा
तुझा तू कर्तव्य धर्म पाळ व्यर्थ दवडू
नकोस हा काळ पाठीस तुझ्या उभा
हा काळ... उभा हा काळ...

**प्रशांत राजहंस**

## चाहूल

जिथे जिथे जाशील तिथे तिथे
माझी चाहूल पडेल तुला भूल
कसा तू मला विसरशील ? माझी
चाहूल देईल तुला माझी आठवण
तुझ्या मनाच्या कुपीत माझ्या
आठवणींचे कोष शब्दांचे खेळ
किती खेळशील मनाला आवर
किती घालशील कसा तू मला
विसरशील ? जिथे जिथे जाशील
तिथे माझी चाहूल देईल माझी
आठवण

**अरुंधती वैद्य**

सकारात्मकतेचे तत्त्वज्ञान
डॉ. नितीन ह. देशपांडे
deshapandenh@gmail.com

# बिनशर्त स्वीकार- सहर्ष !


सकारात्मकतेचे तत्वज्ञान २६२

बिनशर्त स्वीकार म्हणजे एखाद्या व्यक्तीविषयी कोणत्याही प्रकारे निर्णय न घेता तिचा स्वीकार करणे आणि नंतर आवश्यकतेनुसार त्याचे मूल्यमापन करणे, ज्यायोगे आत्म-विकास आणि आत्म- स्वीकृती वाढविता येते. हा दृष्टिकोन व्यक्ती- केंद्रित उपचारपद्धतीचा मूलभूत पाया आहे, जो सुरक्षित आणि सहाय्यक उपचारात्मक वातावरणाला प्रोत्साहन देतो. यामुळे विश्वास, सहानुभूती आणि समजूतदारपणा निर्माण होऊन नातेसंबंध वाढतात. उपचारकर्ते, समुपदेशक, सामाजिक कार्यकर्ते आणि प्रशिक्षक म्हणून आपल्यावर एक जबाबदारी असते- रुग्णाला स्वतःच्या पायावर उभे राहण्याचा आत्मविश्वास प्रदान करण्याचा.

पालक, शिक्षक, सल्लागार, मदतनीस, मार्गदर्शक या भूमिकेची एक जबाबदारी असते. लहान बालकांना निरामय आणि आनंदी जीवनमान देताना त्यांच्या आत्मसन्मानाला तडा जाऊ नये. या प्रश्नांनी अगणित संशोधनांना जन्म दिला आणि व्यक्तिमत्व शोधाची दालने उघडताना उपचारपद्धतीच्या तंत्रांना आणि पालकत्वाच्या रणनीतीला मोजमापाचे आयाम बहाल केले. अर्थात अद्यापही बरेच हाती लागायचे आहे, पण मानसशास्त्रज्ञांना एक हत्यार नक्कीच गवसलंय- बिनशर्त सकारात्मक स्वीकार!

### काय आहे हे तंत्र ?

सोप्प्या भाषेत सांगायचे तर- संपूर्ण स्वीकाराची आणि प्रेमाची समर्पण शक्ती म्हणजे बिनशर्त सकारात्मक स्वीकार! तो स्वतःविषयी असो वा इतर कोणाबद्दल असो. समोरची व्यक्ती मूळातच मानव आहे आणि म्हणून प्रेमास पात्र आहे. याचा अर्थ असा नाही की त्या व्यक्तीची प्रत्येक कृती पटेलच असे नाही, फक्त पृष्ठभागावर दिसणाऱ्या व्यक्तीच्या खोल अंतरंगात डोकावून बघणे त्यांत अंतर्निहित असते. उपचारांमध्ये मात्र आणखी एक बाब असते. एक सकारात्मक, विश्वासार्ह नातेबंधाची पेरणी करणे.

### बिनशर्त सहर्ष स्वीकारामागील मानसशास्त्र

कार्ल रॉजर्स म्हणतात, रुग्णसेवेतील पहिला आणि प्रमुख टप्पा म्हणजे रुग्णांना आहे तसे स्वीकारणे, त्यांच्या कथनावर विश्वास ठेवणे- मनात कोणताही किंतु परंतु न आणता. असेच वर्तन विश्वासार्हतेला जन्म देते. हा सहर्ष स्वीकार म्हणजे रुग्णावर प्रेम करणे नसते किंवा त्याच्या हो ला हो म्हणणे नसते. तो असतो उपचार करून घेणाऱ्या व्यक्तीचा सन्मान, त्यांच्या इच्छांचा आदर आणि शक्य तितकं सहकार्य करण्याची त्यांची तयारी असते यावर विश्वास ठेवणे. अशा विचारांनी रुग्णाला सामोरे गेल्यास त्यांना आपले विचार, भावना आणि वर्तनविषयक खुल्या दिलाने काही माहिती देता येते, खुलासे करता येतात आणि ते अधिक मनमोकळेपणे संवाद साधू शकतात.

उपचारकर्ता अविश्वास दाखविणार असेल, असहमत असेल किंवा झिडकारून टाकणार असेल तर मग उपचार करून घेणारी व्यक्ती मूग गिळून बसते, आपली कोणतीही माहिती नकारात्मकच मानली जाईल, स्वीकारली जाणार नाही असा त्या रुग्णाचा ग्रह होऊन बसेल. आणि अशी महत्वाची माहिती मिळाली नाही तर त्याचा उपचारांवर गहिरा प्रभाव पडू शकतो आणि हाताळणी मुश्किल होऊन बसते . विनाअट सहर्ष स्वीकार हा पालकांकडून किंवा आयुष्यातील इतर नात्यांकडून न मिळालेल्या आनंदाचा, स्वीकाराचा पर्याय असू शकतो. बालपणी घरातून असा स्वीकार न मिळालेल्या व्यक्तींचा स्वतःवर कमी विश्वास असतो, स्वतःला कमी लेखण्याकडे त्यांची प्रवृत्ती असते परिणाम स्वतःच्या पूर्ण क्षमतांची त्यांना जाण नसते, मग व्यक्तिगत विकास कसा संभवेल? हे १९५९ साली रॉजर्स ने नोंदविलेलं मत आहे.

उपचारकर्त्याकडून मिळालेला असा प्रतिसाद उलट त्यांना अधिक सुरक्षित करतो, भावना उघड करायला मदत करतो आणि अशा पर्यायी पालकांना समस्या सोडविण्यासाठी सहकार्य करण्याकडे नेतो. विल्किन्स ने हे संशोधन २००० साली केलेलं आहे.

### कार्ल रॉजर्सचा सिद्धांत

कोणाही बरोबर असणे म्हणजे तात्पुरते तुमचे विचार, निष्ठा बाजूला ठेवणे आणि दुसऱ्याच्या विश्वात पूर्वग्रहाविना प्रवेश करणे. याचाच दुसरा अर्थ असाही होऊ शकतो की काही काळासाठी तुम्ही स्वत्व वेगळं करता पण त्यासाठी तुम्ही अंतर्गत दृष्ट्या सुरक्षित असता कां, भावविश्व कितीही वेगळं आणि विचित्र असलं तरीही आणि काही घडलंच तरीही ते हरपणार नाहीत याची खातरजमा करता कां? मनात येईल तेव्हा स्वविश्वात परतता येईल याची तुम्हाला खात्री असते कां? यावरून असा खुलासा होतो की कोणाही बाबत आपण करुणा, अनुकंपा दाखवित असतो तेव्हा ती क्लिष्ट, भक्कम यंत्रणा असते, पण तितकीच ती सूक्ष्म आणि हळुवारही असते.

**म्हणून १९५७ साली त्याने विनाअट सहर्ष स्वीकाराची खालील परिभाषा सुचविली-**

उपचार करून घेणाऱ्याची बडदास्त राखताना फार मालकी हक्क गाजवायचा नाही पण उपचारांच्या मूलभूत मर्यादा मात्र पाळायच्या. थोडक्यात पायात पाय न घालता, दोघेही भिन्न व्यक्तित्व आहोत याचे भानही राखायचे म्हणजे स्वतःच्या भावना आणि स्वतःचे अनुभव जपता येतात. त्याच्या मते मानवाला दोन जन्मजात प्रेरणा असतात आणि विनाअट सहर्ष स्वीकाराची प्रभावी उपचारपद्धतीचे आकर्षण असते-

१) समाजात वावरताना विधायक वर्तनातून इतरांशी सकारात्मक संबंध ठेवणे.

२) स्वतःचा मार्ग निवडण्याचा अधिकार आणि तो सांभाळण्याची जबाबदारी !

### काही उदाहरणे-

रुग्ण जेव्हा उपचारकर्त्याशी आपले विचार आणि भावना यासंदर्भात संभाषण करतो आणि ते नैतिक दृष्ट्या चुकीचे अथवा किमान अस्वीकारार्ह असले तरीही बिनशर्त आणि हसत हसत त्याचा स्वीकार व्हायला हवा. त्यामागे काय नेमके असते याचा शोध घेता आला पाहिजे.

दुसरे उदाहरण- एखाद्या रुग्णाच्या वर्तनात स्वतःला इजा करून घेण्याची प्रवृत्ती असेल किंवा मद्य, अंमली पदार्थांचे व्यसन आढळले तरीही हा स्वीकार तितकाच मनातून यायला हवा. अशावेळी संभाव्य दुखापतींकडे दुर्लक्ष करणे किंवा रुग्णाला त्याच्या वर्तनाबद्दल वेडेवाकडे बोलणे यापेक्षा थोडे समुपदेशन अधिक मोलाचे ठरू शकते. मग त्या रुग्णाला धीर येऊन तो अजूनही स्वीकारार्ह आहे, त्याने चुका केल्या तरी त्याकडे दुर्लक्ष करणे कसे शक्य आहे हा संदेश जाणे खूप महत्वाचा.

**कारण जर उपचारकर्त्याला हे चालत असेल तर रुग्णाला स्वतःच्या गैरवर्तनाचा स्वीकार सहज शक्य आहे.**

समाजकार्यात हा स्वीकार तर अधिकच मोलाचा मानला जातो. समाजात काम करताना अनेक विचारसरणीच्या व्यक्तींशी हरघडी संबंध येत असतो. तेथे संदर्भांच्या चौकटी अधिक विस्तारतात मग ते कुटुंब असो वा दाम्पत्य जीवनातील विवाद असोत. अशी मंडळी मानसिकदृष्ट्या थोडी खालावलेली असतात, स्वतःबद्दल आणि इतरांबद्दल नकारात्मक दृष्टिकोन बाळगतात. त्यांची संस्कृती, बाल्यावस्थेतील संस्कार आणि त्यांतून येणारे अनुभव सामाजिक कार्यकर्त्यांना समृद्ध करून जातात आणि खूप काही शिकवून जातात. अशारितीने सामाजिक कार्यकर्ते त्यांची मदत करण्याची शक्ती वाढवू शकतात. त्यासाठी त्यांनाही प्रत्येक वर्तनाचा स्वीकार करण्याची गरज नसते.

समोरची व्यक्ती स्वतःची दिशा ठरवू शकते एवढाच अर्थ त्यातून काढता आला पाहिजे. मग समोर आलेल्या व्यक्तीला मनमोकळं, दिलखुलास बोलायची संधी मिळते आणि प्रश्न सुटत जातात. बदल शक्य आहेत, हे पटलं की ते मनात रुजायला सुरुवात होते आणि अशक्य ते शक्य संभवते.

हसत हसत विनाअट स्वीकाराचा मोठा घटक असतो पालकत्व. आपले बाळ कसेही असले तरी ते पालकांना स्वीकारावेच लागते. या संदर्भात डॅन गॅलेहेर यांचे एक महत्वाचे निरीक्षण मनन करण्यासारखे आहे. ते म्हणतात- प्रत्येक बालकाला आपल्या पालकांकडून अकृत्रिम प्रेम मिळविण्याचा नैसर्गिक अधिकार असतो. मग त्यांच्यात बांधिलकी घट्ट होते आणि पूर्वी कधी आले नाहीत, ते अनुभव वाट्याला येण्याची ती सुखद सुरुवात असते.

असंच मत झिग झिग्लर यांचेही आहे- आसपासच्या नकारात्मक वातावरणात मुलांना वाढवायचे असेल तर पालकांनाच सकारात्मक, विधायक दृष्टिकोन स्वीकारायला हवा. आपल्या पाल्यांसमोर आपणच आदर्श व्हायला हवे. रॉजर्सनेही १९४६ मध्ये उपचारकर्ते, सामाजिक कार्यकर्ते यांच्या बैठकीला पालकांना आणून बसवत नोंदवले आहे. तुमचं मुल जे करतं ते डोळे मिटून स्वीकारू नका, त्याला धोकादायक सवयींपासून दूर ठेवायलाच हवे पण त्यासाठी पालक आपल्या पाल्यावर जीवापाड प्रेम करताहेत, त्याची काळजी घेताहेत हेही त्यांना जाणवले पाहिजे. मगच बालकांचा विकास शक्य होतो आणि त्यातून आत्मविश्वासाची पेरणीही होते.

कार्ल रॉजर्स म्हणतो- आपल्या पाल्यांना सहर्ष आहेत तसे स्वीकारणे म्हणजे त्यांना नकळत इतरांनाही आहे तसे स्वीकारण्याची सवय लागते आणि स्व-मूल्याची जाण येते.

मुलांनी फक्त चांगलं वागल्यावरच त्यांच्यावर प्रेम करायचे असा संदेश त्यांना चुकूनही जाता कामा नये. त्यांना योग्य पर्याय निवडायला शिकवणे आणि त्यामार्गाने त्यांचा आत्मसन्मान जागा करणे हे दीर्घ पल्ल्याचे संगोपन असते.

### शब्दांची निवड-

आपले विचार समोरच्या व्यक्तीपर्यंत यथायोग्य जाण्यासाठी आणि तिचा गैरसमज टाळण्यासाठी शब्दांची निवड तोलून-मापून आणि अचूक करावी लागते- योग्य संदेश तर जायला पाहिजे पण त्याचबरोबर ती व्यक्ती दुखावता कामा नये अशी ही तारेवरची कसरत असते. शब्दांची निवड आश्चर्यकारकरित्या अचूक काम करून जाते.

समोरच्या व्यक्तीला रागविण्याच्या तयारीत असताना वाईट शब्दांचा वापर करण्याची खुमखुमी येणे स्वाभाविक असते, पण त्यामुळे कायमची दुखापत होण्याची शक्यताही तितकीच. टीका, सुधारण्याची संधी एकवेळ उपयुक्त पण तेथेही मोजके शब्द हवेत. उदा- तुझे वर्तन लाज आणणारे होते किंवा शरमेनं मान खाली घालायला लावणारे होते असं म्हणण्यापेक्षा तुझ्या वागण्याने मी दुखावलो, निराश झालो यातून अभिप्रेत असलेला अर्थ अंतर्मुख करण्यास भाग पाडतो आणि सुधारणेची संधी देतो.

थोडक्यात तंत्र बदलायचे पण अपेक्षित परिणाम मात्र साधायचा. स्वतःच्या अभिव्यक्तीतून अपेक्षित संदेश जातो की नाही याकडे लक्ष द्यावे लागते.

### अनुमोदनासाठी वर्तनात बदल-

काही साधी, सोपी तत्व ध्यानात ठेवली तर हे पुष्टीकरण फारसे अवघड नसते.

* माझ्या पाल्याची गुणवत्ता वादातीत आहे आणि त्याने ती कमावली आहे.
* मला मुलाच्या सर्व निवडी मान्य असतातच असे नाही, पण मी सदैव त्याच्या पाठीशी असतो.
* जोपर्यंत तो चुकांमधून काही शिकायला तयार आहे, तोपर्यंत माझ्या मुलाने चुका करणे, मोजकी जोखीम घेणे याला माझी हरकत नाही.
* जे ठरवेल ते होण्याची क्षमता माझ्या पाल्यात आहे.
* मी आधार देण्यासाठी, समजून घेण्यासाठी आणि मार्गदर्शन करण्यासाठी सदैव उपलब्ध आहे, टीका करण्यासाठी नाही.

शिक्षकांसाठी(ही) काही मार्गदर्शक तत्वे-

* विद्यार्थ्यांना त्यांच्या यशाचे, कर्तृत्वाचे श्रेय देणे
* मोजक्या आणि नेमक्या शब्दांमध्ये विद्यार्थ्यांच्या निर्णयांचे आणि कृतींचे कौतुक करणे
* मत विचारून विद्यार्थ्यांचा सन्मान राखणे, त्यांच्या निर्णयांना बांधील राहणे आणि आवश्यकता भासल्यास स्वतःच्या निर्णयांची पार्श्वभूमी समजावून सांगणे
* स्वायत्तता देत, वैविध्यपूर्ण संधी देत त्यांच्या क्षमतांचा विकास होण्यास मदत करणे, त्यांचा कस लागेल इतपत त्यांच्यासमोर आव्हाने उभी करणे
* यशाचा विनम्र स्वीकार करताना उन्मादी वर्तन टाळण्याचा सल्ला देणे शेवटी मी परिपूर्ण नाही, पण पुरेसा आहे हे मनात ठसणे महत्वाचे. विनाअट सहर्ष स्वीकाराची भेट कोणालाही देणे हीच सर्वात मोठी देणगी असते. प्रेम करण्यासाठी पूर्वअट नसते.

सुशील सिंग म्हणतात तसे- मला तुम्ही वाचवू नका, पण जेव्हा मी स्वतःचा बचाव करीत असेन तेव्हा तुम्ही मदतीला असा. तुम्हाला पूर्ण करण्यासाठी कोणाचीही गरज नसते, उलट तुम्हाला पूर्णपणे स्वीकारण्यासाठी कोणाची तरी नितांत गरज असते.

---

परराष्ट्रकारण
राहुल गोखले



# नेपाळमध्ये राजेशाहीच्या मागणीचा अर्थ!

नेपाळमध्ये राजेशाहीची पुनर्प्रतिष्ठापना करण्याच्या मागणीने जोर धरला आहे. मार्च महिन्याच्या सुरुवातीस नेपाळची राजधानी काठमांडू येथे राजे ज्ञानेंद्र यांचे त्यांच्या समर्थकांनी जंगी स्वागत केले होते. राजेशाहीची मागणी करणाऱ्या नागरिकांच्या भावना समजून न घेता पंतप्रधान के. पी. शर्मा ओली यांनी उलट त्यांना डिवचले होते.

राजेशाही नेपाळमध्ये परतणार नाही एवढे बोलून न थांबता त्यांनी राजे ज्ञानेंद्र यांनी २०२७ साली होणाऱ्या सार्वत्रिक निवडणुकीत भाग घ्यावा, असे आततायी विधान केले. त्यामुळे राजेशाहीचे समर्थक अधिकच संतप्त झाले. त्यांच्या प्रतिनिधींनी राजे ज्ञानेंद्र यांच्याशी संपर्क साधला आणि त्या झालेल्या चर्चेच्या आधारावर सरकारला राजेशाही पुनर्प्रस्थापित करण्याचे आवाहन केलेच; पण तसे झाले नाही तर निदर्शने अधिक तीव्र करण्याचा इशारा दिला. त्यानुसार मार्च महिन्याच्या अखेरीस काठमांडूमध्ये झालेल्या निदर्शनांत हजारो जण सहभागी झाले. जनसमुदायाला पांगविण्यासाठी पोलिसांनी अश्रुधुराच्या नळकांड्या फोडल्या तेव्हा निदर्शक भडकले आणि हिंसाचारास तोंड फुटले. दगडफेक, जाळपोळ सुरू झाली. परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी पोलिसांनी गोळीबार केला. हिंसाचारात दोन जण मृत्युमुखी पडले; पैकी एक या घटनेचे वार्तांकन करीत असलेला पत्रकार तर दुसरा निदर्शक.

गेल्या काही महिन्यांपासून नेपाळ आणि विशेषतः काठमांडूमधील वातावरण तणावपूर्ण आहे. ताज्या हिंसाचारानंतर तेथील काही भागांत संचारबंदीदेखील लागू करावी लागली. या सर्व गदारोळाची म्हणूनच दखल घेणे गरजेचे.

राजेशाही की लोकशाही असा प्रश्न पडतो तेव्हा आदर्श राज्यव्यवस्था म्हणून सुज्ञ लोक लोकशाहीच्या पारड्यात वजन टाकतात. मात्र याचा अर्थ लोकशाही मार्गाने निवडून येणाऱ्या सरकारांनी कितीही निकृष्ट कारभार केला तरी सामान्यांनी त्याचे गोडवे गावेत असा नव्हे.



२००८ साली नेपाळ प्रजासत्ताक बनले. तेव्हा २४० वर्षांची राजेशाही व्यवस्था संपुष्टात आली होती. १९९० च्या दशकात नेपाळमध्ये लोकशाहीसाठी मागण्या होऊ लागल्या तेव्हा राजे बिरेंद्र यांनी घटनात्मक राजेशाहीकडे वाटचाल करण्याची तयारी दर्शविली. त्यानंतर नेपाळमध्ये कम्युनिस्टांचे सरकार १९९४ साली सत्तेत आले; तथापि ते सरकार १९९५ साली बरखास्त करण्यात आले. परिणामतः नेपाळमध्ये माओवाद्यांच्या उठावाला हिंसक स्वरूप मिळाले. हा उठाव दहा एक वर्षे चालला. या हिंसाचारात नेपाळमध्ये हजारो मृत्युमुखी पडले. राजेशाही कायमस्वरूपी रद्द करण्याची ग्वाही मिळाली तेव्हा या उठावाची २००६ साली अखेर झाली.

या दरम्यानच २००१ साली राजे बिरेंद्र आणि राजघराण्यातील अन्य काही सदस्यांची राजपुत्र दीपेंद्र यांनी हत्या केल्याने बिरेंद्र यांचे बंधू ज्ञानेंद्र राजेपदी विराजमान झाले होते. २००५ साली राजे ज्ञानेंद्र यांनी माओवादी बंडखोरांना पराभूत करण्यासाठी निर्विवाद राजेशाही पुनःप्रस्थापित केली. अर्थात ती व्यवस्था फार काळ चालली नाही. कारण त्यांनी सत्तेची सूत्रे हातात घेताच सरकार, संसद स्थगित केली; पत्रकार, कार्यकर्ते यांना तुरुंगात डांबले. त्याविरोधात प्रतिकार झाला तेव्हा ज्ञानेंद्र यांनी लोकशाही व्यवस्था आणण्याचे वचन दिले. २००८ साली नेपाळच्या संसदेने राजेशाही रद्दबातल ठरविण्याचा प्रस्ताव संमत केला; त्या प्रस्तावास ६०१ खासदारांपैकी केवळ ४ खासदारांनी विरोध केला होता. याचाच अर्थ राजेशाही रद्द करण्याचा निर्णय संसदेत एकमुखाने घेण्यात आला होता.

याचाच दुसरा अर्थ असा की लोकशाही राज्यव्यवस्था कार्यक्षम आणि प्रभावीपणे राबविण्याची जबाबदारीदेखील त्या लोकप्रतिनिधींची होती. मात्र, त्यांनी जनतेचा पुरता अपेक्षाभंग केला आहे. राजेशाही संपुष्टात आल्यानंतर गेल्या १७ वर्षांत तेथे तब्बल १३ सरकारे आली आहेत. त्यातही त्या सरकार स्थापनेला विचारधारांचा आधार नाही. आहे ती केवळ राजकीय साठमारी. आता राजेशाहीच्या पुनर्प्रस्थापनेची मागणी होत आहे त्यामागे राजकीय पक्षांविषयी झालेला भ्रमनिरास हे महत्त्वाचे कारण आहे. राजेशाही जाऊन लोकशाही आली; तीच मुळी कम्युनिस्टमाओवाद्यांना सत्ता मिळत. तेव्हा तेथे भारताऐवजी चीनला महत्त्व मिळाले, यात नवल नाही.

२००८ साली पुष्पकमल दहल उर्फ प्रचंड हे माओवादी पंतप्रधान झाले. तेव्हा त्यांनी भारताचा दौरा अवश्य केला, पण प्रथम त्यांनी चीनचा दौरा केला. सामान्यतः नेपाळचे कोणतेही नवीन पंतप्रधान परराष्ट्र दौऱ्याची सुरुवात भारताला भेट देऊन करतात, असा पायंडा होता. प्रचंड यांनी त्यास छेद दिला. सरकारमध्ये माओवाद्यांच्या वाढत्या प्रभावाचा परिणाम असा झाला की, नेपाळचे भारताशी संबंध कटू होऊ लागले; तर चीन मात्र नेपाळमध्ये हस्तक्षेप करू लागला. नेपाळला आपल्या कह्यात घेण्यासाठी चीनने कोरोना काळापासून बंद असलेले अनेक व्यापार नाके अलिकडच्या काळात सुरू केले. चीनने नेपाळमध्ये पायाभूत सुविधा आणि मोठे प्रकल्प यांत घसघशीत गुंतवणूक केली आहे. २०२३ सालच्या सप्टेंबर महिन्यात प्रचंड बीजिंगच्या दौऱ्यावर होते तेव्हा चीन आणि नेपाळदरम्यान १२ द्विपक्षीय करारांवर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या.

चीनच्या बेल्ट रोड इनिशिएटिव्ह प्रकल्पात नेपाळने सहकार्याची भूमिका घेतली आहे. नेपाळमध्ये आर्थिक समस्या आहेतच; पण भ्रष्टाचारदेखील बोकाळला आहे. अस्थैर्य, राजकीय साठमारी, आर्थिक गैरव्यवस्थापन आणि चीनवर अतिरिक्त अवलंबित्व ही गेल्या १७ वर्षांच्या लोकशाही व्यवस्थेची फलनिष्पत्ती. या सगळ्याचे पर्यवसान पुन्हा राजेशाहीकडे जाण्याच्या वाढत्या मागणीत झाले आहे.

स्वतः राजे ज्ञानेंद्र यांनी फेब्रुवारीत नेपाळमध्ये साजरा होणाऱ्या राष्ट्रीय लोकशाही दिनी राष्ट्राचे रक्षण करण्यासाठी आपली जबाबदारी खांद्यावर घेण्याची वेळ आली आहे, असे विधान केले व राष्ट्राच्या भवितव्याची चिंता असेल तर आपल्याला समर्थन देण्याचे आवाहन केले. २००८ नंतर लोकशाही दिन अथवा अशा अन्य प्रसंगी ज्ञानेंद्र जनतेला संदेश प्रसृत करीत आले असले, तरी यंदा त्यांनी दिलेला संदेश स्पष्ट आणि थेट होता.

गेल्या दोन-तीन महिन्यांत स्वतः ज्ञानेंद्र यांची सक्रियता वाढली आहे. त्यांनी नेपाळमधील अनेक स्थळांना भेट दिलीच; पण भारतातदेखील लखनौ आणि गोरखपूरचा दौरा केला. याचा आणि राजेशाहीसाठी होणाऱ्या निदर्शनांचा अर्थ लगेचच नेपाळमध्ये लोकशाही व्यवस्था गुंडाळली जाईल असा नव्हे. हिंदू राष्ट्रवादी आणि राजेशाहीचा कट्टर समर्थक राष्ट्रीय प्रजातंत्र पक्षाला २०२२ साली झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीत ६ टक्के मते मिळाली आणि कनिष्ठ सभागृहाच्या २७५ जागांपैकी १४ जागा. तत्पूर्वीच्या २०१७ सालच्या निवडणुकीत त्या पक्षाला २ टक्के मते मिळाली होती आणि अवघ्या एका जागेवर समाधान मानावे लागले होते.

अडीच वर्षांत त्या पक्षाला असणारे जनसमर्थन वाढत आहे. ते सत्ता काबीज करता येईल इतके नसेल; पण अन्य राजकीय पक्षांच्या कारभाराबद्दल सामान्यांचा भ्रमनिरास व्यक्त करणारे आहे. आता उठणाऱ्या राजेशाही पुनर्प्रस्थापित करण्याच्या मागण्यांकडे नेपाळमधील राजकीय पक्षांनी कुत्सितपणे पाहण्याऐवजी आपल्या करंटेपणाला जनतेने दाखविलेला हा आरसा आहे, या भावनेतून पाहिले तर त्यांना कारभार सुधारता येईल. राजेशाहीबद्दल नाके मुरडून स्वतःच्या दायित्वातून मोकाट सुटता येणार नाही.

# भारत विकसित राष्ट्र होताना...



**आर्थिक असमानता ही केवळ भारताची चिंता नसून, संपूर्ण जगाला हा प्रश्न भेडसावत आहे. स्वित्झर्लंडसारख्या श्रीमंत देशातही, मूठभरांच्या हाती देशाची संपत्ती एकवटली आहे. भारतीयांच्या दरडोई उत्पन्नात वाढ होण्यासाठी, म्हणूनच केंद्र सरकार ठोस उपाययोजना राबवताना दिसून येते.**

विशेष


संजीव ओक


अर्ध्या देशातील अर्ध्या जनतेजवळ साडेतीन लाख रुपयेही नाहीत आणि जागतिक पातळीवर ९० टक्के लोकसंख्याही आर्थिक धक्क्याला सामोरे जाण्यास सक्षम नाही. कृत्रिम बुद्धिमत्ता तसेच ऑटोमेशनमुळे रोजगारात बदल होत असून, यामुळे जगातील विषमता वाढत असल्याचा इशारा नुकताच एका अहवालात देण्यात आला. संपत्तीचे होत असलेले केंद्रीकरण हे धोकादायक असल्याचे हा अहवाल म्हणतो. भारतातच नव्हे तर स्वित्झर्लंडमध्येही देशातील केवळ एक टक्के धनिकांकडेच, देशातील एकूण संपत्तीच्या ४३ टक्के इतकी संपत्ती असल्याचे या अहवालात अधोरेखित करण्यात आले आहे. म्हणजेच, आर्थिक विषमता हा केवळ भारताच्या चिंतेचा विषय नसून, तो संपूर्ण जगात असलेला दिसून येतो.

स्वित्झर्लंडमध्ये प्रत्येक प्रौढ व्यक्तीकडे सरासरी ६ लाख, ८५ हजार डॉलर्स इतकी संपत्ती आहे. त्यामुळे तो जगातील सर्वात श्रीमंत देश ठरला आहे. भारतीयांची सरासरी संपत्ती चार हजार डॉलर्स इतकीच आहे. निम्म्या जगात हेच प्रमाण ८ हजार, ६५४ डॉलर्स इतके आहे. म्हणजेच, भारतीयांच्या दरडोई उत्पन्नात वाढ होणे गरजेचे आहे. देशातील असमानतेचे प्रमुख कारण हे ग्रामीण गरिबी तसेच बेरोजगारी हे होय. भारतातील एक मोठा वर्ग ग्रामीण भागात राहतो आणि तो शेतीवर अवलंबून आहे. अनियमित पावसाळा, सिंचनाची अपुरी सोय, कालबाह्य शेती तंत्र, दराची अनिश्चितता यामुळे त्याला आजवर अनेक आर्थिक समस्यांना तोंड द्यावे लागत होते. तसेच, मुख्य आर्थिक प्रवाहातील मर्यादित प्रवेशही ग्रामीण जनतेच्या विकासाच्या आड येत होता. मात्र, आता देशातील एक मोठा वर्ग गरिबीतून बाहेर आला आहेच, त्याशिवाय डिजिटल पायाभूत सुविधांमध्ये झालेली वाढ आणि 'युपीआय'च्या विस्ताराने देशात सर्वत्र आर्थिक समावेशनाला चालना मिळाली आहे.

२०४७ साली भारत हा 'विकसित राष्ट्र' म्हणून जगात ओळखला गेला पाहिजे, यासाठी केंद्र सरकार विशेषत्वाने काम करत आहे. गेल्या दहा वर्षातील भारताच्या अर्थवृद्धीचा वेग, जगाला चकित करणारा ठरला आहे. भारताबद्दल काही गैरसमज पाश्चात्यांमध्ये रूढ आहेत, त्याला छेद देण्याचे काम सरकार करत आहे. या गैरसमजातील एक समज म्हणजे, भारत ही केवळ कृषी अर्थव्यवस्था आहे हा होय. भारत हा कृषिप्रधान देश असून, भारतीय अर्थव्यवस्था आणि ग्रामीण भागातील विकासात हे क्षेत्र मोलाचे योगदान देत आहे. असे असले, तरी भारत केवळ कृषी अर्थव्यवस्था आहे, ही धारणा जुनी झाली आहे. भारताच्या 'जीडीपी'मध्ये सेवा क्षेत्राचा प्रमुख वाटा असून, तो ५० टक्क्यांपेक्षा जास्त आहे. उत्पादन, बांधकाम आणि खाणकाम यांचा समावेश असलेले उद्योगदेखील, वाढीत मोलाची भूमिका बजावतात. माहिती-तंत्रज्ञान, दूरसंचार आणि वित्तीय सेवा यांसारख्या क्षेत्रांच्या वाढीमुळे, भारताचा आर्थिक विस्तार झाला. तसेच यामुळे अर्थव्यवस्थेमध्ये विविधता आली आहे. त्याचबरोबर, भारताच्या वाढीचा देशातील मूठभर उद्योजकांनाच लाभ होतो, असाही चुकीचा प्रवाद पसरवला जात आहे.

उत्पन्नातील असमानता ही देशासाठी निर्विवादपणे चिंतेची बाब आहेच. लोकसंख्येच्या एका लहान वर्गाच्या हातात संपत्तीचे केंद्रीकरण झाले, असे ढोबळमानाने म्हणता येते. तथापि, आर्थिक वाढीचा फायदा केवळ उद्योगपतींनाच झाला, असे विधान करणे चुकीचे ठरते. गेल्या काही दशकांमध्ये देशातील गरिबीचे प्रमाण लक्षणीयरित्या कमी झाले असून, देशाच्या आर्थिक प्रगतीमुळे लाखोंना गरिबीतून बाहेर काढण्यात सरकारला यश आले आहे. येत्या काळात भारताचे दरडोई उत्पन्न वाढवण्यासाठी बहुआयामी दृष्टिकोनाची आवश्यकता आहे. आर्थिक विकासाला प्रभावीपणे चालना देणारी अनेक धोरणे, केंद्र सरकार राबवत आहे. त्यासाठीच पायाभूत सुविधांमध्ये विक्रमी, ऐतिहासिक गुंतवणूक करण्यात येत आहे. पायाभूत सुविधांचा विस्तार विकासाला चालना देणारा ठरत असून, त्यामुळे रोजगारनिर्मितीही होत आहे. त्याचबरोबर, इंटरनेट कनेक्टिव्हिटी आणि तंत्रज्ञानाचा अवलंब डिजिटल प्रवेशाला प्रोत्साहन देत, व्यवसायांना अधिक कार्यक्षमतेने मोठ्या बाजारपेठांमध्ये प्रवेश करण्यास सक्षम करणारे ठरते आहे. उत्पादन वाढीसाठी 'मेक इन इंडिया' तसेच, 'आत्मनिर्भर भारत' असे उपक्रम हाती घेण्यात आले असून, यातून निर्यातवाढीलाही प्रोत्साहन दिले जात आहे. कुशल मनुष्यबळासाठी, कौशल्य विकासाचा कार्यक्रमही हाती घेण्यात आला आहे. त्यामुळे उद्योगांनाही कुशल मनुष्यबळ उपलब्ध होत आहे. विशेषतः उत्पादन, माहिती-तंत्रज्ञान आणि अक्षय ऊर्जा यांसारख्या क्षेत्रांमध्ये त्याची मोलाची मदत होत आहे. शेतीला चालना देण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून, उत्पादकता वाढवण्यासाठी विविध प्रयोग केले जात आहेत. शेतकऱ्यांच्या उत्पन्न वाढीसाठी लॉजिस्टिक्स, स्टोरेज आणि प्रक्रिया सुविधांमध्ये मोठी गुंतवणूक केली आहे. रोजगार निर्मितीला चालना देण्यासाठी, नवोद्योगांना बळ दिले जात असून, संशोधन आणि विकास यांसाठीही भरीव निधी देण्यात आला आहे. या साऱ्याचे एकत्रित परिणाम म्हणून, भारत जगाचे उत्पादन केंद्र म्हणून उदयास येईलच, त्याशिवाय देशातील जनतेचे दरडोई उत्पन्नही लक्षणीयरित्या वाढेल. भारत नवनवीन व्यापार करार करण्यावर भर देत आहे. यामुळे भारतीय उत्पादनांसाठी जगाची बाजारपेठ उपलब्ध होणार आहे. त्यामुळे निर्यातीस बळ मिळेल. निर्यातदारांना प्रोत्साहन दिल्यामुळे, विदेशात भारतीय वस्तूंच्या मागणीत वाढ होईल. आर्थिक क्षेत्रातील सुधारणा उद्योजकता आणि विकासाला चालना देत आहेत. विशेषतः लघु आणि मध्यम उद्योगांच्या वाढीसाठी केंद्र सरकार लक्ष देत आहे. व्यवसाय सुलभीकरणासाठीही सरकार प्रयत्नशील आहे. दरडोई उत्पन्न वाढवण्यासाठी भारताची शाश्वत वाढ सुनिश्चित केली जात असून, त्यासाठी गुंतवणुकीचा एक व्यापक दृष्टिकोन सरकारने ठेवला आहे. आज निश्चित उपाययोजना राबवल्या, तर काही वर्षांनी देश 'विकसित राष्ट्र' म्हणून पुढे येईल. केंद्र सरकार आज त्यासाठीची पायाभरणी करत असून, त्याचे दृश्य परिणाम आणखी काही वर्षांनी दिसून येतील, हे नक्की.

## सांज शृंगार

गायी घराला आल्या गोठ्यात निनादे
हंबर संध्येची माया पांघरुण
कुणी झाकीले अंबर?
दिवस अस्ताला गेला तसे रान
सारे मंतरले तोडूनी आभाळ
आज डोहात कुणी अंथरले?
झाडे निजेला आलीत तशा
सुस्तावल्या छाया
संध्येचे काजळ लेवून उजळे
धरतीची काया तेवतोय एकट दिवा
देवळाच्या पारावरती रजनीचं पाऊल पडे
संध्येच्या दारावरती खळ्यातील घुंगरांचा
नाद जडलाय रानाला साद घालती
रानझरे अशावेळी गं कुणाला?
आभाळ छान सजलं उशाला
माळूनी तारे
आळस झटकुनी जागे धुरात माखलेली
घरे असा हा सांज शृंगार आठवांच्या
भेटीगाठी संध्येचा गाव
वसावा निर्जन झऱ्याकाठी...

पुंडलिक आंबटकर

## निर्धाराचे एक पाऊल...

निर्धाराचे एक पाऊल असावे सदा पुढे
प्रत्येकाचे। पाणी वाचवा, पाणी साठवा
महत्त्व जाणावे जलदेवतेचे।।
थेंबाथेंबांची करावी बचत जलदेवतेला
प्रदूषित न करावे।
ध्यास असावा पर्यावरण रक्षणाचा
ध्वनी व वायू प्रदूषण टाळावे।।
सहकार्य करावे देशहित जाणून स्वच्छ
भारत अभियानाला।
आरंभ करावा स्वत:पासून
केव्हाही सत्कार्य करण्याला।।
आजचा विद्यार्थी आहे आधारस्तंभ या
मायभूचा । निर्धार असू दे तुझे मनी
गगनावर वेल जाईल तव कर्तृत्वाचा।।
पाणी हे जीवन आहे धरती आपली माता
आहे प्लॅस्टिक मुक्त असावा भारत
काळाची ही गरज आहे।।
निर्धाराचे एक पाऊल असावे
सदा पुढे प्रत्येकाचे।
नाव उज्ज्वल करा शाळेचे,
नाव उज्ज्वल करा देशाचे।।

स्मिता देशमुख

# जास्त कपड्यांचा हव्यास; पर्यावरणाचा ऱ्हास



पर्यावरण


मिलिंद बेंडाळे


**पूर्वी दिवाळी, वाढदिवसाला कधी तरी नवे कपडे घालायला मिळायचे. दोन-तीन ड्रेस म्हणजे चंगळ असायची; पण आता अनेकांची आर्थिक परिस्थिती बदलली आहे. मनात येईल तेव्हा नवे कपडे घेतले जातात. मात्र हा नवा चंगळवाद निसर्गाच्या, पर्यावरणाच्या मुळावर येत आहे. जादा कपडे घेण्याची हौस नकळत पर्यावरणाचे नुकसान करत आहे, हे अनेकांना माहीत नाही.**

जादा कपडे खरेदी करणे हे पर्यावरणाला घातक असल्याची चर्चा राष्ट्रीयआंतरराष्ट्रीय स्तरावर सुरू झाली आहे. कपड्यांची साठवणूक ही तत्त्वानुसारच व्हायला हवी, असे मत व्यक्त केले जात असले, तरी तरी दिखाव्याच्या या जगात रोज आपल्या पोशाखात नवनवीन बदल करून प्रवाहात राहणे आणि फास्ट फॅशनच्या नावाखाली मिळणारे स्वस्त कपडे बदलणे हीच सर्वात सोपी गोष्ट आहे.

कपडे बनवताना प्लॅस्टिकचा वापर मोठ्या प्रमाणात होतो हे आपल्यापैकी बहुतेकांना माहीत नाही. पूर्वी फक्त कापसाच्या धाग्याचा वापर कपडे बनवण्यासाठी मोठ्या प्रमाणात केला जात होता. आज त्याची जागा कृत्रिम धाग्यांनी घेतली आहे. सुती कपडे आर्थिकदृष्ट्या सक्षम लोकांपुरते मर्यादित राहिले आहेत. कपड्यांचे उत्पादन करणाऱ्या कंपन्यांना दायित्वाशी संबंधित कोणताही कायदा लागू नाही. प्लॅस्टिकचा वापर कपडे तयार करण्यासाठी केला जातो, म्हणून प्लॅस्टिकच्या तंतूंनी बनविलेले प्रदूषित कपडेदेखील नियमांच्या कक्षेत असले पाहिजेत. नियम आणि कायदे नसल्याचा फायदा घेत मोठमोठी औद्योगिक घराणीही वेगवान फॅशनच्या शर्यतीत सामील झाली आहेत.

सुरुवातीच्या टप्प्यातच नियम बनवून उत्पादन आणि अंमलबजावणीवर प्रभावी नियंत्रण स्थापित करणे योग्य ठरेल. त्याचबरोबर पर्यावरणाची थेट हानी होत असल्याबाबत सर्वसामान्यांमध्ये जनजागृती केली पाहिजे. अन्यथा, एकदा ही समस्या गंभीर झाली, की त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी प्रचंड संसाधने खर्च केली जातील; पण सवयीमुळे जनतेला कपड्यांच्या आसक्तीपासून वेगळे करणे कठीण होईल. बाजारपेठा शहरी नियोजनाच्या कक्षेबाहेर जात आहेत. भारत आणि इतर विकसित आणि विकसनशील देशांमध्ये पुरातन काळापासून कपडे फाटेपर्यंत वापरण्याची परंपरा होती; परंतु आता ती काळाबरोबर लोप पावत आहे. अहमदाबादमधील दिल्ली दरवाजा, काही दक्षिण अमेरिकन आणि आफ्रिकन शहरांमधील सेकंड-हँड मार्केटमध्ये सेकंडहँड कपड्यांची विक्री अजूनही मोठ्या प्रमाणावर होते. त्यांचे वैशिष्ट्य म्हणजे देश कोणताही असो,

सेकंडहँड कपड्यांच्या बाजारपेठेत तथाकथित अशिक्षित, ग्रामीण आणि मागासलेल्या महिलांचे वर्चस्व आहे. या अनौपचारिक बाजारपेठा मुळात महिलांमध्ये स्वयंरोजगाराचे एक प्रमुख माध्यम होते. त्यातून या महिलांमध्ये प्रचलित असलेली नैसर्गिक व्यावसायिक प्रतिभा व्यक्त होत होती; पण हे बाजार नगर नियोजनाच्या कक्षेबाहेर जात आहे.

भारतात पारंपरिकपणे, भांडी आणि घरगुती वस्तूंची देवाणघेवाण ही एक सामान्य प्रथा होती. ती प्रत्येकाच्या आवडीची होती. जगभरात सेकंडहँड कपड्यांचा वापर करण्यास प्रोत्साहन देण्याच्या मोहिमेसोबतच यासंदर्भात जनजागृती करण्याचे कामही केले जात आहे. आपले भविष्य डोळ्यासमोर ठेवून तरुण पिढीला सतत खरेदी करणे थांबवणे, पर्यावरणपूरक कपडे निवडणे आणि कुटुंबातील सदस्यांच्या एकत्रित वापराला प्रोत्साहन देणे असे संकल्पही घ्यावे लागतील.

जयपूरमध्ये २०१५ मध्ये एका तरुण उद्योजकाने ब्रॅंडेड कपडे भाड्याने देण्यासाठी पुढाकार घेतला होता; परंतु १० वर्षांपूर्वीचा हा उपक्रम कदाचित अकाली आणि समजण्याच्या पलीकडे होता. सध्याच्या काळात विश्व टिकविण्यासाठी असे पर्याय नितांत आवश्यक आहेत. आताच खबरदारी घेतली नाही, तर कचऱ्याचे ढीग वाढतच जातील आणि ते कमी करणे अशक्य होईल. कापड उत्पादनाच्या प्रत्येक टप्प्यावर पाणी, रसायने आणि ऊर्जा यांचा मोठ्या प्रमाणावर वापर केला जातो. त्याचा पर्यावरणावर खोलवर परिणाम होतो.

संशोधनानुसार, जागतिक कार्बन उत्सर्जनात फॅशन उद्योगाचा वाटा १० टक्के आहे, जो २०३० पर्यंत सतत वाढण्याची शक्यता आहे. फॅशन उद्योग ९२ दशलक्ष टनांपेक्षा जास्त कचरा निर्माण करतो आणि दरवर्षी १.५ ट्रिलियन टन पाणी वापरतो. बदलत्या जीवनशैलीचा आणि विचारांचा पर्यावरणासह अनेक स्तरांवर परिणाम झाला आहे. यामुळे अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. त्याकडे दुर्लक्ष केले जाऊ शकत नाही. बदलत्या फॅशनच्या मागणीमुळे बऱ्याच समस्यांकडे दुर्लक्ष केले गेले आहे. त्यात पर्यावरणीय समस्यादेखील समाविष्ट आहेत.

एका संशोधनानुसार, हवामान बदलामध्ये फॅशन उद्योगाचा वाटा १० टक्के आहे. त्यामुळे भूजलाला सर्वात मोठा धोका निर्माण झाला आहे. कापड उत्पादक कंपन्या भूजलाचे सर्वाधिक शोषण करतात. बांगला देश हा जगातील दुसरा सर्वात मोठा कापड निर्यातदार देश आहे.

आकडेवारीनुसार, बांगला देशातील कापड उद्योग दरवर्षी पृथ्वीवरील १,५०० अब्ज लिटर पाण्याचे शोषण करतो. एक किलो डेनिम धुण्यात २५० लिटर पाणी वाया जाते. तसेच एक किलो सुती कापड धुण्यासाठी आणि रंगविण्यासाठी २०० लिटर पाणी वापरले जाते. यामुळेच बांगला देशातील भूजल पातळी सातत्याने खाली जात आहे. बांगला देशातील वस्त्रोद्योगात जेवढे पाणी वाया जाते, तेवढे पाणी पिण्यासाठी वापरले तर सुमारे दोन कोटी लोकांना १० महिने पिण्याचे पाणी मिळू शकते.

फॅशनमुळे पर्यावरण प्रदूषण, जलसंकट, रासायनिक प्रदूषण, कार्बन उत्सर्जन, कचरा या समस्या वाढत आहेत. वस्त्रोद्योग हा जगातील सर्वाधिक प्रदूषण करणाऱ्या उद्योगांपैकी एक आहे. नायलॉन, पॉलिस्टर आणि स्पॅन्डेक्स यांसारखे कृत्रिम तंतूंचा वापर फॅशन आणि टिकाऊ कपड्यांमध्ये समावेश आहे ते कपड्यांच्या उत्पादनात वापरले जातात. त्यामुळे कपडे खराब होत नाहीत. त्याचप्रमाणे रेयॉन, लाकडाच्या लगद्यापासून बनवलेले फॅब्रिक, जंगलतोड वाढवते आणि नैसर्गिक अधिवास आणि जैवविविधतेच्या नाशासाठी अत्यंत हानिकारक आहे.

आजकाल असे स्वस्त कपडे बाजारात मुबलक प्रमाणात मिळतात, जे निकृष्ट दर्जाचे असतात आणि लोक ते लवकरच टाकून देतात. अशा कपड्यांनी जागतिक कचरा समस्येला हातभार लावला आहे. फॅशनच्या पर्यावरणीय प्रभावाबद्दल जागरूकता आता वाढायला लागली आहे. त्यामुळे टिकाऊ कपड्यांच्या उत्पादनात वाढ झाली आहे. अशा कपड्यांची मागणी जसजशी वाढत जाईल तसतसे अशा उद्योगांमध्ये गुंतलेल्या कामगारांना चांगल्या कामाची परिस्थिती, उत्तम दर्जाचे कपडे आणि उत्तम कारागिरांना चांगले काम आणि मजुरी मिळेल.

भारतीय कापड उद्योग कुशल कारागिरांसाठी ओळखला जातो. त्यात भरतकाम आणि अलंकार यांचा समावेश आहे. पर्यावरणाच्या समस्या निर्माण करणाऱ्या उद्योगांना पर्यावरणपूरक कसे करता येईल, याचा विचार करण्याची आवश्यकता आहे. भारतात लोकप्रिय असलेला कपड्यांचा ब्रॅंड बाजारात इतका प्रचलित होतो की, तो विकत घेताना पर्यावरणाला हानी पोहोचत आहे की नाही, याचा विचार कोणी करत नाही. त्याऐवजी पर्यावरणस्नेही ब्रॅंड्सच्या टिकाऊ कपड्यांबाबत लोकांची आवड वाढली, तर वस्त्रोद्योगामुळे निर्माण होणाऱ्या समस्या कमी होऊ शकतात. फॅशन ही समाजाची गरज आहे; पण जेव्हा ती समस्या निर्माण करत असते, तेव्हा तिचे समर्थन करता येत नाही.

ब्रिटन, अमेरिका, स्वीडन आणि फिनलंडमध्ये फॅशन इंडस्ट्री किंवा टेक्सटाईल इंडस्ट्रीमध्ये केलेल्या अलीकडील अभ्यासातून असे दिसून आले आहे की, फॅशनचा पर्यावरणासह अनेक क्षेत्रांवर परिणाम होतो. त्याचा पृथ्वी आणि तिच्यावर राहणारे प्राणी यांचा खोल संबंध आहे. अभ्यासानुसार, कापड आणि फॅशन उद्योगाची पुरवठा साखळी लांब आहे. ती कृषी आणि फायबर उत्पादनापासून पुरवठा, उत्पादन आणि किरकोळ विक्रीपर्यंत पसरलेली आहे.

संशोधकांना असे आढळून आले की, कापड उत्पादनाच्या प्रत्येक टप्प्यात प्रचंड प्रमाणात पाणी, रसायने आणि ऊर्जा वापरली जाते. त्याचा पर्यावरणावर खोलवर परिणाम होतो. जगातील ज्या देशांमध्ये फॅशन आणि कापड उद्योग मोठ्या प्रमाणावर आहेत, तेथे पर्यावरणीय प्रदूषण आणि पाण्याची कमतरता इतर देशांपेक्षा खूप जास्त आहे. गेल्या २० वर्षांत नवीन फॅशनकडे लोकांची आवड प्रचंड वाढली आहे.

पूर्वी लोक कोणत्याही सण किंवा लग्न समारंभाच्या निमित्ताने कपडे खरेदी करायचे. आता दर तिसऱ्या-चौथ्या महिन्याला नवीन फॅशनच्या कपड्यांची खरेदी सुरू झाली आहे. यामुळेच स्वस्त असूनही वस्त्रोद्योग तोट्यात राहत नाही. वस्त्रोद्योग, विशेषत: फॅशन उद्योगामुळे पर्यावरणाची मोठ्या प्रमाणात हानी होण्यामागे इतर कारणे आहेत. गेल्या १५ वर्षांत फॅशन इंडस्ट्री दुप्पट वेगाने वाढली आहे. खरेदी केलेले कपडे फेकून देण्याआधी परिधान करण्यासाठी लागणाऱ्या वेळेत ४० टक्के घट झाली आहे. जीर्ण झालेले कपडे फेकले जातात किंवा जाळले जातात. या दोन्ही घटनांमध्ये पर्यावरणावर परिणाम होत आहे.

एका सर्वेक्षणानुसार, शहरांच्या तुलनेत खेड्यांमध्ये फॅशनची आवड खूपच कमी आहे. त्यामुळे शहरांमध्ये पर्यावरणाच्या समस्या सातत्याने वाढत आहेत. 'स्टायलिश' दिसण्याची प्रवृत्ती व्यसनासारखी बनत चालली आहे. याचा आरोग्यावरही विपरीत परिणाम होत आहे. सध्याचे फॅशन ट्रेंड जीवनशैलीच्या नावाखाली समर्थनीय असू शकतात; परंतु फॅशन उद्योगाला दीर्घकाळ यशस्वी ठेवण्यासाठी असे प्रयत्न चांगले नाहीत. भारतासह जगातील अनेक देशांमध्ये 'वापरा आणि फेका' ही विचारधारा फॅशनेबल झाली आहे. लोकांमध्ये दिखाऊपणाची सवय आणि पर्यावरणाबद्दल निष्काळजीपणा वाढला आहे. शहरांमधील असंवेदनशीलतेमुळे आजूबाजूला घडणाऱ्या गंभीर घटनांबाबत लोक बेफिकीर राहतात. त्यामुळे पर्यावरणाच्या समस्या वाढल्या असतानाच हिंसक कारवाया आणि अनेक प्रकारचे संघर्षही वाढले आहेत. भारतासह जगातील अनेक देशांमध्ये फॅशनच्या नावाखाली कपडे घालण्याची पद्धत, वस्तू गोळा करण्याची सवय आणि पर्यावरण प्रदूषण आणि इतर समस्यांच्या नावाखाली वापर आणि फेकण्याची सवय बदलण्याची गरज आहे. स्वतःचे, समाजाचे आणि निसर्गाचे नुकसान करून फॅशन करण्यात कुठला शहाणपण आहे? (लेखक वन्यजीव आणि पर्यटनविषयक अभ्यासक आहेत.)